# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०२/२०१९** **दिनांक ३०.०१.२०१९**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा बुधवार दि.३०.०१.२०१९ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.३० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/५१४८/२०१९, दि.२२.०१.२०१९ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार बुधवार दि.३०.०१.२०१९ दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम,उपाध्यक्ष
०३. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह,सदस्य
०५. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०६. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे यांनी दुरध्वनीव्दारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.श्री.रविंद्र मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.३०.०१.२०१९ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी १.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०८.०१.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३९** **दिनांक ०८.०१.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

**१) निर्णय क्र.०४-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या साईधर्मशाळा गट नं.१७२ मधुन ड्रेनेज लाईन करणेसाठी ग्रामपंचायत कार्यालय निमगांव को-हाळे यांचेकडून ड्रेनेजची साईज व नकाशा यासह सविस्तर प्रस्ताव मागवून प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीच्या साईधर्मशाळा गट नं.१७२ मधुन ड्रेनेज लाईन करणेसाठी ग्रामपंचायत कार्यालय निमगांव को-हाळे यांचेकडून ड्रेनेजची साईज व नकाशा यासह सविस्तर प्रस्ताव मागवून प्रशासकीय स्तरावर निर्णय घेण्यात यावा, व प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा.व्यवस्थापन समितीस अवगत करावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**२) निर्णय क्र.०८-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद या संस्थेचे उद्देश हे शैक्षणीक व सामाजिक स्वरुपाचे आहेत. संस्थेने समाजातील सर्व स्तरातील मुलां-मुलींसाठी पुर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण कला, विज्ञान, वाणिज्य, योग-प्राणायाम, शारीरिक शिक्षण, संगणक, व्यवसाय शिक्षण, अध्यापनाचे शिक्षण व प्रशिक्षण इत्यादी असुन संस्थेच्या शाळा व महाविद्यालय प्रामुख्याने ग्रामीण भागात आहेत. संस्था आर्थिक दुर्बल घटकाच्या वस्तीतील कामगार, गरीब व मागासवर्गीयांच्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता प्रधान शिक्षण प्रदान करीत आहे. याबाबी विचारात घेऊन पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या रामचंद्र नाईक विद्यालय, स्पंदन नगर सिडको एन–४ (दक्षिण) औरंगाबाद येथील शाळेच्या इमारतीचे उर्वरीत बांधकाम पुर्ण करण्यासाठी रक्कम रु. १,५६,००,०००/- मात्र आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थानमार्फत देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे सदर शाळेच्या उर्वरीत इमारत बांधकामासाठीच वापरण्यात यावे याबाबत संबधीताशी करारनामा करण्यात यावा, व संस्थानचे बांधकाम विभागामार्फत सदर बांधकामाची वेळोवेळी पाहणी करुन त्याचा अहवाल मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

मा.छाननी समितीने रक्कम रु.२,२६,००,०००/- एवढे आर्थिक सहाय्य देण्यास मान्यता दिलेली असल्याने सदर प्रस्ताव पुन्हा मा.छाननी समितीचे मान्यतेसाठी सादर करावा व त्यांनतर शासनाचे मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही- लेखाशाखा/बांधकाम विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचिकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचिका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदीन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्दश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील ॲड नितीन भवर यांनी दुरध्वनीव्दारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.**

**मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरुन आजचे सभेत सदरचा निर्णय कायम करतांना मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा/ बांधकाम विभाग)**

---

३) निर्णय क्र.१२

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी इकोनिर्मिती इन्फ्रस्ट्रक्चर ॲण्ड सर्व्हीसेस व जनसेवा फाऊंडेशन बचत गट यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-बगीचा विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३० नुसार मंदिरातून निघणारे निर्माल्यापासून अगरबत्ती बनविणेबाबत इकोनिर्मीती, जनसेवा फाऊंडेशन व संस्थान यांचेमध्ये करारनामा झालेला आहे. तथापी इकोनिर्मीती इन्फ्रासटक्र ॲण्ड सर्व्हिसेस यांचे संचालक श्री.रोहीत सदाफळ यांना सदर पदाचा राजीनामा दिलेला असून त्यांनी या प्रकल्पातून बाहेर पडल्याचे दि.१०.११.२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. सद्यस्थितीत जनसेवा फाऊंडेशन, लोणी हेच फक्त अगरबत्ती बनविण्याचे काम करत आहे. त्याप्रमाणे जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांचेशी व्दिपक्षीय करारनामा करुन घेण्यात यावा, करारनामा करतांना सदरचा प्रकल्प हा संस्थानचा आहे व अगरबत्ती पाकीटावर "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी " या नावाचा उल्लेख करावा असे जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांना कळविण्यात यावे, करारनामा करुन घेणेबाबतची पुढील कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- बगीचा विभाग)**

---

४) निर्णय क्र.२२-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत राहुरी तालुक्यातील चिंचोली फाटा ते शनिशिंगणापूर रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांना अंदाजपत्रकाचे सविस्तर तपशिलासह मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात यावे,असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचीकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचीका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदीन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्दश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील ॲड नितीन भवर यांनी दुरध्वनीव्दारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.**

**मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरुन आजचे सभेत सदरचा निर्णय कायम करतांना मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

५) निर्णय क्र.२६-

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक नेमणुक करणेकामी संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत आलेले प्रस्ताव मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फि चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, आलेले प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षक नेमणुक करणेकामी प्रस्ताव मागविणेस व त्यांची छाननी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करणे या प्रक्रियेस जादा कालावधी लागणार असल्याने मागील आर्थिक वर्ष २०१७-१८ करीताचे वैधानिक लेखापरिक्षक मे.मुकुंद एम.चितळे ॲन्ड कं.चार्टर्ड अकौटंटस्, मुंबई यांची पुर्वीचेच रक्कम रु.१,७७,०००/-इतकी फी तसेच इतर कर व प्रत्यक्ष अनुषंगीक खर्च इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. सदर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

६) निर्णय क्र.२७-

यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूक करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन नामांकित साधारणतः रु.५०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या लेखापरिक्षण संस्थांकडून अपेक्षित फी नमुद करुन प्रस्ताव मागविण्यास व विहीत वेळेत आलेले प्रस्ताव मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडण्यात येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थाच्या फि चा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात येऊन, प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- लेखाशाखा)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूक करणेकामी प्रस्ताव मागविणेस व त्यांची छाननी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी मा.विधी व न्याय विभागाकडे सादर करणे या प्रक्रियेस जादा कालावधी लागणार असल्याने मागील आर्थिक वर्ष २०१८-१९ करीताचे अंतर्गत लेखापरिक्षक मे.सुनिल अभ्यंकर ॲन्ड असो.सीए, पुणे यांची पुर्वीच्या रक्कम रु.६,००,०००/-फी तसेच इतर कर व अनुषंगीक खर्च या अटी शर्तीवर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. सदर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

७) निर्णय क्र.३३

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणारे व्हीआयपी व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी देणगीदार साईभक्त श्री. के. बालासारावणन, ईरोडे, मॅनेजिंग डायरेक्टर, साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., ईरोडे, तामिळनाडू यांचेकडून श्री साईबाबांचा फोटो व श्री साईबाबा संस्थानचे नाव असलेल्या शॉल्स देणगी स्वरुपात स्विकारणेस, तसेच श्री. बालासारावणन यांना वर्षातुन ५ ते ६ वेळा त्यांचे मागणी प्रमाणे आरतीचे सशुल्क पासेस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणारे व्हीआयपी व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी देणगीदार साईभक्त श्री. के. बालासारावणन, ईरोडे, मॅनेजिंग डायरेक्टर, साई लोगबाला (ओपीसी) प्रा.लि., ईरोडे, तामिळनाडू यांचेकडून श्री साईबाबा संस्थानचे नाव व श्री साईबाबांचा फोटो असलेल्या शॉल्स देणगी स्वरुपात स्विकारणेस, तसेच श्री. बालासारावणन यांना वर्षातुन ५ ते ६ वेळा त्यांचे मागणी प्रमाणे आरतीचे सशुल्क पासेस प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

८) **निर्णय क्र.३४**

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. शासन निर्णयानुसार शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात / रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट अॅक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन अॅक्ट १८६० नुसार नोंदणीकृत) प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात यावे. अशी रक्कम मागणी करणा-या व संस्थानने निश्चित केलेल्या पात्र संस्थेने आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वजा करुन) डिलर किंवा कंपनीकडे भरावी व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानातर्फे रु.५ लक्ष इतकी अनुदान रक्कम स्वयंसेवी संस्थेला न देता संस्थानने डिलरला / कंपनीला देण्यास मान्यता देण्यात आली.

२. संबंधित संस्थेशी करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

३. सदर साई रुग्णवाहिका प्रकल्प महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम, आदीवासी, पहाडी इत्यादी भागात राबवावयाचा असल्यामुळे या भागांचा भौगोलिक परिस्थितीचा विचार करता या प्रकल्पाकरीता महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीचे महिंद्रा बोलेरो BS-IV(डिझेल) हे वाहन GPS System सह महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीकडून थेट खरेदी करणे संस्थान हिताचे असल्याने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

५०० रुगणवाहीका खरेदी करावयाच्या असल्याने महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांना रुगणवाहीकेची किंमत निश्चीत करणेकामी व्यवस्थापन समिती सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले.

४. रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल.

५. रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे नमूद करण्यात यावे.

१. रुग्णवाहिका नियमावली अंतिम करुन शासन मान्यतेस्तव तात्काळ सादर करण्यात यावी. सदर नियमावलीस शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियमावलीमध्ये नमूद अटी व शर्तीनुसार महाराष्ट्रातील नोंदणीकृत संस्थांना प्रत्येकी एक याप्रमाणे रुग्णवाहिकेकरीता अनुदान देण्यात यावे.

(कार्यवाही- वाहन विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचीकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचीका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदीन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील अॅड नितीन भवर यांनी दुरध्वनीव्दारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.**

**मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरुन आजचे सभेत सदरचा निर्णय कायम करतांना मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

९) **निर्णय क्र.३५-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन मान्यतेनुसार श्री साई रुग्णवाहिकेकरीता खालील सुधारीत नियमावलीस मान्यता देण्यात आली.

१) शिर्डी संस्थानातर्फे अर्थसहाय्य म्हणून महाराष्ट्रातील आरोग्य क्षेत्रात/रुग्णसेवेच्या क्षेत्रात कार्यरत नोंदणीकृत संस्थेस प्रत्येकी एक याप्रमाणे ५०० सामाजिक संस्थांना (महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट अॅक्ट १९५० किंवा सोसायटी रजिस्ट्रेशन अॅक्ट १८६० नुसार नोंदणीकृत)प्रत्येक रुग्णवाहिकेसाठी संस्थानातर्फे रु.५ लक्ष कायमस्वरुपी म्हणून अनुदान देण्यात येईल.नोंदणीकृत संस्था ही कमीत कमी ०३ वर्षा पुर्वीची असावी.

२) अनुदान रक्कम सदर संस्थेला न देता मागणी करणा-या संस्थेने कंपनी / डिलरकडे आगाऊ रक्कम (रु. ५ लाख वाज करुन) भरावी व कागदोपत्री पूर्तता करावी. अशी रक्कम त्यांनी भरल्यानंतर संस्थानतर्फे रु. ५ लक्ष अनुदान परस्पर डिलरला/ कंपनीला देण्यात येईल.

३) संस्थान मार्फत पात्र झालेल्या संस्थेचे नाव प्रसिध्द झालेनंतर कंपनी / डिलरकडे आगाऊ रक्कम भरुन त्याबाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.

४) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.

५) प्रत्येक रुग्णवाहिकेस संस्थानने निश्चित करुन दिलेल्या कंपनीची GPSSystem बसविणे बंधनकारक राहील. तसेच या बाबतचा रिपोर्ट दरमहा अथवा संस्थानने मागणी केल्यास सादर करावा लागेल. या कामी येणारा खर्च संबंधीत संस्थेस करावा लागेल.

६) रुग्णवाहिकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल. रुग्णवाहिकेचा काही अपघात अगर काही कायदेशिर बाब उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या संस्थेची राहील.

७) रुग्णवाहिकेवर श्री साई रुग्णवाहिका असे चार बाजुने ठळक अक्षरात व दोन रंगामध्ये नमूद करण्यात यावे.

८) संस्थेच्या कार्यकारणीची निवड ही लोकशाही पध्दतीने व कायद्याप्रमाणे झालेली असावी व तशी स्पष्ट तरतुद संस्थेच्या घटनेत व उपनिधीमध्ये असावी.

९) संस्थेचे पॅनकार्ड व रजिस्टेशन प्रमापणपत्र आवश्यक आहे. संस्थेबद्दल विश्वस्तांचे कुठल्याही न्यायालयात वाद असु नयेत.

१०) सदस्य व पदाधिका-यांची नांवे व दुरुध्वनी / मोबाईल क्रमांकाची संस्थेच्या अध्यक्षांनी साक्षांकित केलेली यादी सादर करणे आवश्यक आहे.

११) संस्थेने रुग्णवाहिकेची आवश्यकता असलेबाबत तसेच त्यांची संस्था आरोग्य क्षेत्रात / रुग्ण सेवेच्या कार्यरत असलेचे संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांचे प्रमाणपत्र द्यावे लागेल. व खालील प्रमाणे कागदपत्रे मागणी अर्जा सोबत द्यावी लागतील.

अ) आयकर खात्याचे आयकर अधिनियम कलम ८० (जी) खाली आयकरातुन सुट मिळाल्याचे प्रमाणपत्र (असल्यास)

ब) संस्थेला शासनाकडून अनुदान मिळते किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र.

क) संस्थेच्या मालमत्तेविषयी किंमतीसह यादी, याबाबत धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदवहीचा साक्षांकित उतारा.

ड) संस्थेचे बॅंकेत नाव, पत्ता, व खाते नंबर (संस्थेच्या बाबतीत)

१२) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ (तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

१३) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान १०(दहा) लाख रुपये असावी.

१४) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

१५) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच ना नफा ना तोटा या तत्वावर वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१६) सदर रुग्णवाहिकेच्या चालकाकडे वाहन चालविण्याचा वैध अधिकृत परवाना असणे बंधनकारक राहील.

१७) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस,टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा अनुशंगीक खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

१८) या बाबत कायदेरशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र फक्त राहाता,जिल्हा न्यायालय कोपरगांव वमा.उच्च न्यायालय औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१९) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

रुग्णवाहिकांकरीता अनुदान देणे संबधीत सुधारीत नियमावलीस मान्यता मिळालेनंतर त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन ती शासन मान्यतेसाठी सादर करावी, असे ठरले.

शासन निर्णयानुसार अनुदान देणेचे नियमावलीस शासन मान्यता मिळालेनंतर अनुदान देणेची कार्यवाही करण्यात यावी. शासन मान्यता मिळालेनंतर अनुदान मागणी करीता विहित नमुन्यात फॉर्म तयार करुन अर्ज मागविण्यात यावे. या अर्जाचा नमुना संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर ठरावीक कालावधीसाठी प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वाहन विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचीकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचीका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदीन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्दश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील ॲड नितीन भवर यांनी दुरध्वनीव्दारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.**

**मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरुन आजचे सभेत सदरचा निर्णय कायम करतांना मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- वाहन विभाग)**

---

१०) निर्णय क्र.३७-

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील, कनिष्ठ महाविद्यालय, श्री साईबाबा महाविद्यालय, शिर्डीशी संलग्न करण्यास मान्यता देण्यात आली. व तसा प्रस्ताव मा.शिक्षण संचालक/उपसंचालक यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय / श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाकडील कनिष्ठ महाविद्यालय, संस्थानच्या श्री साईबाबा महाविद्यालय,शिर्डी या वरिष्ठ महाविद्यालयाशी संलग्न करण्यास मान्यता देण्यात आली. व तसा प्रस्ताव मा.शिक्षण संचालक/उपसंचालक यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय / श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.०२ शासन निर्णय व परिपत्रक वाचन.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजा संबंधीत शासन निर्णय, परिपत्रके व इतर पत्र प्राप्त होतात. सदर पत्रांची एकत्रित रित्या मागासवर्ग कक्षाकडे नोंद घेऊन सदर पत्रावर उचित कार्यवाहीसाठी संबंधीत विभागाकडे पाठविण्यात येते. सदर शासन पत्रावर संबंधीत विभागाने काय कार्यवाही केली आहे त्याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास वरिष्ठांकडे सादर करण्यात येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ चे सभेत आयत्या वेळचा विषय क्र.१७, निर्णय क्र.३४६ "संस्थानचे कामकाजासंबंधी शासनाचे निर्णय,परिपत्रके वेळोवेळी समितीचे बैठकीत सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत देण्यात यावी व सदर शासन निर्णय, परिपत्रके यांचे वाचन असा विषय अजेंडयामध्ये समाविष्ट करण्यात यावा."असा झालेला आहे.

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दि.०५/०१/२०१९ ते दि. १७/०१/२०१९ अखेर या कालावधीत महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे कामकाजासंदर्भात खालीलप्रमाणे प्राप्त झालेली पत्रे सोबत सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | शासन पत्र क्र. व दिनांक | प्राप्त दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| ०१ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१५८६/ प्र.क्र.१९१/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.१९/१२/२०१८ | ०५/०१/२०१९ | श्री साईभक्त यांचा शिर्डी दर्शन रांगेत मृत्यू झाल्याने त्यांच्या वारसांना रु.२५०००/- आर्थिक मदत म्हणून देण्यास मंजूरी देणेबाबत |
| ०२ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१२४८/ प्र.क्र.१२८/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.२६/१२/२०१८ | ०५/०१/२०१९ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी नविन दूरध्वनी यंत्रणा खरेदी करणे व जुनी यंत्रणा कालबाहय झालेली असल्यामुळे परत (Buyback) करण्यास मान्यता देण्याबाबत |
| ०३ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८१४/ प्र.क्र.७१/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.१०/०१/२०१९ | ११/०१/२०१९ | शिर्डीतील २४ रस्ते विकास कामासाठी शिर्डी नगरपंचायतीस अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१७६१/ प्र.क्र.२०५/का.१६ विधी व न्याय विभाग दि. ११/०१/२०१९ | १२/०१/२०१९ | श्री साईबाबा संस्थानच्या मंजूर आकृतीबंधातील उपकार्यकारी अधिकारी हे पद "उपमुख्य कार्यकारी अधिकारी" असे पदउन्नत करण्याबाबत |
| ०५ | शासन निर्णय क्र.सासंवि-२०१८/ प्र.क्र. ५१/इमारती-२, सार्वजनिक बांधकाम विभाग दि.१४/०१/२०१९ | १४/०१/२०१९ | निविदा करारपत्रातील कामातील उणीवांच्या दुरुस्तीचा कालावधी (Defect Liability Period) निश्चित करणे |
| ०६ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१५४०/ प्र.क्र.१७७/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.०२/०१/२०१९ | १५/०१/२०१९ | श्री साईबाबा रुग्णालयातील जुने ए.सी.प्लांन्ट (Buyback) करुन नविन सेंट्रल ए.सी. प्लांट बसविणेस मान्यता देण्याबाबत |
| ०७ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१५४०/ प्र.क्र.१७८/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.०२/०१/२०१९ | १५/०१/२०१९ | व्दारावती भक्तनिवास श्री साईबाबा संस्थान, शिर्डी मधील जुने स्प्लीट ए.सी. (Buyback) बायबॅक करुन नविन खरेदी करुन बसविणेस मान्यता देण्याबाबत |
| ०८ | शासन निर्णय क्र.सासंवि-१०१७/१६३४/ प्र.क्र.१७६/ का.१६ विधी व न्याय विभाग दि.०३/०१/२०१९ | १५/०१/२०१९ | मौजे शिंगवे, ता.राहाता येथील गट नं.१८२ मधील संस्थान मालकीच्या जागेत Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion ) तंत्रज्ञानावर आधारीत प्रत्येकी १० TPD क्षमतेचे दोन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यास व त्यास येणा-या रु.४,३५,३५,९४६/- इतक्या अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत |

सदर पत्रे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार सर्व समिती सदस्यांना बैठकीच्या अजेंडयासोबत वाचन करणेकामी द्यावयाची असल्याने सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

**निर्णय क्र.४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडून प्राप्त झालेले उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रक यांचे वाचन करुन त्यांची नोंद घेण्यात आली.**

**यावेळी शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/१७६१/ प्र.क्र.२०५/का.१६ विधी व न्याय विभाग दि. ११/०१/२०१९ अन्वये उपकार्यकारी अधिकारी हे तहसीलदार संवर्गातील पद उपमुख्य कार्यकारी अधिकारी या रु.५,४००/- ग्रेड पे मधील पदामध्ये दर्जोन्नत केलेले आहे. त्याचप्रमाणे संस्थानमधील पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे पोलीस विभागाकडील प्रतिनियुक्तीचे पद देखील दर्जोन्नत करण्याची आवश्यकता आहे, याबाबत चर्चा करण्यात आली.**

**संस्थानचे संरक्षण विभागाकरीता शासनाने यापुर्वी माहे डिसेंबर-१९९९ पासून पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकाऱ्याची संस्थानचे संरक्षण विभाग प्रमुख म्हणून प्रतिनियुक्तीने नेमणूक केलेली आहे. सद्यस्थितीत संस्थानचा कारभार दिवसोंदिवस वाढत असून कामाचा व्यापही मोठया प्रमाणात वाढत आहे. संस्थानची मालमत्ता ठिकठिकाणी विखुरलेली असून तिचे संरक्षण होणे गरजेचे आहे. श्रींचे दर्शनासाठी देश विदेशातून दैनंदिन सरासरी ६० ते ७० हजार साईभक्त दर्शनासाठी शिर्डी येथे येत आहे. हिच संख्या गर्दीचे कालावधीत १ ते १.५ लाख होत असते.**

**तसचे गर्दीचे काळात संस्थानच्या सुरक्षा अधिकाऱ्यांना शासनाच्या पोलीस विभागाशी वारंवार समन्वय साधावा लागतो तथापी शिर्डी येथे शासनाच्या पोलीस विभागात पोलीस उपअधिक्षक,शिर्डी, पोलीस निरिक्षक शिर्डी शहर, पोलीस निरिक्षक, वाहतुक शाखा, व तालुका पोलीस निरिक्षक असे अधिकारी कार्यरत आहे. त्यामुळे त्यांचेशी समन्वय साधण्यासाठी त्यांच्या पदाशी समकक्ष अधिकारी संस्थानमध्ये असणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिति विचारात घेता संस्थानमधील पोलीस उपनिरिक्षक हे प्रतिनियुक्तीचे पद दर्जोन्नत करुन पोलीस उपअधिक्षक दर्जाचे करावे यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा , असे ठरले.**

**(कार्यवाही- मागासवर्ग कक्ष/ सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०३** **संस्थानचे साईगार्डन प्रकल्पातंर्गत मे.लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांचे टर्मिनेशन नोटीस बाबत शासनाचे दि.१४.१२.२०१८ चे पत्रावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मौजे निमागांव कोऱ्हाळे येथील संस्थानचे गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मध्ये मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७/०२/२००७ रोजीचे सभेत साईगार्डन करण्याचे ठरले होते. या प्रकल्पातंर्गत श्री साईबाबांच्या जिवनावर अधारीत लेजर शो तयार करणेसाठी लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांना US$५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आला होता. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेशी झालेल्या करारानुसार त्यांनी केलेल्या

कामापोटी Payment Stages ०१ ते ०४ व ०७ ते ०८ करीता US$२१,४५,००० अदा करणेत आलेले आहे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांचे दि.०५/११/२०१२, दि.१७/१२/२०१२ व दि.२६/०२/२०१३ रोजीचे पत्रान्वये करारनाम्यातील Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले सादर केलेली होती.

मा.त्रिसदस्य समितीचे दि.१५/०३/२०१४ रोजीचे सभेतील नि.क्र.१८२ अन्वये मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे बिल अदा करणेकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले होते. त्यानुसार संस्थानचे वकील श्री. संजय चौकीदार यांनी CAST/८७०८/२०१४ दि.२५/०७/२०१४ अन्वये मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हिल ॲप्लिकेशन दाखल केले होते.

प्रस्तुत प्रकरणी मे. लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी त्यांची Payment Schedule ०५ व ०६ नुसार US$१५,४०,००० ची बिले प्रलंबीत असल्यामुळे दि.०३/०३/२०१७ रोजीच्या (संस्थानकडे प्राप्त दि.२३/०३/२०१७) पत्रान्वये त्यांचेशी केलेले करारनाम्यातील अट क्र.२५ नुसार संस्थानला टर्मिनेशन नोटीस दिलेली होती. त्यास संस्थानचे वतीने दि.११/०४/२०१७ रोजीचे पत्राने उत्तर पाठविणेत आले आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अहवालावर दि.०७/०४/२०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश केला आहे.

“The learned AGP has placed on record a copy of the report submitted by the Committee. The same is taken on record.

2. We would like to know the stand of the Committee in the matter. Stand over to 21.04.2017.”

मा. उच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे म्हणणे न्यायालयात सादर करणेकामी दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरहू सभेत निर्णय क्र.२७९ खालीलप्रमाणे संमत करणेत आला आहे.

“.. मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग संदर्भात मा.उच्च न्यायालयात समितीचे मत सादर करावयाचे आहे. या प्रकल्पाबाबत सविस्तर विषय चर्चेला ठेवणेत आलेला असून सदर प्रकल्प मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेमार्फत पूर्ण करायचा की, सदर प्रकल्पाबाबत करारनामा रद्द करायचा निर्णय समितीने घ्यायचा आहे. यापूर्वी मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना २१,४५,००० मात्र डॉलर्सचे बिल अदा करणेत आलेले असून त्यांनी पुढील कामाचे १५,४०,००० मात्र डॉलर्स बिलाची मागणी केलेली आहे. सदर बिले या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.कापरे यांनी प्रमाणित केलेली आहेत. तसेच मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांना पुढील काम थांबविणेत यावे, असे पत्र दि.०७.०३.२०१३ रोजी संस्थानचे वतीने देणेत आले होते. त्यामुळे मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी त्यानंतरचे काम थांबविले आहे. परंतू तत्पुर्वी त्यांनी केलेल्या कामाची व करारनाम्यातील Payment Schedule नुसार देय असलेल्या रकमेची मागणी केलेली आहे. सदर प्रकल्प व करारनामा रद्द झाल्यास त्यांना देय असलेल्या १५,४०,००० मात्र डॉलर्स रकमेबाबत संस्थानवर जबाबदारी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबर चर्चा/ वाटाघाटी करुन सदर प्रकल्प पूर्ण करणेबाबत समितीने निर्णय द्यावा, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी समिती सदस्यांना दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईगार्डन प्रकल्प लवकर कार्यान्वीत होणेकामी, तत्कालीन व्यवस्थापन समितीने लेझर शो उभारणी व त्यासाठी आवश्यक असलेले बांधकाम करणे ही दोन्ही कामे एकाच कंपनीला द्यायला हवी होती. तसेच लेझर शो उभारणीकामी मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग या कंपनीचा करारनामा व त्यामधील बीले अदायगीसाठीची कलमे सदोष असल्याचे दिसून येते. याकरीता सदर करारनामा रद्द करुन अर्बिस्ट्रेशनची प्रक्रिया सुरु करणेची कार्यवाही करणेत यावी. याचबरोबर गेल्या १० वर्षामध्ये तंत्रज्ञानामध्ये खुपच बदल झालेला असून इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमतीही कमी झालेल्या आहेत. या सर्व बाबींचा विचार करता, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणेत येऊन, त्यांना अदा करण्यात आलेली बीलाची रक्कम वसूल करणेबाबत कायदेशीर कारवाई करणेत यावी व साईगार्डन प्रकल्पामधील लेझर शो उभारणीकामी विहीत पध्दतीने नवीन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.

तसेच या प्रकरणाची निवृत्त न्यायमूर्तींमार्फत चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायमुर्तींची नेमणूक होणे व मे.लिजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचेबरोबरचा करारनामा रद्द करणे यासाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकरीता त्यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा व शासनाचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.” असे ठरले.

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांनी दि.१९/०६/२०१७ रोजीचे पत्रान्वये संस्थानला Termination of the Agreement बाबत नोटीस दिलेली होती. मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवर निर्णय घेणेबाबत तसेच

त्यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता. याबाबत सदरहू सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

निर्णय क्र.९५६-यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसवर संस्थान ॲडव्होकेट पॅनलवरील तज्ञ वकिलामार्फत याबाबत सल्ला मागविणेत यावा, असे ठरले.

निर्णय क्र.९५७- यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लेजर व्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेपुर्वी मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानचे वतीने काम पहाणारे ॲडव्होकेट संजय चौकीदार व सल्लागार परिषदेमधील सल्लागार ॲडरमेश सोनी यांना चर्चेसाठी पुढील उपसमिती सभेसमोर आमंत्रित करणेत यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णय क्र.९५६ अन्वये संस्थान ॲड. पॅनलवरील ॲड. संजय चौकीदार यांना या प्रकरणाची सुरुवाती पासूनची माहिती असल्याने याकामी त्यांचा सल्ला मागविणेस तसेच निर्णय क्र. ९५७ अन्वये ठरलेप्रमाणे ॲड. चौकीदार व सललागार परिषदेमधील सल्लागार ॲड. रमेश सोनी यांना उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी आमंत्रीत करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.७६ (१४) खालीलप्रमाणे झालेला आहे.

“.. उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी आजचे सभेत, संस्थान ॲड.पॅनलवरील ॲड.संजय चौकीदार व सल्लागार परिषदेमधील सल्लागार ॲड. रमेश सोनी हे उपस्थित राहू शकले नाही. त्यामुळे मे.लेजरव्हिजन लि., हाँगकाँग यांचे समवेत अर्बिस्ट्रेशन करणेविषयी ॲड संजय चौकीदार व ॲड रमेश सोनी यांचेकडून सध्या लेखी स्वरुपात मार्गदर्शन मागविणेत यावे. यथावकाश त्यांचे सोयीनुसार, त्यांना स्थानिक उपसमिती समोर चर्चेसाठी आमंत्रित करणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.”

वरील निर्णयानुसार ॲड. संजय चौकीदार व ॲड. रमेश सोनी यांना दि.२१/०२/२०१८ रोजी पत्र देऊन, त्यांचेकडून मार्गदर्शन मागविणेत आले. त्यानुसार ॲड. रमेश सोनी यांनी त्यांचेकडील दि.०१/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये त्यांचे मार्गदर्शन सादर केले असून, त्यांनी मे.लेजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशन करणेबाबत नमूद केले होते.

त्यानुसार मे. लेजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचे प्रकरणात चर्चा होऊन पुढील कार्यवाहीची रुपरेषा निश्चित करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयक्र.२३२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड. रमेश सोनी यानी केलेल्या मार्गदर्शनानुसार मे.लेजर व्हिजन लि., हॉगकॉग यांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही सुरु करणेत यावी. यासाठी कायदेतज्ञ समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली ख्यातनाम विधीज्ञामार्फत नोटीस द्यावी, असे ठरले व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.”

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार ॲड. रमेश सोनी यांचे मार्फत मे. लेजर व्हिजन लि., यांना नोटीस देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शन घेणेकामी त्यांचेकडे दि.१४/०७/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर विधी व न्याय विभागाचे दि.२०/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रस्तुत प्रकरणी अद्ययावत माहीती मागविणेत आली. त्यानुसार संस्थानचे दि.१७/०९/२०१८ रोजीचे पत्राने प्रस्तुत प्रकरणी अद्ययावत माहीती सादर करणेत आली होती.

विधी व न्याय विभागाचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्राने सदरहू प्रकरणी खालीलप्रमाणे मार्गदर्शन/अभिप्राय दिलेला आहे.

1. It is most clear as to the reasons for appointment of retired Justice for enquiring into the subject matter as the very issue is subjudice and seized by the Hon’ble High Court, Bench at Aurangabad.
2. Since, M/S. Laser vision Mega Media Ltd., Hong Kong, has issued notice for termination of the agreement; it is for the Sansthan to answer the notice.
3 It is not clear as to for which relief the Sansthan desires to go for the arbitration. As per clause 31 of the

Agreement dated 12th May 2011, the parties may go for Arbitration only after following Mediation. Therefore, in the first instance the parties will have to opt for Mediation in the event of a dispute.

4. The Sansthan will have to answer notice dated 19/06/2017, appropriately issued by M/s. Laservision Mega Media Ltd., Hongkong.

विभागाचा अभिप्राय- अ) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३२ अन्वये झालेल्या निर्णयानुसार M/s. Laservision Mega Media Ltd., Hongkongयांचे समवेत अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी असा निर्णय झालेला आहे.

ब) शासनाचे विधी व न्याय विभागाने दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रात क्र.३ नुसार लेलर व्हीजन यांचेबरोबर झालेल्या क्लॉज ३१ नुसार आर्बिट्रेशन करणेपुर्वी प्रथम Mediation साठी जाणे अनिवार्य आहे असे नमुद केले आहे.

क) मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कार्यवाही करावी अथवा शासनाचे दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रानुसार कार्यवाही करावी याबाबत मा.विश्वस्त श्री.जयकर साहेब व ॲडव्होकेट श्री.सोनी साहेब यांचेकडून अभिप्राय मागविणेत आला आहे.

वरील अ व ब बाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे असे मत आहे.

प्रस्ताव-मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३२ नुसार अर्बिट्रेशनची कार्यवाही करणेबाबत निर्णय झालेला आहे. आता शासनाचे याबाबत दि.१४/१२/२०१८ रोजीचे पत्रावरील १ ते ४ मुद्यांनुसार कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे साईगार्डन प्रकल्पासंबधी मे.लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांनी दिलेल्या टर्मिनेशन नोटीसीस अनुसरुन करारनाम्यातील तरतुदी प्रमाणे प्रथम मे.लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांना मिडीएशनची नोटीस द्यावी, असे ठरले. त्यासाठी राजस्थान उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश मा.श्री.पळशीकर यांना मिडीएटर म्हणून प्रस्तावीत करावे, असे समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी सुचविले, त्यास समितीने मान्यता दिली.**

**तसेच मे.लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांनी मिडीएशनसाठी तयारी न दर्शविल्यास करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे अर्बिट्रेशनची कार्यवाही करावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०४** **संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील स.नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे बांधकाम ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्टक्चर लि., पुणे यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम आदा करणेबाबत व शिर्डी बसस्थानक इमारतीचे औपचारीक उदघाटन मान्यवरांचे हस्ते करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद- अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतूद असल्याने महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. सासंवि २००६/६७/(८७) का. सोळा मंत्रालय, मुंबई -४०० ००३ दि. १३/०१/२००९ अन्वये शिर्डी येथील बसस्थानक अत्याधुनिक पध्दतीने बांधण्याकरीता रु. ७,६५,५०,८९८/- मात्र इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावना– शिर्डी येथील स.नं. १७१/१२ पै. मधील राज्य परिवहन महामंडळाचे जागेवर संस्थान निधीतून अद्ययावत बसस्थानक व त्यावर भक्तनिवास इमारतीचे बांधकाम करणेचे काम ठेकेदार पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांनीदि.२८/०२/२०१७ रोजी पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी सादर केलेल्या बारावे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी इकडील विभागामार्फत व आर्किटेक्ट यांचेमार्फत करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बील रक्कम रु.६,६३,७९,९२६/- मात्र मंजूर होऊन उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु. २४,२०,७७०/- मात्र अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर सदरहू सभेतखालीलप्रमाणे निर्णय क्र.६४८ संमत झाला आहे.

“ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या राज्य परीवहन महामंडळाचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे अंतिम बीलाची रक्कम रु. ६,६३,७९,९२६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील सर्व्हे नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे औपचारीक उदघाटन मान्यवरांचे हस्ते करण्यात यावे व त्यानंतर सदर कामाची उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.२४,२०,७७०/- मात्र पाटील कन्स्ट्रक्शन ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि., पुणे यांना आदा करणेत यावी, असे ठरले. ”

प्रस्ताव– तरी उपरोक्त निर्णयानुसार शिर्डी येथील स.नं.१७१/१२ मधील राज्य परिवहन महामंडळाचे जागेवर संस्थान निधीतून बांधण्यात आलेल्या इमारतीचे औपचारीक उदघाटन मान्यवरांचे शुभहस्ते करणेसाठी कार्यक्रमाचे स्वरुप, दिनांक, वेळ व मान्यवर आदि बाबी निश्चित होणेस तसेच ठेकेदार यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतुन बांधण्यात आलेल्या राज्य परिवहन महामंडळाचे शिर्डी येथील स.नं.१७१ मधील बसस्थानक व भक्तनिवास इमारतीमध्ये अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे काम सुरु असुन सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर व भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर बसस्थानक व भक्तनिवास इमारतीचे उदघाटन करण्यात यावे, तोपर्यंत ठेकेदार यांचे अंतिम बिलातील उर्वरीत देय रक्कम आदा करण्यात येऊ नये, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग )**

---

**विषय नं.०५** **नियोजीत नविन भांडार इमारत बांधकामाचे आर्किटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांचेमार्फत प्रकल्पाचे सादरीकरणाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय –

१. दि.०६ एप्रिल, २०१२ निर्णय क्र.३१८.

२. दि.२८ डिसेंबर, २०१५ निर्णय क्र.६५१.

३. दि.०८ जानेवरी, २०१८ निर्णय क्र.२१.

प्रस्तावना– मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१ अन्वये मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील संस्थान मालकीचे जागेमध्ये नवीन भांडार इमारतीचे बांधकाम करणेस व याकामी येणा-या १३.७१ खर्चास तसेच याकामी आर्किटेक्ट यांची नेमणूक करणेस मान्यता देणेत आलेली होती. त्यानुसार ई-प्रस्ताव मागवून प्रकल्प किंमतीच्या १ % दराने फीवर आर्किटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांची दि.०४/०८/२०१८ रोजीचे कार्यादेशाने प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. प्रकल्प सल्लागार यांनी याकामाचे प्राथमिक आराखडे तयार करुन रु.२२,३७,००,०००/- मात्र रकमेचे ढोबळ अंदाजपत्रक खालीलप्रमाणे सादर केले आहे.

| Sr.No. | Description | Area in sq.ft | Amount in Lakhs |
|---|---|---|---|
| STORAGE BUILDING | | | |
| 1 | FOUNDATION (Raft) | | 175.00 Lakhs. |
| 2 | BASEMENT FLOOR(Parking only) | 17216.00 | 254.00 " |
| 3 | GROUND FLOOR( Office & Store) | 17216.00 | 313.00 " |
| 4 | 1st Floor(Store) | 17216.00 | 320.00 " |
| 5 | 2nd Floor(Store) | 17216.00 | 341.00 " |
| 6 | 3rd Floor(Store) | 17216.00 | 357.00 " |
| 7 | TERRACE FLOOR(Stair & lift cabines ) | 1200.00 | 21.00 " |
| 8 | EXTERNAL SERVICES | | 456.00 " |
| | **TOTAL** | **87280** | **2,237.00 Lakhs** |
| **(Rupees Twenty Two Crores Thirty Seven Lakhs only)** | | | |

त्यासाठी सल्लागार यांचे समवेत चर्चा करुन आराखडे अंतिम करणेसाठी त्यांना दि.०५/१०/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलावण्यात आले होते. मात्र सल्लागरार यांचे सादरीकरण तयार नसल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नव्हते. त्यानंतर दि.०१/११/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादरीकरणासाठी उपस्थित राहणेसाठी कळविणेत आले होते. तथापी, उपस्थित राहण्यासाठी त्यांचेकडे कमी कालावधी असल्यामुळे उपस्थित राहू शकलेले नाही. आर्किटेक्ट यांचेमार्फत सादरीकरण तयार करणेत आलेले असून ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेत येत आहे.

प्रस्ताव– मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील संस्थान मालकीचे जागेमध्ये बांधणेत येणा-या नियोजित भांडार इमारतीचे आर्किटेक्ट बिनेश सुकुमार, कोची यांनी प्रकल्पाचे सादरीकरण करणेस व चर्चा होऊन निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष संपले असल्याने संस्थानला प्रशस्त स्वरुपाच्या मोठया भांडाराची आवश्यकता नाही, त्याकरीता वेअर हॉउस पध्दतीचे दोन मोठे गोडाऊन बांधण्यात यावे, त्यासाठी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग )**

---

**विषय नं.०६ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३ अन्वये मौजे निमगाव-कोऱ्हाळे येथील गट नं. १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम करणेकामी या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.डी.ओ.निकम, पुणे यांचे दर विश्लेषनाबाबत सादरीकरण व निविदा प्रक्रियेत अंतिम निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | मौजे निमगाव – को-हाळे येथील गट नं १८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम करणेकामी प्राप्त झालेल्या ई-निवीदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करून निर्णय होणेबाबत. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.६५१ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१५८,७४,१४,३९५/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कुल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांकरीता एकत्रित शैक्षणिक संकूलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील संस्थान मालकीचे गट नं.१८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत एकूण उभारणे प्रस्तावीत आहे.<br>मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे शासन निर्णय क्र.सासंवि/१०१८/९६९/ प्र.क्र.११०/ का.१६ दि.०८/१०/२०१८ अन्वये सदरहू प्रकल्पास व याकामी येणा-या रु.१५८.७४कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६५१ अन्वये सदरहूकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देणेत आली आहे. |
| ५) | निवीदा तपशील | दि.१५/११/२०१८ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई – निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.२९/११/२०१८ रोजी या कामासाठी प्रि-बीड मिटींग घेणेत आली. सदरहु सभेस १० कंपन्यांचे प्रतीनिधी उपस्थित होते. दि.२९/१२/२०१८ पर्यंतचे अंतिम मुदतीत ०३ निवीदाधारकांनी ई-निवीदा जमा केल्या होत्या. दि.०३/०१/२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेत तांत्रिक निवीदा उघडणेत आल्या असून तिनही निविदाधारक हे पात्र झाले आहेत. पात्र निविदांचा वाणिज्यीक लिफाफा दि.०७/०१/२०१९ रोजीच्या मा.खरेदी समितीच्या सभेपुढे उघडणेत आला आहे. |
| अ) | निविदा कालावधी | दि.१५/११/२०१८ ते दि.२९/१२/२०१९ |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.०३/०१/२०१९ सकाळी ११.०० वाजता. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०३ (तिन) |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय, जमा केले आहेत. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय? | होय.<br>रु.१,२६,९९,२००/- मात्र |
| ई) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१,२६,९९,२०००/- (अंदाजपत्रकीय रक्कम रु.१५८,७४,१४,३९५/- मात्र वर २०% कमी करुन) |
| ६) | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिलः | |

| अ.नं. | ठेकेदारचे नांव | निविदा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | भानु कन्सट्रक्शन, मुंबई | २६०,४८,६२,५०४/- | -- |
| २. | जेनेरीक इंजीनियरींग कन्सट्रक्शन ॲण्ड पा्रजेक्ट्स ली., मुंबई | २६५,१२,४२,०५५/- | -- |
| ३. | **मे. न्याती इंजीनियर्स ॲण्ड कन्सलटंट, पुणे** | **२२८,०२,१५,०४३/-** | **निम्नतम** |

| | | |
|---|---|---|
| ७) | निम्नतम निविदा धारकाचा तपशिल - | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | **मे. न्याती इंजीनियर्स ॲण्ड कन्सलटंट, पुणे** |
| ब) | निविदा रक्कम | **रू.२२८,०२,१५,०४३/-** |
| क) | निविदा टक्केवारी कमी / अधिक | ४३.६४३ % अधीक |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. |

| | | |
|---|---|---|
| | अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | |

वरील प्रमाणे प्रसताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आला असता त्यावर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय समंत झाला आहे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं’ १८/३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्प्लेक्सचे बांधकामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. १५८,७४,१४,३९५/- इतकी होती. मात्र निविदा प्रक्रियेत प्राप्त निम्नतम निविदा रक्कम रु. २२८,०२,१५,०४३/- ऐवढ्या रक्कमेची म्हणजे ४३.६४% अधिक रक्कमेची प्राप्त झालेली आहे. यावेळी सभेपुढे प्रकल्पाचे आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे हे उपस्थितीत होते. अंदाजपत्रकीय रक्कम व प्राप्त निविदेतील रक्कम यातील तफावतीबाबत आर्किटेक्ट श्री. निकम यांना विचारणा केली असता, सदर तफावत ही प्रामुख्याने जी.एस.टी. रकमेतील फरक व सन २०१७-१८ व २०१८-१९ च्या दरसुचीतील (SSR) फरकामुळे झाली आहे, असे नमूद केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट श्री. निकम यांनी नमूद केलेप्रमाणे तफावतीबाबतची सविस्तर परिगणना करुन व कारणमिमांसा नमूद करुन सविस्तर अहवाल समितीच्या पुढील सभेपुढे सादर करावा तसेच निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक मे. न्याती इंजिनियर्स अॅण्ड कन्सल्टंट, पुणे यांना समितीचे पुढील सभेसमोर चर्चेसाठी बोलवावे, असे ठरले.”

तरी मा. व्यवसथापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२३ अन्वये मौजे निमगांव- को-हाळे येथील गट नं.१८३ पै. मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक कॉम्पलेक्सचे बांधकाम करणेकामी या प्रकल्पाचे आर्किटेक्ट श्री.डी.ओ. निकम, पुणे यांचे दर विश्लेषनाबाबत सादरीकरण पाहुन निविदा प्रक्रीयेत अंतिम निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४४ **आर्किटेक्ट श्री. डी. ओ. निकम आजचे सभेपुढे हजर होते. त्यांनी सभेपुढे सांगितले की, सदर कामाचे मुळ इस्टीमेटसन २०१७-१८ च्या राज्य दर सूचीनुसार रु.१५८.७४ कोटी मात्र इतक्या रकमेचे होते. परंतु या अंदाजपत्रकाची सन २०१८-१९ चे SSR दरानुसार फेर तपासणी केली असता या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.२०८,९२,४१,८९२/- इतकी येत असल्याचे नमूद करुन याबाबतचा सविस्तर लेखी अहवाल सभेपुढे सादर केला.**

**त्यानुसार मंजूर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा सुधारीत अंदाजपत्रकामध्ये रु.५०.१८ कोटी इतकी तफावत दिसून येत आहे. यावेळी आर्किटेक्ट यांनी तफावतीची कारणमिमांसा व तपशिलाबाबत सदर सभेपूढे खालीलप्रमाणे सविस्तर माहिती दिली.**

**“मुळ प्रशासकिय मान्यता प्राप्त अंदाजपत्रक रु.१५८.७४ कोटी रकमेचे आहे. सदरचे अंदाजपत्रक सन २०१७-१८ च्या राज्य दर सूचीमधील दरानुसार तयार करणेत आले होते. यामध्ये कामाच्या एकूण किंमतीच्या रु.११४,८२,२०,१७९/- या रकमेवर खालील बाबी गृहीत धरुन इस्टीमेट तयार करणेत आले आहे.**

| SR NO. | BUILDING TYPE | COST AS PER 2017-18 SSR |
|---|---|---|
| | TOTAL COST | 1148220179.26 |
| | Increase in Quantity | |
| | TOTAL COST | 1148220179.26 |
| | 10% Increase in SSR | 114822017.93 |
| | Add 10% Escalation | 114822017.9 |
| | Technicalscrutiny Charges 1.25% | 14352752.24 |
| | Add GST 12% (As per Government) | 137786421.5 |
| | Add GST 18% (As per Sansthan) | |
| | Add Contingencies 5% | 57411008.96 |
| | TOTAL PROJECT COST | 1587414397.83 |

सन २०१८-१९ च्या राज्य दर सूचीनुसार सदरचे अंदाजपत्रकाची रक्कम एकूण किंमतीच्या सुमारे रु.५०,१८,२७,४९५/- मात्रने वाढलेले आहे.

| SR NO. | BUILDING TYPE | COST AS PER 2017-18 SSR | COST AS PER 2018-2019 SSR |
|---|---|---|---|
| | TOTAL COST | 1148220179.26 | 1374297544.00 |
| | Increase in Quantity | | 181934778.30 |
| | TOTAL COST | 1148220179.26 | 1556232322.30 |
| | 10% Increase in SSR | 114822017.93 | |
| | Add 10% Escalation | 114822017.9 | 155623232.2 |
| | Technicalscrutiny Charges 1.25% | 14352752.24 | 19452904.03 |
| | Add GST 12% (As per Government) | 137786421.5 | |
| | Add GST 18% (As per Sansthan) | | 280121818 |
| | Add Contingencies 5% | 57411008.96 | 77811616.12 |
| | TOTAL PROJECT COST | 1587414397.83 | 2089241892.69 |

खालील बाबींमुळे अंदाजपत्रकीय रकमेत वाढ झालेली आहे.

मंजूर अंदाजपत्रकीय रक्कम रु.१५८.७४ कोटी मध्ये १२% दराने होणारी GST रक्कम रु.१३,७७,८६,४२१/- मात्र समाविष्ट आहे. तसेच सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.२०८.९२ यामध्ये १८% दराने रु.२८,०१,२१,८१८/- मात्र इतक्या GST रकमेचा समावेश आहे. अशा प्रकारे GST रकमेवर रु.१४,२३,३५,३९७/- इतकी वाढ होत आहे.

मंजूर अंदाजपत्रक हे सन २०१७-१८ चे SSR दरानुसार तयार करण्यात आले होते. आता सुधारीत अंदाजपत्रक हे सन २०१८-१९ चे SSR दरानुसार तयार करणेत आले आहे. त्यानुसार अंदाजपत्रकात रु.११,१२,५५,३४६/- मात्र इतकी आहे.

मंजूर अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यानंतर अग्निशमन ना- हरकत प्रमाणपत्र मिळाले नुसार नकाशांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या. सर्व इमारतीचे पॅसेजला सिरॅमिक टाईल्स डॅडो बसविणे, पॅसेजला ग्रॅनाईट फ्लोरींग बसविणे व बेसमेंटला पेनेट्रॉन वॉटर प्रुफींग व इतर काही बाबींच्या परिमाणात बदल झाल्यामुळे अंदाजपत्रकाची रक्कम रु.२४,३४,२९,१११/- मात्र रकमेने वाढली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्किटेक्ट डि. ओ. निकम यांनी सादर केलेले रु.२०८/- कोटी मात्रचे सुधारित अंदाजपत्रक व अभिप्राय विचारात घेऊन निम्नतम दराचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, पुणे यांना सदर कामाचे चर्चा वाटाघाटी सभेपुढे बोलविण्यात आले चर्चेदरम्यान निम्नतम दराचे ठेकेदार मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, पुणे यांनी दर कमी करुन सदर काम रु.२१८ कोटी मात्र इतक्या रकमेत करण्याची तयारी दर्शविली. चर्चा वाटाघाटी अंती मान्य केलेले सदर रक्कम रु.२१८ कोटी मात्र दर मान्य करण्यात आले.त्याप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक राज्य शासनाचे सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात यावे, तसेच मे. न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कन्सलटंट, पुणे यांना त्यांची चर्चा वाटाघाटी अंती मान्य केलेले रु.२१८/- कोटी मात्र या दराने कार्यादेश देणेसाठी शासनाची मान्यता घ्यावी व त्यानंतर कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग )

---

विषय नं.०७ संस्थानचे मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता ९००mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणे अथवा अन्य सल्लागारांचे नियुक्तीसाठी RFP प्रस्ताव मागविणेकरीता मान्यता देणे.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :- अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणते ही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. तसेच पोट कलम १ (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

प्रस्तावना:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. २४५/०१ मध्ये देणगीदार साईभक्त यांचे देणगीतून पाणीपूरवठा विभागामार्फत नविन साठवण तलावाची निर्मिती करणेत येत आहे. सदरहू तलावाचे काम अंतिम टप्प्यात असून याबाबत पाणीपूरवठा विभागाने दि.०७/०१/२०१९ च्या आदेशान्वये इकडील विभागास खालील कामे पूर्ण करुन त्याबाबतचा लेखी अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे.

अ) साठवण तलावात पाणी घेणेकरीता ९०० एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणेबाबत इस्टीमेट तयार करुन कार्यवाही करणे. (९०० एमएम व्यासाची पाईप लाईन टाकणे, मीटर रुम बांधणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट तयार करणे व ठिकठिकाणी चेंबरचे बांधकाम करणे).

ब) नविन साठवण तलाव निमगांव को-हाळे गट नं. २४५/१ ते जुना साठवण कनकुरी फिल्टर प्लॅन्टपर्यंत पाईप लाईन टाकणेकरीता नाली खोदाई करणे.

विभागाचा अभिप्रायः- पाणीपूरवठा विभागाने नमूद केलेली उपरोक्त कामे करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाहीचे टप्पे पूर्ण करणे आवश्यक आहे.

१) कॅनॉल, नविन साठवण तलाव, जुना साठवण तलाव यांचे लोकेशन, अलाईनमेंट व लेव्हल घेणेसाठी टोटल स्टेशन सर्व्हे करणे.

२) पाईप लाईन डिझाईन करणे, इनटेक वेल तयार करणे, मीटर रुमचे प्लॅन व डिझाईन करणे, वॉटर फ्लो मीटर, कॅनॉल गेट डिझाईन करणे, मोजमापासह नकाशे तयार करणे इ.

३) वर नमूद कामांचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रीक मान्यता घेणे व मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे.

४) ई-निविदा प्रक्रिया राबविणे.

वर नमूद कामे ही वैशिष्टयपूर्ण (Specialized) स्वरुपाची असून त्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ बांधकाम विभागाकडे उपलब्ध नाही. या स्वरुपाच्या कामांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हा शासनाचा तज्ञ विभाग आहे.

महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२१/१२/२०१८ अन्वये कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेल्या वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगाव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पूरवठा योजना टप्पा क्रं.०१ चे कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेत आली आहे. वर नमूद कामे याच योजनेशी संलग्न असल्याने सदर योजनेच्या धर्तीवर वरील कामांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करता येईल अथवा अन्य सल्लागाराची नियुक्ती करावयाची झाल्यास त्यासाठी e-RFP प्रस्ताव मागविता येतिल.

प्रस्तावः- तरी वर नमूद कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणे अथवा अन्य सल्लागाराचे नियुक्तीसाठी e-RFP प्रस्ताव मागविणेसाठी निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.२४५/१ मधील नवीन साठवण तलावामध्ये पाणी घेणेकरीता ९००mm व्यासाची पाईपलाईन व इतर अनुषंगीक कामे करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी त्यांना आदा करावयाचे फी बाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०८** **शिर्डी शहरातील २४ रस्ते विकसनासाठी शिर्डी नगरपंचायतीस रु.८.९७,८२,३००/- इतका निधी आदा करणेस तसेच याकामी गुणवत्तानियंत्रणासाठी " तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था" संस्थानमार्फत नियुक्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम२००४मधील तरतुद : अधिनियम कलम२१(२) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"...पोटकलम (१) आणी (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डीनगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."

मा. व्यवस्थापन समिती निर्णय :

१. निर्णय क्रमांक ९५१ दिनांक १४/११/२०१७.

" .. आजचे सभेत उपरोक्त विषयावर चर्चा करणेसाठी शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते, त्यांनी सभेसमोर शिर्डी शहरातील२७ रस्ते करावयाचे आहेत, अशी माहिती सभेसमोर दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील २७ रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी मात्र आर्थिक अनुदान शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी छाननी समितीच्या पुर्वपरवानगीने महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

२. निर्णय क्रमांक ७७ (ब)(७) दिनांक ०२/०२/२०१८ अन्वये सभेमध्ये झालेली चर्चा.

“.. समक्ष रस्त्यांची स्थळ पहाणी करणे हे छाननी समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये येत नाही, ही बाब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली. याची नोंद घेण्यात आली.”

मा. छाननी समितीचे सभेतील निर्णय :

१) निर्णय क्रमांक २६ दिनांक १९/०१/२०१८

“.. यावर सविस्तरचर्चाहोऊन,खालीलप्रमाणे निर्णय घेतला.

प्रस्तावीत रस्त्यांच्या विकसनासाठी व त्याची आवश्यकता व उपयुक्ततेबाबत श्री.आर.एस.घुले, कार्यकारी अभियंता, श्री.आर.बी.आहेर,उप कार्यकारी अभियंता, श्री.डी.एम.देसाई, उप अभियंता, श्री.आर.डब्ल्यु.भामरे, उप अभियंता, श्री.जी.एस.जाधव, कनिष्ठ अभियंता या बांधकाम विभागाच्या अभियंत्यानी प्रत्यक्ष पहाणी करून तसा अहवाल छाननी समितीसमोर ठेवावा. तसेच शताब्दी वर्षा निमित्ताने भक्तांची गर्दी लक्षात घेवून, रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी मात्र खर्च करण्यास छाननी समिती एकमताने मंजूरी देत आहे. तत्पुर्वी संस्थानमार्फत सर्व निविदा प्रक्रिया करण्यात यावी व कामाचे वाटप, ठेकेदाराला कामाच्याप्रगतीनुसार रकमेचे प्रदान करण्यात यावे. सदरहु काम व्यवस्थित झाले किंवा नाही व सर्व सहयोग/निगराणी नगरपंचायत करेल.”

२) निर्णय क्रमांक ३० दिनांक ०९/०४/२०१८

“.. उपरोक्त प्रस्ताव चर्चेअंती मंजूर करण्यात आला. याअगोदर शिर्डी नगरपंचायतीने दि.१५.०१.२०१८ रोजी केलेल्या खुलाशाप्रमाणे श्री साईबाबा संस्थानद्वारे नमूद केलेली कामे करणेसाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेस व संस्थाननेच सर्व कामे करणेस शिर्डी नगरपंचायतीची हरकत नाही असे कळविण्यात आले आहे. परंतु संस्थानचे अधिका-यांकडून असे दाखविण्यात आले की, सध्या शताब्दी वर्षामुळे माठया प्रमाणावर संस्थानच्या विविध इमारतींची दुरूस्ती-देखभालीची कामे सुरु आहे व उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ अपुरे आहे. त्यामुळे २४ रस्ते विकसनाची कामे शिर्डी नगरपंचायतीतर्फे करण्यात यावीत.

जी कारणे संस्थानतर्फे दर्शविण्यात आलेली आहेत, ती छाननी समितीला संयुक्तिक वाटत नाहीत. जी २५ कामे चालू असल्याबद्दल लिहीले आहे, त्यापैकी बहुतांश कामे हि निविदा काढून अथवा कंत्राटी पद्धतीने दिलेली आहे. डांबरीकरणाचे काम, रंगकाम हे बहुतांशी होत आलेले आहे. त्यामुळे संस्थानचे अधिकारी २४ रस्त्यांचे विकसनाचे कार्यास उपलब्ध राहू शकत नाहीत, हे म्हणणे अयोग्य आहे. सर्व कार्यात पारदर्शकता राहावी व संस्थानला देणगीतून मिळालेला पैसा योग्य मार्गाने खर्च व्हावा म्हणून २४ रस्ते विकसनाचे कार्य अथवा भविष्यात जे ३ रस्ते विकसीत करावयाचे आहे, त्यांचेही कार्य संस्थानचे अधिपत्याखाली / निगरानीखाली निविदा प्रक्रिया राबवून व्हावे, असे छाननी समितीला वाटते, याबाबत शासनमान्यता घ्यावी असे ठरले.”

प्रस्तावना -शिर्डी नगरपंचायतीने दि.२०/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावात एकुण २७ रस्ते विकसनासाठी रु.१०.०१८ कोटी इतके अनुदान मिळणेबाबत विनंती केली होती.

सदरहु प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीने दि. १४/११/२०१७ रोजीचे सभेत मान्यता दिलेली आहे. मा. छाननी समितीचे सभेतील नि.क्र.२६ दि.१९/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी सदरचे २७ रस्त्यांचे दि.२२/०२/२०१८ रोजी समक्ष पाहणी केली. त्यानुसार सदरहु पाहणी अहवाल मा. छाननी समितीचे सभेसमोर सादर करण्यात आला. दरम्यान शिर्डी नगरपंचायतीने दि. २६/०३/२०१८ रोजीचे पत्रान्वये २७ ऐवजी खालील ३ रस्ते त्यांचेसमोर नमूद केलेल्या कारणांमुळे या प्रकल्पातून वगळले असून, उर्वरीत एकूण २४ रस्ते विकसित करणेसाठी सन २०१७-१८ चे प्रचलित ई-दरसूचीनुसार तयार केलेले रु.१०.०१८ ऐवजी रु.८,९७,८२,३००/-रकमेचे अंदाजपत्रक मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाचे तांत्रिक मान्यतेसह सादर केले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | रस्त्याचे नाव | लांबी मी. | रुंदी मी. | कामाची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| १. | ओमसाईनगर मुख्य रस्ता (कोळेकर गल्ली चौक ते निमगाव-निघोज शिव रस्ता)–डांबरीकरण व कॉक्रीटीकरण करणे. | ५५३ | ४.५ | ४१,५२,०००/- |
| २. | स.नं. १११मधील गायकवाड वस्ती (बन रस्ता पुर्व व पश्चिम बाजु रस्ता) डांबरीकरण करणे. | ४०० | ४.५/६.० | ३३,९१,५००/- |
| ३. | स.नं. १११मधील पावलस गायकवाड वस्ती रस्ता (बन रस्ता पुर्व बाजु रस्ता) कॉक्रीटीकरण करणे. | ११० | २.८ | ९,९४,५००/- |
| ४. | पटेल कॉलनी रस्ता (१५ मी.डीपी रस्ता ते नगर मनमाड रस्ता) डांबरीकरण करणे. | २१० | ४.५ | १९,७७,९००/- |
| ५. | स.नं.१२३मधील संदिप पारख लेआऊटमधील रस्ता ( न. म. रस्ता ते 12 चारी रस्ता ) डांबरीकरण करणे. | २७५ | ८.० | ४६,२४,५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | स.नं.१४६मधील लेआऊट मधील रस्ता ( नांदूर्खीरस्ता ते कॉलनी) डांबरीकरण करणे. | ३१० | ४.५ | ३०,३८,७००/- |
| ७. | झुलेलाल मंदीर लगत रस्ता (नाला रस्ता ते रमेश गोंदकर). | १४० | ५.५ | १८,१०,९००/- |
| ८. | माऊली नगर तुषार गोंदकर लगत रस्ता( इनामवाडी ते तुषार गोंदकर वस्ती) डांबरीकरण करणे. | २८० | ३.५ | २०,६७,४००/- |
| ९. | शिंदे वस्ती लगत रस्ता(चारी रस्ते रुई शीव रस्ता) डांबरीकरण करणे. | ४९० | ४.५ | ३५,७७,६००/- |
| १०. | साई पंढरीनगर रस्ता( स.नं. २७) अंतर्गत पुर्व पश्चिम रस्ता डांबरीकरण करणे. | ४२० | ४.५ | ३८,९६,४००/- |
| ११. | पिंपळवाडी रस्ता ते एस.टी.पी.प्रकल्प रस्ता डांबरीकरण करणे. | ८१० | ७.० | ९०,४२,२००/- |
| १२. | नवनाथ शेळके वस्तीलगत रस्ता (बिरेगावरस्ता ते वसाहत) डांबरीकरण करणे. | १४० | ३.५ | १०,७४,१००/- |
| १३. | भाऊसाहेब गायक वस्ती लगत रस्ता (पिंपळवाडीरस्ता ते भाऊसाहेब गायके वस्ती) डांबरीकरण करणे. | २२० | ३.५ | १६,४४,५००/- |
| १४. | सम्राटनगर रस्ता (पिंपळवाडीरस्ता ते सम्राटनगर) डांबरीकरण करणे. | २०० | ३.५ | १४,९४,७००/- |
| १५. | स.नं.४२मधील रस्ता (बिरेगावरस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे.-कांदळकर वसाहत | ७१० | ६/४.५ | ७७,१६,७००/- |
| १६. | साई प्रयगा सिटी. स.नं.६५(नालारस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे. | ५३० | ९/४.५० | ८७,४२,४००/- |
| १७. | स.नं.६६कॉलणी रस्ते (नालारस्ता ते वसाहत अंतर्गत रस्ते) डांबरीकरण करणे. | ४१० | ३.५ | २९,८८,६००/- |
| १८. | स. नं. ९० मधील मधुकर कोते लगत रस्ते (नाला रस्ते कोते वस्ती दोन रस्ते) डांबरीकरण करणे. | ३२५ | ३.५ | २२,३१,०००/- |
| १९. | स. नं. ७२ बर्डे वस्ती रस्ता (बिरोबा मदिर चौफुली ते बर्डे वस्ती ) डांबरीकरण करणे.**भाग -१** | ५०० | ५.५ | ४८,२७,१००/- |
| | स.नं.७२ बर्डे वस्ती रस्ता (साईट नं.५३ ते बर्डे वस्ती ) डांबरीकरण करणे.**भाग -२** | ८२० | ४.५० | ७७,६८,९००/- |
| २०. | शरद बाबा आश्रम रस्ता (नविन पिंपळवाडी रस्ते ते साईपदम आश्रम)डांबरीकरण करणे. | २७५ | ४.५/७.० | ३१,४२,७००/- |
| २१. | विजयशेळके वस्ती ( संभाजीनगर समोर) रस्ता (बन रस्ता ते शेळके वस्ती)डांबरीकरण करणे. | ३०० | ३.५ | २२,६६,२००/- |
| २२. | स.नं.९७विरभद्रनगर रस्ते (बन रस्ता ते विरभद्र कॉलनी – २ रस्ते ) डांबरीकरण करणे. | ५१० | ४.० | ४१,८८,४००/- |
| २३. | स.नं.१२२मधील जेजूरकर वस्ती रस्ता(स्वामी रिसोर्ट लगत रस्ता ते जेजूरकर वस्ती)डांबरीकरण करणे. | २३० | ३.५ | १८,२२,५००/- |
| २४. | स.नं.१३४मधील विजयनगर रस्ता (नांदूर्खी रस्ता ते कॉलनी) डांबरीकरण करणे. | १७० | ३.५० | १३,००,९००/- |
| | **रस्त्याची एकुण लांबी** | ९.३३८ कि.मी. | - | ८,९७,८२,३००/- |

वरिल प्रमाणे २४ रस्त्याच्या कामांस शिर्डी नगरपंचायत यांना अनुदान उपलब्ध करुन देणेसाठी तसेच, सदरहु रस्त्याचे कामे संस्थानमार्फत हाती घेणेकरीता संस्थानकडील तांत्रीक मनुष्य बळ, शताब्दी निमित्त चालू असलेली व प्रस्तावीत विकास कामे मोठ्या प्रमाणात असल्याने सदरहू रस्त्याचे कामे शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत करण्यात यावी असा प्रस्ताव मा. छाननी समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यावर मा. छाननी समितीचे दि.०९/०४/२०१८ रोजीचे सभेत नि. क्र.३० उपरोक्तप्रमाणे निर्णय संमत झालेला आहे.

त्यानुसार शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी इकडील दि.२४/०४/२०१८ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यास शासनाचे विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र. सासंवि-१०१८/८१४/प्र.क्र.७१ /का.१६ दि.१० जानेवारी २०१९ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे.

"..शिर्डी शहरातील २४ रस्त्यांच्या विकसनासाठी रु.८.९८ कोटी इतके अनुदान शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करून देण्यास तसेच कामे निविदा प्रकीयेसह शिर्डी नगरपंचायतीमार्फत करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

अट–सदर शिर्डी शहरातील २४ रस्त्यांची गुणवत्ता राखली जाईल, यांसाठी "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था " श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत नियुक्त करण्यात यावी...."

तरी उपरोक्त शासनमान्यतेनुसार शिर्डी नगरपंचायत यांना एकुण २४ रस्ते विकसीत करणेसाठी रु.८,९७,८२,३००/-इतका निधी अदा करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. शासननिर्णयानुसार याकामी गुणवत्ता नियंत्रणासाठी "तांत्रिक तपासणी त्रयस्थ संस्था " संस्थानमार्फत नियुक्त करणेकामी प्रस्ताव मागविणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४६** **सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०९** **मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT) तत्वावर उभारणेकामी E-RFP (E-Request for Proposal) मसुद्यास अंतिम स्वरुप देणे व त्यानुसार E-RFP प्रस्ताव मागविणेस मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) पोटकलम (२) खंड (ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब) कलम १७ (३)-विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहीत झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्यशासनाच्या लेखी पुर्व मंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टया देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही.

क )कलम २१ (समितीकडून विश्वस्त निधीचा विनियोग) -

1. पोटकलम(१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;
2. पोटकलम(१)खंड(झ) - विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१) दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२२. –" साईसृष्टी, प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियम (Sai Knowledge Park) प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे अॅन्ड असोशिएट्स, मुंबई यांचे प्रतिनीधीनी आजचे सभेत सदरहु प्रकल्पाचे सादरीकरण केले. यावर चर्चा होवून असे ठरले की, सल्लागार संदीप शिक्रे अॅन्ड असोशिएट्स, मुंबई यांनी शिर्डी येथे येवून, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सदर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण करावे व त्यानंतर या प्रकल्पासाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेबाबत पुढील कार्यवाही करणेत यावी."

२) दिनांक ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७१. - सदहु प्रकल्पास येणारे अंदाजे रु.१४१.०० कोटीचे कामास शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच शासन मान्यतेनंतर "Design, Build, Finance, Operation & Transfer (DBFOT)" तत्वावर ई-निविदा मागविणेबाबतचे प्रस्तावावर "...सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली."

३) दिनांक ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६. - "..यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी एकुण रक्कम रु.१६६.३९ कोटी इतके सुधारीत प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली. व सदरचा प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले."

४) दिनांक ०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४७.-" साई नॉलेज पार्क प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)'तत्वावर राबविणेकामीच्या प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे सभेपुढे उपस्थित होते. सदस्यांनी सदरच्या प्रकल्पासंदर्भात विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देता आली नाही. तरी साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना चर्चेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले."

५) दिनांक २०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१५.-" साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲंड असोशिएट्स, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. प्रसाद सावंत व श्री. सागर रांगणेकर यांनी आजचे सभेपुढे सदरहू प्रकल्पासाठी "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावरील Request for Proposal च्या मसुद्याचे सादरीकरण केले. यावेळी खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

1. सदरचा ई-प्रस्ताव DBFOT तत्वावरील असल्याने प्रकल्पाचे किंमतीत सल्लागार फी, कॉटिन्जन्सीज,WCE व २ वर्षातील भाववाढ इ. बाबी समाविष्ट न करता प्रकल्पाची निव्वळ किंमत रु.१४१.००कोटी गृहीत धरणेत यावी.
2. संस्थानला प्रती दिवस ३०० तिकीटे विनामुल्य देण्यात यावे.
3. e-RFP फी व bid security चे पेमेंट online करणेबाबत e-RFP मध्ये नमूद करावे.
4. तिकिटाचे दर खालीलप्रमाणे असावेत.
    - फक्त साईसृष्टी साठी रु.१५०/ प्रती व्यक्ती
    - सायन्स प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियमसाठी एकत्रित रु.२०० / प्रती व्यक्ती
    - सर्व समावेशक एकत्रित रु.२५०/ प्रती व्यक्ती
    - शैक्षणिक सहली व १२ वर्षाखालील मुलांसाठी ५०% सुट असावी.
5. निविदा सादरकर्त्याचे पुर्वपात्रतेचे निकषामध्ये खालील अटींचा समावेश करावा.
    - Experience of having successfully completed similar works during last 10 years ending 31st March, 2017 should be either of the following.

a. One similar completed work costing not less than the amount equal to Rs. 85 crores.

b. Or two similar completed works each costing not less than the amount equal to Rs.71 crores.

c. Or three similar completed works each costing not less than the amount equal to Rs.57 crores.

- Bidder should have average annual financial turnover of value not less than Rs.85 Crores.
- Bidder should have a solvency of value not less than Rs.71 Crores. The bidder will be required to submit the bank certificate.

6. Mandatory Consession fee रु.1.00 कोटी करावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील बाबींचा व आवश्यक अटीशर्तींचा समावेश करून सल्लागार यांनी जाहिरात व ई-निविदांच्या सुधारीत प्रस्तावाच्या मसुद्याचे सल्लागार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादरीकरण करावे व त्यानंतर सदरचा मसुदा मान्यतेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले."

शासन मान्यता:- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, निर्णय क्र. सासवि-१०१८ /१०४७ /प्र.क्र.११२ / का. १६ दि.१६/१०/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

"... श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)(सुधारणा) अधिनियम २००४ च्या कलम १७ (३) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधिल सुमारे २० एकर जागेत साई नॉलेज पार्क (DBFOT) तत्वावर राबविण्यास या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) साई नॉलेज पार्क उभारण्यासाठी विहित तरतूदींनुसार निविदा मागविण्यात याव्यात.

२) संस्थानाच्या जमीनीव्यतिरिक्त संस्थानाच्या अन्य कोणत्याही संसाधनांचा वापर केला जाणार नाही.

३) साई नॉलेज पार्क (DBFOT) तत्वावर उभारण्यासाठी विहित पद्धतीने निवड करण्यात आलेली संस्था व साईबाबा संस्थान यांच्यामधील करारनामा शासनमान्यतेने करण्यात यावा..."

प्रस्तावना:- मौजे निमगांव को-हाळे येथील उपरोक्त जागेतील प्रस्तावित साई नॉलेज पार्क प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना इकडील दि. ०९/१०/२०१७ अन्वये नेमणूकपत्र देण्यात आले आहे. सल्लागार यांनी दि.०९/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रकल्पाचा रु.१६६.३९ कोटी मात्र रकमेचा DPR सादर केला आहे. त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६ अन्वये मान्यता देणेत आली आहे. सदर मान्यतेनुसार साई नॉलज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी शासन मान्यता मिळणेसाठी दि.११/०६/२०१८ अन्वये सादर केलल्या प्रस्तावास वर नमुद दि.१६/१०/२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता मिळालेली आहे. या प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांनी सादर केलेला e-RFP Document चा मसुदा मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व मा. सदस्यांना दि.१९/११/२०१८ चे ई-मेलद्वारे पाठविण्यात आला आहे. दि.०१/११/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णय क्र.६४७ अन्वये ठरलेनुसार साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे, मुंबई यांनी दि. २०/११/२०१८ रोजी

झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादरीकरण केले आहे. त्यावर सदरहु सभेत वरीलप्रमाणे निर्णय क्र.७१५ संमत झाला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार सल्लागार यांचे प्रतिनिधी श्री. संदिप शिक्रे, श्री. प्रसाद सावंत व श्री. सागर रांगणेकर यांनी दि.०५/०१/२०१९ रोजी शिर्डी येथे येऊन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रकल्पाचे ई-निविदेबाबत सादरीकरण केले आहे. त्यावेळी देण्यात आलेल्या सूचना व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णय विचारात घेऊन सल्लागार यांनी दि.०५/०१/२०१९ चे ई-मेलद्वारे e-RFP Document चा सुधारीत मसुदा सादर केला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१५ मधील अटीशर्ती व उपरोक्त दि.०५/०१/२०१९ रोजीचे सादरीकरणाचे वेळी सुचविलेले बदल यांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दा | मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१५ अन्वये ठरलेल्या अटीशर्ती | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोरील दि.०५/०१/२०१९ रोजीचे सादरीकरणाचे वेळी सुचविलेले बदल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रकल्पाची निव्वळ किंमत | सदरचा ई-प्रस्ताव DBFOT तत्वावरील असल्याने प्रकल्पाचे किंमतीत सल्लागार फी, कॉटिन्जन्सीज, WCE व २ वर्षातील भाववाढ इ. बाबी समाविष्ट न करता प्रकल्पाची निव्वळ किंमत रु. १४१.०० कोटी गृहीत धरणेत यावी. | बदल नाही. |
| ०२. | e-RFP फी व bid security चे पेमेंट online करणे | e-RFP फी व bid security चे पेमेंट online करणेबाबत e-RFP मध्ये नमूद करावे. | e-RFP फी व bid security चे पेमेंट online / Demand draft द्वारे करणेबाबत e-RFP मध्ये नमूद करावे. |
| ०३. | तिकिटाचे दर | तिकिटाचे दर खालीलप्रमाणे असावेत.<br>● फक्त साईसृष्टीसाठी रु.१५०/ प्रती व्यक्ती<br>● सायन्स प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियमसाठी एकत्रित रु.२०० / प्रती व्यक्ती<br>● सर्व समावेशक एकत्रित रु.२५०/ प्रती व्यक्ती<br>● शैक्षणिक सहली व १२ वर्षाखालील मुलांसाठी ५०% सुट असावी.<br>● संस्थानला प्रती दिवस ३०० तिकीटे विनामुल्य देण्यात यावे. | तिकिटाचे दर खालीलप्रमाणे असावेत.<br>● सायन्स प्लॅनेटोरियमसाठी एकत्रित रु.२०० / प्रती व्यक्ती<br>● साईसृष्टी म्युझियम व वॅक्स म्युझियमसाठी एकत्रित रु.१५०/ प्रती व्यक्ती<br>● सर्व समावेशक एकत्रित रु.३००/ प्रती व्यक्ती<br>● फक्त लॅन्डस्केपिंग गार्डनसाठी प्रवेश रु.५०/ प्रती व्यक्ती<br>● शैक्षणिक सहली व १२ वर्षाखालील मुलांसाठी ५०% सुट असावी.<br>● संस्थानला प्रती वर्ष १०८०० तिकीटे विनामुल्य देणे.<br>● उपरोक्त फीमध्ये दर ३ वर्षानंतर १०% पर्यंत बदल करता येतील. त्यापेक्षा अधिक बदल करणेसाठी संस्थान व्यवस्थापन समितीची परवानगी आवश्यक राहील. |
| ०४. | निविदा सादरकर्त्याचे पुर्वपात्रतेचे निकष | खालील अटींचा समावेश करावा.<br>● Experience of having successfully completed similar works during last 10 years ending 31st March, 2017 should be either of the following.<br>a. One similar completed work costing not less than the amount equal to Rs. 85 crores.<br>OR<br>b. two similar completed works | खालील अटींचा समावेश करावा.<br>● Experience of having successfully completed similar works during last 10 years ending 31st March, 2018 should be either of the following.<br>a. NO CHANGE.<br>OR<br>b. NO CHANGE.<br>OR<br>c. NO CHANGE. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | each costing not less than the amount equal to Rs.71 crores.<br>OR<br>c. three similar completed works each costing not less than the amount equal to Rs.57 crores.<br>• Bidder should have average annual financial turnover of value not less than Rs.85 Crores.<br>• Bidder should have a solvency of value not less than Rs.71 Crores. The bidder will be required to submit the bank certificate. | • 5 Yearly average annual turnover of the bidder for ending 31st March of the year 2018 financial year should not be less than Rs.71 crores. (75% of Estimated cost of the project per year)<br>• NO CHANGE. |
| ०५. | Mandatory Concession fee | Mandatory Concession fee रु.1.00 कोटी करावी. | Mandatory Concession fee रु. 55 लक्ष – सदरची रक्कम प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला जमा करणे आवश्यक राहील. |
| ०६. | Performance security Deposit | -- | Performance Security by selected bidder –Rs.14.10 crores (प्रकल्पाच्या अंदाजपत्रकिय खर्चाच्या १०%) ५०% रक्कम डिमांड ड्राफट व्दारे व ऊर्वरीत ५०% बॅंक गॅरंटी स्वरुपात. सदरची रक्कम करारनामा झालेपासून ३० दिवसात जमा करणे आवश्यक राहील. या रकमेतील रु.२ कोटी इतकी रक्कम प्रकल्प पूर्ण करुन १५ वर्षाचा वापर कालावधि यशस्वीरीत्या पूर्ण झालेनंतर ६० दिवसांनी ठेकेदार यांना परत करणेत येईल. |
| ०७. | Additional Concession fee | -- | ई-प्रस्ताव सादरकर्त्यांनी प्रस्तावात देऊ केलेली Additional Concession Fee पहिल्या वर्षासाठी असेल. नंतर दरवर्षी त्यात १०% वाढ होत राहील. सदरची रक्कम समान मासिक हप्त्यांमध्ये दर महिन्याला 7 तारखेपर्यंत जमा करणे आवश्यक राहील. |
| ०८. | Selection Criteria | -- | वाणिज्यिक निविदांपैकी ज्या निविदासादरकर्त्याचे देकार (Additional Concession fee Quoted) सर्वात जास्त असेल त्याची निवड करणे असा निकष ठरविणे. |
| ०९. | Duration of construction & commissioning | -- | १. एकूण कालावधी – १५ वर्षे. त्यापैकी बांधकाम कालावधी – काम बहाल केल्याचे पत्र दिल्यानंतर १८ महिने. (०६ महिने वाढविता येईल.)<br>२. प्रकल्पाचे नियोजनानुसार कामाचे टप्पे (project milestones) निश्चित केल्यांनतर ९० दिवसाच्या कालावधीत कामाचा अपेक्षित टप्पा पूर्ण करण्यात अपयशी ठरल्यास ठेकेदार यांनी performance security रकमेच्या 0.1% रक्कम प्रतिदिवस दंड म्हणून जमा करणे आवश्यक राहील. |

प्रस्ताव:- प्रकल्पाचे सल्लागार यांनी दि.०५/०१/२०१९ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर केलेल्या सादरीकरणाचे वेळी सुचविणेत आलेले बदल वरील तक्त्यात नमूद केलेले आहेत. तरी मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १९८,१९९, २०० व २०१ मधिल जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर उभारणेकामी सल्लागार यांनी सादर केलेल्या e-RFP (e-Request for Proposal) मसुद्यामध्ये उपरोक्त अटी-शर्तींचा समावेश/सुधारणा करणे, तसेच निविदाकारांच्या पुर्वपात्रतेचे निकष व इतर अटीशर्ती निश्चित करून e-RFP मसुद्यास अंतिम स्वरुप देणे व त्यानुसार ई-निविदा पोर्टलवर e-RFP प्रस्ताव मागविणेबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT) तत्वावर उभारणेकामी उपरोक्त प्रस्ताव नमुद अटी-शर्तींनुसार e-RFP प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी इंग्रजी व मराठी वृत्तपतामध्ये व्यापक स्वरुपात तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यास व याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१०** **श्री साईप्रसादालय मुख्य प्रसाद भोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स् कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईड फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामीचे ठेकेदार आर.के.सावंत,नाशिक यांचे मुदतवाढ मागणीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूदः- अधिनियमाच्या कलम २१ (१) पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय :

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.३९६ अन्वये खालील प्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधील फ्लोअरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन फ्लोअरींग व डॅडो बसविणेबाबत प्रस्तावात नमुद केलेल्या पर्याय क्र.१ नुसार कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदांची मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली."

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.१४.११.२०१७ रोजी सभेतील निर्णय क्र.१००४(०२) अन्वये खालील प्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

"प्रस्तावित कामीचे निम्नतम दरधारक ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक हे आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमिती सभेने दि.१९.०९.२०१७ रोजीचे शासन आदेशानुसार, शासकीय कार्यकंत्राटासाठी जीएसटीचा दर १८% वरुन१२% झालेला असल्याने आर.के.सावंत, नाशिक यांना त्याप्रमाणे दर कमी करणेबाबत विचारणा केली असता, ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांनी जीएसटी काऊंसिलचे नोटिफिकेशन सभेसमोर सादर केले. त्यानुसार फक्त हिस्टोरीकल मुव्हमेंटस्, पाणीपुरवठा योजना इ. ठराविक कामांसाठीच फक्त १२% जीएसटी चा दर आहे, असे उपसमितीच्या निदर्शनास आणून दिले. यावर उपसमिती सभेने याबाबतीत विधी व न्याय विभाग यांचे मार्गदर्शन घेण्याचे ठरविले व शासनाच्या मार्गदर्शनास अधीन राहून कार्यारंभ देण्यात येईल, असे आर.के.सावंत, नाशिक यांना कळविले असता, त्यांनी ते मान्य केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय मुख्य प्रसाद भोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोरींग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स/ट्रिमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नविन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणेकामी आर.के. सावंत, नाशिक यांचे रु.१,८९,६२,२२२.९० मात्र निम्नतम दर स्विकारणेत यावेत व या कामावरील जीएसटीबाबत महाराष्ट्र शासनाचे मार्गदर्शन घेण्यात येऊन, या मार्गदर्शनास अधीन राहून, आर.के. सावंत, नाशिक यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच यापुढे जीएसटी दर वाढल्यास ठेकेदार यांना जास्तीत जास्त१८% पर्यंत वाढीव जीएसटीची रक्कम अदा करणेत यावी. मात्र जीएसटी ची कमी झाल्यास त्याप्रमाणातील रक्कम ठेकेदार यांचेकडून वसूल करणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

प्रस्तावना:- मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार ठेकेदार श्री.आर.के.सावंत, नाशिक यांना कार्यादेश देण्यात आला असुन सदरहू कामाचा तपशिल व सद्यस्थिती खालील प्रमाणे–

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नांव | श्री साई प्रसादालय मुख्य प्रसादभोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल फ्लोअरिंग व डॅडोला सध्या असलेल्या व्हेट्रीफाईड टाईल्स / ट्रेमिक्स कॉक्रीट काढून सदर ठिकाणी नवीन ग्रेनाईट फ्लोअरींग व डॅडो बसविणे. |

| | | |
|---|---|---|
| २) | ठेकेदार | आर.के. सांवत, नाशिक |
| ३) | मंजूर निविदा रक्कम | रु.१,८९,६२,२२३/- |
| ४) | कार्यादेश क्र. व दिनांक | जा.नं.४८८२/२०१७ दि.१५/१२/२०१७ |
| ५) | करारनाम्यानुसार काम सुरु करण्याचा दि. | दि.०२/०२/२०१८ |
| ६) | काम पूर्ण करण्याचा कालावधी व दिनांक | ०६ महिने ( दि.०२/०८/२०१८ अखेर) |
| ७) | कामाची सद्यस्थिती | १. मुख्य प्रसाद भोजन हॉल, मुख्य किचन व बुंदी किचन मधिल जुनी फ्लोरींग काढून त्या ठिकाणी ग्रेनाईट फ्लोरींग बसविणेचे काम पूर्ण.<br>२. मुख्य भोजन हॉल मधिल कॉलम तसेच मुख्य किचन व बुंदी किचन पार्टीशन भिंतीला ग्रेनाईट डॅडो बसविणेचे काम पूर्ण.<br>३. हॉलमधील नाल्यांवर एसएस ग्रेटींग टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. |

ठेकेदार यांचा करारनाम्यानुसार काम करण्याचा कालावधी सहा महिने दि.०२/०२/२०१८ ते दि.०२/०८/२०१८अखेर असा होता. सदरचे मुदतीत ठेकेदार यांनी मुख्य भोजन हॉलमधील फ्लोरींगचे काम पूर्ण केले आहे.

ठेकेदार यांनी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी दि.०९/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये खालील प्रमाणे अडचणी नमूद करुन दि.१५/०२/२०१९ पर्यंत मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे.

१) सन २०१८ हे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्ष असल्याने श्री साईप्रसादालयात भाविकांची प्रसादभोजनासाठी मोठया प्रमाणात गर्दी होती. प्रामुख्याने रामनवमी उत्सव, मे जून महिन्यात भक्तांच्या होणा-या गर्दी, गुरुपौर्णिमा उत्सव, सदगुरु गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह, शताब्दी महोत्सव समारोप व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव यावेळी झालेली गर्दी तसेच सलग सुट्टयांच्या कालावधीत प्रसादालयात काम सलग करणे शक्य होत नव्हते.

२) रात्रीचे वेळी संपूर्ण प्रसादालयामध्ये साफ-सफाई करणेत येत असल्याने रात्र पाळीमध्ये देखील काम करणेस अडचण येत होती.

३) मुख्य किचन मधिल जेवण पदार्थ बनविणे व बुंदी किचन मध्ये बुंदी /लाडू प्रसाद बनविणे ही कार्यवाही चालू ठेवून काम करावयाचे होते. त्यामुळे अशंतः भाग कामासाठी उपलब्ध होत असल्याने सदर ठिकाणी काम वेगाने पूर्ण करता आले नाही.

४) फरशी बसविणेचे कामाबरोबर प्रसादालयाचे आतील व बाहेरील रंगकाम करणेत येत होते. पाणी पूरवठा विभागामार्फत पाण्याचे लाईन्स फ्लोरींगचे खाली टाकणे इत्यादी कामेही करण्यात येत होती.

आता परत ठेकेदार यांनी दि.१९/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कामातील ग्रेटींग व क्लाडींगच्या कामासाठी दि.१५/०३/२०१९ अखेर पर्यंत मुदत मिळावी, अशी विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साईबाबा समधी शताब्दी महोत्सव, तसेच संस्थानचे पारंपारीक तिनही उत्सव व नाताळ आणि नविन वर्षानिमित्त होणा-या गर्दीमुळे सदर काम बंद ठेवावे लागले होते. त्यामुळे ठेकेदार यांना दिलेल्या मुदतीत फ्लोअरींगचे काम पूर्ण करता आलेले नाही. त्यामुळे ठेकेदार यांनी सदर काम करणेसाठी दि.१५/०३/२०१९ अखेर मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. तरी सदरकामी ठेकेदार यांना मुदतवाढ देता येईल असे मत आहे.

प्रस्तावः- तरी ठेकेदार आर. के सावंत, नाशिक यांचे विनंती नुसार त्यांना दि.१५/०३/२०१९ पर्यंत मूदत वाढ देणेबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव, तसेच संस्थानचे पारंपारिक तिनही उत्सव व नाताळ आणि नविन वर्षानिमित्त होणा-या साईभक्तांच्या गर्दीमुळे सदर काम बंद ठेवावे लागल्याने ठेकेदार यांना दिलेल्या मुदतीत फ्लोअरींगचे काम पूर्ण करता आलेले नाही. त्यामुळे सदर कामाचे ठेकेदार आर.के.सावंत, नाशिक यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना दि.१५/०३/२०१९ पर्यंत मूदत वाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

विषय नं.११ **संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट-को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना बॅग क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी

पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६ /०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५४२ अन्वये संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील एकूण ५ गाळे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फूट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी भाडे करारावर दि.१७/०६/२०१४ पासून दि.१६/०१/२०१९ पर्यंत ११-११ महिन्यांचे कालावधीसाठी मागील मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे उक्त सोसायटीने दि.२९/१०/२०१८ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

सदर क्लोकरुम व मोबाईल क्लोकरुम व्यवसायासाठी वापरास दिलेल्या उपरोक्त जागेची वापराची मुदत दि.१६/०१/२०१९ रोजी संपुष्टात येत असलेने मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांची संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील बॅग क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम चालवत असलेल्या व्यवसायाची पुढील ११ महिन्यांसाठीची मुदत वाढवून मिळणेकामी त्यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/१७६/२०१८ दि.१६/१०/२०१८ अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त विनंतीपत्राचे अनुषंगाने संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील मोबाईल कॅमेरा क्लोकरुमकामी २ गाळे क्षेत्र २९४.३२ चौ.फूट तसेच बॅग क्लोकरुमसाठी ३ गाळे क्षेत्र ३६२.८९ चौ.फूट असे एकूण ५ गाळयांचे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फूट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा भाडे दर रक्कम रु.१४,२६६/- + १०% रु.१,४२७/-= अशी एकूण रक्कम रु.१५,६९३/- इतके व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.१७/०१/२०१९ ते दि.१६/१२/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीचेच अटी व शर्तीवर उपरोक्त जागा वापरास मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम कामी २ गाळे क्षेत्र २९४.३२ चौ.फूट तसेच बॅग क्लोकरुमसाठी ३ गाळे क्षेत्र ३६२.८९ चौ.फूट असे एकूण ५ गाळयांचे एकत्रित क्षेत्रफळ ६५७.२१ चौ.फूट क्लोकरुम व मोबाईल कॅमेरा क्लोकरुमचे व्यवसायासाठी वापरात असलेलया जागेचे मागील मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा भाडे दर रक्कम रु.१४,२६६/- + १०% रु.१,४२७/-= अशी एकूण रक्कम रु.१५,६९३/- इतके व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.१७/०१/२०१९ ते दि.१६/१२/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीचेच अटी व शर्तीवर उपरोक्त जागा वापरास मुदतवाढ देणेच्या निर्णयार्थ व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४९ **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील दि.२४.०१.२०१९ रोजचे पत्रान्वये संस्थान मालकीचे साईनाथ छाया इमारतीमधील पुर्वेकडील मागील बाजू असलेले एकूण क्षेत्र २२० चौ.फुट असलेले दोन गाळे दि.०१.०२.२०१९ पासून वापराचे बंद करीत असलेबाबत कळविलेले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्व्हे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील सदर संस्थेने त्यांचे पत्रात नमुद केलेले दोन गाळयांचे प्रति चौ.फुट रु.२३.८७ प्रमाणे होणारी मासिक भाडेदराची रक्कम रु.५,२५१/- इतकी प्रस्तावीत भाडे रक्कम रु.१५,६९३/-मधुन वजा करुन उर्वरीत तीन गाळयांचे क्षेत्रफळ ३६२.८९ चौ.फूट+७४.३२ चौ.फुट (पॅसेज) अशी एकुण क्षेत्र ४३७.२१ चौ.फुटाचे मासीक भाडे रक्कम रु.१०,४४२/- इतके व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर दि.१७/०१/२०१९ ते दि.१६/१२/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वापरास मुदतवाढ देण्यास व करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.१२ **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट-को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर बॅग क्लोकरुम, पादत्राणेगृह व मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायासाठी वापरास देण्यात आलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही

किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१२७ अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना साईभक्तांचे सोयीचे दृष्टिने संस्थान परिसरात विविध ठिकाणी विविध व्यवसाय करणेसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर जागा वापरास दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ या कालावधीसाठी प्रति गाळयास रु.५,५००/- परवाना फी व विद्युत बील वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यात आलेली आहे. साईभक्तांच्या सेवेसाठी व सोयीसाठी मा.व्यवस्थापन मंडळाचे उपरोक्त दि.१४/०१/२०१२ रोजीचे निर्णयास अनुसरुन संस्थानचे विधी विभागाकडील जा.क्रं.विधी/६२३५/२०१२ दि.१२/०३/२०१२ चे आदेशाने उक्त सोसायटीस परवानगी दिलेली आहे.

सदर व्यवसायांची मुदत दि.३१/०५/२०१२ रोजी संपुष्टात आल्याने पुढील दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/०५/२०१३ या एक वर्षासाठी सदर व्यवसाय पूर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन मुदतवाढ देणेबाबतचे निर्णयार्थचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे दि.१८/०७/२०१२ रोजीचे सभेत विषय नं.५६ अन्वये सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रं.६२८ अन्वये सविस्तर चर्चा होवून "प्रस्तावात नमूद केलेल्या गाळयांची प्रत्यक्ष पाहणी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा,असा निर्णय झालेला आहे." मात्र सदर निर्णयात नमूद केलेप्रमाणेचा निर्णय झालेला नसल्याने पुढील मुदतवाढीचे आदेश निर्गमित करणेत आलेले नाहीत. यास्तव सदर मुदतवाढी संबंधातील प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेपूढे सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.४३३ प्रमाणे"प्रस्तावितकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येवून मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाने सुचविल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी,असे ठरले."

तदनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी उक्त व्यवसायांचे मुदतवाढी संदर्भात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२६/२०१४ चे दाखल करण्यात आले. तथापि सदर सिव्हील ॲप्लिकेशनवर सन २०१६ पर्यंत कोणतेही आदेश प्राप्त न झालेने उक्त व्यवसायास मुदतवाढ देणेचे आदेश निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

तदनंतर शासनाकडून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ची दि.२८/०७/२०१६ पासून नव्याने व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली.मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५६६ अन्वये तत्कालीन त्रिसदस्य समितीमध्ये वेळोवेळी झालेल्या निर्णयानुसार मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी दाखल केलेले ३३ सिव्हील अर्ज मागे (Withdraw) घेण्यास मान्यता देण्यात आली. तदनुसार संस्थानचे विधी विभागामार्फत कार्यवाही करणेत येवून सदरचे सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२६/२०१४ चे दि.०८/०९/२०१६ रोजी मागे (Withdraw) घेणेत आलेले आहे.

यास्तव श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान परिसरात साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी क्लोकरुम,प्रसाद स्टोअर,दुध स्टॉल,मोबाईल कॅमेरा क्लोकरुम,पादत्राणेगृह इ.व्यवसायासाठी खालील तक्त्यात नमूदप्रमाणे वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून देण्यात आलेली नाही.

तथापि उक्त सोसायटीमार्फत त्यांना पूर्वी ठरवून दिलेल्या संस्थान मालकीच्या साईप्रसाद इमारत व परिसरातील जागेवर खालीलप्रमाणे व्यवसाय चालू होते व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/०१/२०१२ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.१२७ प्रमाणे प्रति स्टॉल भाडे दरमहा रक्कम रु.५,५००/- प्रमाणे उक्त संस्था संस्थानकडे नियमितपणे भाडे जमा करीत आहे.

अलीकडे साईप्रसाद इमारत परिसरात प्रस्तावित दर्शनरांगेचे बांधकाम करणेसाठी साईप्रसाद इमारत नं.१ व २ या दोन्हीही इमारती माहे ऑगस्ट २०१७ मध्ये पाडण्यात आलेल्या आहेत. तरीदेखील सदरच्या सुविधा पुरविणेकामी उक्त संस्थेने साईप्रसाद इमारत परिसरात स्वखर्चाने संस्थान मालकीचे जागेत स्टॉल तयार करुन त्या ठिकाणी खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे सध्यस्थितीत साईभक्तांना सुविधा पुरविणेत येत आहेत व सदर जागांचे भाडे प्रति स्टॉल/क्लोकरुम/मोबाईल कॅमेरा क्लोकरुम/पादत्राणेगृह दरमहा भाडे रक्कम रु.५,५००/- प्रमाणे उक्त सोसायटी संस्थेने माहे डिसेंबर २०१८ अखेर संस्थानकडे जमा केलेले आहे.

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | ठिकाण | मुदत |
|---|---|---|---|
| १ | क्लोकरुम | सुलभ शौचालयमध्ये | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| २ | क्लोकरुम | साईप्रसाद नं.२ परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ३ | प्रसाद स्टोअर | साईप्रसाद (उत्तर बाजूस) (सध्या सुलभ शौचालयाजवळ) | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ४ | दुध स्टॉल | साईप्रसाद (उत्तर बाजूस)(सध्या सुलभ शौचालयाजवळ) | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ५ | मोबाईल कॅमेरा | साईप्रसाद नं.२ परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्लोकरुम | | |
| ६ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | साईउद्यान परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ७ | पादत्राणेगृह | साईप्रसाद नं.२ | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |
| ८ | पादत्राणेगृह | साईउद्यान परिसर | दि.०१/०६/२०११ ते दि.३१/०५/२०१२ |

दरम्यानचे काळात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीच्या सभेत निर्णय क्रं.३५६ प्रमाणे "पादत्राणेगृह,बॅग क्लोकरुम,मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा सोसायटीस पुढील अटीवर चालविणेस देण्यात याव्यात. पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम या सुविधा सोसायटीने विनामुल्य चालवाव्यात व मोबाईल,कॅमेरा यासाठी प्रति नग रु.५/- मात्र आकार आकारणेत यावा तसेच याबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडून लेखी स्वरुपात करारनामा करुन घेण्यात यावा," असा निर्णय झालेला आहे. तदनुसार संस्थेने दि.०५/१२/२०१८ रोजी करारनामा करुन दिलेला आहे.

उपरोक्त व्यवसायाचे स्टॉलचे जागा वापराची मुदत दि.३१/०५/२०१२ रोजी संपलेली आहे. पुढील मुदत वाढवून मिळणेकामी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो /२३७/२०१९ दि.०१/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये इकडेस विनंती केलेली असून त्यात त्यांनी संस्थानच्या नियमाप्रमाणे संस्थेस उपरोक्त आठही ठिकाणचे व्यवसायाची जागा वापराची पुढील मुदत वाढवून मिळणेकामी विनंती केली असून संस्थान नियमाप्रमाणे संस्था मागील फरकासह जागा भाडे भरण्यास तयार आहे,असे बाबत नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- उक्त संस्थेने उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या व्यवसायाकामी दि.३१/०५/२०१२ ते जुलै २०१७ या कालावधीत संस्थान मालकीचे साईप्रसाद इमारत व परिसरातील जागांचा वापर अलाहिदा केलेला आहे. तदनंतर माहे ऑगस्ट २०१७ मध्ये साईप्रसाद इमारती पाडण्यात आल्यानंतर उक्त संस्थेने स्वखर्चाने संस्थान मालकीचे जागेत उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या ठिकाणी स्टॉल तयार करुन त्यासमोर दर्शविलेप्रमाणे व्यवसाय सुरु केलेले आहेत. म्हणजेच उक्त संस्था दि.३१/०५/२०१२ पासून ते आजही संस्थानचे जागेत उपरोक्त व्यवसाय सलगपणे करीत आहे. यास्तव उक्त संस्थेस उक्त व्यवसाय करणेसाठीच्या जागा वापराची दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१०/२०१९ या कालावधीत दर ११-११ महिन्यांसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% इतकी वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन एप्रिल २०१७ पासून साईभक्तांना बॅग क्लोकरुम व पादत्राणेगृह सुविधा विनामोबदला पुरविणेच्या अटीवर मुदतवाढ देता येईल व तसा करारनामा करुन घेता येईल.

तसेच उक्त संस्थेकडून दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीतील प्रति स्टॉल भाडेदराच्या फरकाची रक्कम रु.१,५५,७०९/-अशी एकूण आठ स्टॉलच्या भाडेदराच्या फरकाची एकूण रक्कम रु.१२,४५,६७२/- इतकी वसुल करता येईल.

प्रस्ताव– श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी या संस्थेने उपरोक्त प्रस्तावातील तक्त्यात दर्शविलेल्या व्यवसायाकामी दि.३१/०५/२०१२ ते जुलै २०१७ या कालावधीत संस्थान मालकीचे साईप्रसाद इमारत व परिसरातील जागांचा वापर अलाहिदा केलेला आहे. तदनंतर माहे ऑगस्ट २०१७ मध्ये साईप्रसाद इमारती पाडण्यात आल्यानंतर उक्त संस्थेने स्वखर्चाने संस्थान मालकीचे जागेत उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या ठिकाणी स्टॉल तयार करुन त्यासमोर दर्शविलेप्रमाणे व्यवसाय सुरु केलेले आहेत. म्हणजेच उक्त संस्था दि.३१/०५/२०१२ पासून ते आजही संस्थानचे जागेत उपरोक्त व्यवसाय सलगपणे करीत आहे.

यास्तव उक्त संस्थेस उक्त व्यवसाय करणेसाठीच्या जागा वापराची दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१०/२०१९ या कालावधीत दर ११-११ महिन्यांसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% इतकी वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन एप्रिल २०१७ पासून साईभक्तांना बॅग क्लोकरुम व पादत्राणेगृह सुविधा विनामोबदला पुरविणेच्या अटीवर मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेच्या आणि उक्त संस्थेकडून दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीतील प्रति स्टॉल भाडेदराच्या फरकाची रक्कम रु.१,५५,७०९/-अशी एकूण आठ स्टॉलच्या भाडेदराच्या फरकाची एकूण रक्कम रु.१२,४५,६७२/- इतकी वसुल करणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना पुर्वीचे साईप्रसाद इमारत व परिसरामधील उपरोक्त प्रस्ताव नमुद केल्याप्रमाणे आठ गाळे दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१०/२०१९ या कालावधीत दर ११-११ महिन्यांसाठी पूर्वीच्या भाडेदरात १०% इतकी वाढ करुन व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन एप्रिल २०१७ पासून साईभक्तांना बॅग क्लोकरुम व पादत्राणेगृह सुविधा विनामोबदला पुरविणेच्या अटीवर मुदतवाढ देणेस व करारनामा करुन घेणेस तसेच संस्थेकडून दि.०१/०६/२०१२ ते दि.३१/१२/२०१८ या कालावधीतील प्रति स्टॉल भाडेदराच्या फरकाची रक्कम रु.१,५५,७०९/-अशी एकूण आठ स्टॉलच्या भाडेदराच्या फरकाची एकूण रक्कम रु.१२,४५,६७२/- इतकी वसुल करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

**विषय नं.१३** **चेन्नई (पट्टीपुलम) येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व सुविधा केंद्र सुरु करणेसाठी नाममात्र भाडेपट्टयाने घेतलेल्या सुमारे ८५० चौ.फुट बांधीव जागेच्या वापराची मुदत वाढवून घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७ जुलै २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५७७ व दि.१८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.७७१ अन्वये पट्टिपुलम (तामिळनाडू) या ठिकाणी शिर्डी साई ट्रस्ट,पट्टीपुलम (तामिळनाडू) यांचे मालकीचे नं.३ साईनगर,१०८,कृष्णा करनाई ईस्ट कोस्ट रोडया ठिकाणी असलेल्या इमारतीतील तळमजल्यावर दक्षिण- पश्चिम कोप-यात सुमारे ८५० चौ.फूट बांधीव जागा साईभक्तांच्या वा सुविधांसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे माहिती तथा सुविधा केंद्रासाठी दि.०४/१२/२००८ पासून पूढे १० वर्षांसाठी म्हणजेच दि.०३/१२/२०१८ अखेर नाममात्र दरमहा भाडे रक्कम रु.१००/- प्रमाणे भाडे कराराने वापरत आहे व त्याप्रमाणे शिर्डी साई ट्रस्ट,पट्टिपुलम (तामिळनाडू) यांचेबरोबर दि.०४/१२/२००८ रोजी भाडे करारनामा करणेत आलेला आहे.

सदर करारनाम्याची मुदत दि.०३/१२/२०१८ रोजी संपुष्टात आलेली आहे. मात्र उक्त ठिकाणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व सुविधा केंद्र सध्यस्थितीत चालू आहे व यापुढेही संस्थानला सदर जागेची संस्थानचे माहिती व सुविधा केंद्रासाठी आवश्यकता आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व सुविधा केंद्रासाठी वापरास असलेल्या नं.३ साईनगर,१०८,कृष्णा करनाई ईस्ट कोस्ट रोड,पट्टिपुलम (तामिळनाडू) येथील ८५० चौ.फूट या जागा वापराची मुदत पुढील १० वर्षांसाठी म्हणजेच दि.०४/१२/२०१८ ते दि.०३/१२/२०२८ या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी-शर्तीवर वाढवून मिळणेकामी व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामी मा.चेअरमन,शिर्डी साई ट्रस्ट,पट्टिपुलम (तामिळनाडू) यांचेकडेस प्रस्ताव सादर करता येईल.

प्रस्ताव– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व सुविधा केंद्रासाठी वापरास असलेल्या नं.३ साईनगर १०८,कृष्णा करनाई ईस्ट कोस्ट रोड,पट्टिपुलम (तामिळनाडू) येथील ८५० चौ.फूट या जागा वापराची मुदत पुढील १० वर्षांसाठी म्हणजेच दि.०४/१२/२०१८ ते दि.०३/१२/२०२८ या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी-शर्तीवर वाढवून मिळणेकामी व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामी मा.चेअरमन,शिर्डी साई ट्रस्ट पट्टिपुलम (तामिळनाडू) यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे माहिती व सुविधा केंद्रासाठी वापरास असलेल्या नं.३ साईनगर १०८,कृष्णा करनाई ईस्ट कोस्ट रोड,पट्टिपुलम (तामिळनाडू) येथील ८५० चौ.फूट या जागा वापराची मुदत पुढील १० वर्षांसाठी म्हणजेच दि.०४/१२/२०१८ ते दि.०३/१२/२०२८ या कालावधीसाठी पूर्वीच्याच अटी-शर्तीवर वाढवून मिळणेकामी व त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामी मा.चेअरमन,शिर्डी साई ट्रस्ट पट्टिपुलम (तामिळनाडू) यांचेकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१४** **ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेली जागा दिर्घ मुदतीने भाडेतत्वावर देण्याबाबत मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.२२.१०.२०१८ रोजीच्या पत्राप्रमाणे कार्यवाही करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही,विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०५/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२८७ अन्वये व त्या अनुषंगाने मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील पत्र क्रं.सासंवि-२०१६/ १४२५/प्र.क्र.१७४/का.१६ दि.२६/१०/२०१६ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीची मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील गट नं.८० व ८५ पैकी यामध्ये साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील आय.टी.विभागा शेजारी असलेला हॉल अंदाजे रुंदी दक्षिणोत्तर ६० फूट व लांबी पूर्व पश्चिम १२० फूट याचे साधारणत: क्षेत्रफळ ७२०० चौ.फूट ही जागा श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना त्यांचे अर्जात नमूद केलेप्रमाणे शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी वापरास

देण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे दि.३१/०१/२०१७ रोजी मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेसमोर लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा नोंदविणेत आलेला आहे.

उपरोक्त करारनाम्याची मुदत दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात आलेली असलेने पुढील मुदतवाढ मिळणेकामी श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपूढे विनंती केलेली आहे. ती मा.व्यवस्थापन समितीने मान्य केली असून त्यांचे मागणीनुसार पुढील ११ वर्षे मुदतवाढ देणेसाठी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा,असेबाबत दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.१८ निर्णय क्रं.१०७८ प्रमाणे निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाचे अनुषंगाने मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस इकडील जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/५९९०/२०१८ दि.०७/०२/२०१८ अन्वये अहवाल सादर करणेत आलेला आहे.

मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये "विधी व न्याय विभागाच्या दि.२६/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये संस्थानमधील जागा ऐतिहासिक वस्तू व शस्त्रास्त्रे यांचे कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे यांना ११ महिन्यांसाठी भाडेतत्वावर देण्यात आली आहे. सदर मुदतवाढ दि.३१/१२/२०१७ रोजी संपुष्टात आलेली आहे. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संदर्भाधीन क्रं.२ ते ४ येथील पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार शिर्डी संस्थानच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० व ८५ मधील साईप्रसादालय इमारतीतील पहिल्या मजल्यावरील ७२०० चौ.फूट क्षेत्रफळ असलेली जागा श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी (सुधारणा) अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मधील तरतुदीनुसार श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना ऐतिहासिक वस्तू व शस्त्रास्त्रे व कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर ११ वेळा वाढवून देण्यास खालील अटींवर अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रत्येक वेळी लिव्ह ॲण्ड लायसन्स करार करतांना मागील वर्षाच्या भाडयात १०% वाढ करण्यात यावी.

ब) या कलादालनात व प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या वस्तू या शिवकालीन व पुरातन असल्याचा उल्लेख करारनाम्यात करण्यात येणार नाही.

क) कोणत्याही व्यक्तीने या कलादालनात प्रदर्शनासाठी ठेवलेल्या वस्तू या शिवकालीन किंवा पुरातन नाहीत याबाबत घेतलेल्या कोणत्याही आक्षेपासंदर्भात फक्त लायसेन्सी हेच जबाबदार असतील.

ड) सदर कलादालन/ प्रदर्शनामुळे भविष्यात काही कायदेविषयक बाबी किंवा अन्य कारणास्तव होणा-या नुकसानीची,खर्चाची संपूर्ण भरपाई लायसेन्सीने संस्थानला करुन देणे आवश्यक राहील." असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.८३५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय करणेत आलेला आहे.

"आजचे सभेत अर्जदार श्री.अभिजित देविदास शिंदे,रा.श्रीरामपूर यांना बोलविणेत आले होते. सभेने त्यांचेबरोबर या विषयावर चर्चा केली व त्यांचा आशय समजून घेतला. श्री.शिंदे यांनी सभेसमोर सांगितले की,शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेसाठी आवश्यक फर्निचर व इतर अनुषंगिक बाबी तयार करणेत खर्चिक आहे. त्यामुळे कमीत-कमी ५ वर्षासाठी जागा मिळावी.

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केलेल्या अटी/शर्तीवर श्री.अभिजित शिंदे यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी तूर्त ११ महीने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येवून लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच त्यांच्या पूर्ण सेटअपची उभारणी झाल्यानंतर भाडे सुरु करण्यात यावे.

श्री.शिंदे यांच्या मागणीनुसार त्यांना ११-११ महीन्यांच्या कराराने पाच वर्षांसाठी जागा उपलबध करुन देणेकामी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेबरोबर पत्रव्यवहार करणेत यावा व संस्थानच्या नियोजित साईसृष्टी प्रकल्पामध्ये शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेबाबतचा समावेश करणेत यावा,असे ठरले."

तद्नंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

श्री.अभिजित शिंदे यांना शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपीठेवणेकामी तूर्त ११ महीने कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे भाडे व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत बील आकारणेत येवून लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर प्रसादालयावरील हॉलची जागा उपलब्ध करुन देणेबाबत दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेमध्ये निर्णय संमत

झालेला आहे. श्री.अभिजित शिंदे,श्रीरामपूर यांनी आजचे सभेत येवून ते करत असलेल्या कामामुळे देशभरामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पोहोचणार असलेबाबत माहीती दिली व सदरहू ठिकाणचे भाडे कमी करणेबाबत सभेस विनंती केली.

सभेने यावर चर्चा करुन छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवणेकामी श्री.अभिजित शिंदे यांना

लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स तत्वावर देण्यात येणा-या हॉलचे रु.१०,०००/- मात्र मासिक भाडे,विद्युत बील वेगळे याप्रमाणे आकारणेत यावे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रं.४५९(४),निर्णय क्रं.४३५ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवस्पर्शाने पावन झालेल्या वस्तू व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास प्रदर्शनरुपी ठेवण्यासाठी श्री.अभिजित देविदास शिंदे,श्रीरामपूर यांना साईप्रसादालय इमारतीत जागा दिलेली आहे. परंतु त्यांनी आजपर्यंत सदरहू प्रदर्शन सुरु केलेले नाही. याकरीता त्यांचा दि.२८/०४/२०१७ रोजीचा मागणी अर्ज निकाली काढणेत यावा. तसेच त्यांना दिलेल्या जागेस शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चित करणेत येऊन,त्यांना जागा वापरास दिलेपासून सदरहू भाडे आकारणेत यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांना वापरास दिलेल्या जागेचे मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,संगमनेर यांचेकडून भाडे निश्चित करुन घेण्यात आले. त्यात मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचेकडील दि.१९/०६/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर जागेचे भाडे रु.१८,८५५/- दरमहाअसे निश्चित केलेले आहे. त्याप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांना उपरोक्त निर्णय क्रं.४३५ च्या अनुषंगाने इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/२०९७/२०१७ दि.१८/०७/२०१७ अन्वये दि.१७/०२/२०१७ पासूनचे मासिक भाडे दरमहा रु.१८,८५५/- इतके संस्थानचे लेखाशाखेमध्ये जमा करणेबाबत अलाहीदा कळविण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी उक्त जागा प्रत्यक्षात ताब्यात घेतलेपासून म्हणजेच दि.१७/०२/२०१७ ते दि.१७/१०/२०१७ या कालावधीचे प्रतिमहा भाडे दर रु.१८,८५५/- प्रमाणे एकूण रक्कम रु.१,५०,८४०/- इतकी संस्थानचे लेखाशाखेकडेस दि.२५/१०/२०१७ रोजी जमा केलेली आहे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीच्या सभेत श्री.अभिजित देविदास शिंदे हे मा.व्यवस्थापन समितीचे समोर उपस्थित राहून त्यांनी त्याच्या काही मागण्या मान्य करणेबाबत लेखी पत्राद्वारे विनंती केलेली आहे.

त्यावर आयत्या वेळचा विषय नं.१८ निर्णय क्रं.१०७८ प्रमाणे "श्री साईप्रसादालयावरील शिवसृष्टी संग्रहालयाचे चालक श्री.अभिजित देविदास शिंदे यांनी आजचे सभेसमोर येवून खालील मागण्या मान्य करणेबाबत लेखी पत्रादवारे विनंती केली. त्यांच्या मागण्या "

१) सदर हॉलमध्ये ज्या काचेच्या आहेत त्यांना लोखंडी ग्रील संस्थानकडून बसवून मिळावे. (कलादालनात अत्यंत मौल्यवान अशी ऐतिहासिक शस्त्रे आहेत.)

२) फायबरचा हत्ती बसविणेकामी जागा मिळावी. (सदर जागा ही बुंदी गाळप ठिकाण व बांधकाम विभाग यांचेमध्ये असलेली रिकामी जागा.)

३) त्याच शेजारी तिकीट विक्रीसाठी रिकामी खोली आहे ती मिळाली तर भाविकांच्या सोयीचे होईल.

४) साईभक्तांना शिवसृष्टीबाबत माहिती मिळावी म्हणून जिन्याजवळ किंवा हत्तीजवळ साऊंड रेकॉर्डींग वाजविण्याची परवानगी मिळावी.

५) साईभक्तांना शिवसृष्टी या उपक्रमाबाबत माहिती मिळावी यासाठी २०० रुम,५०० रुम,१००० रुम,श्रीं च्या प्रसादालयात जातानाची प्रतिक्षा रांगेशेजारी तसेच मंदिर परिसरात व प्रसादालय येथे व्ही.आय.पी.प्रसाद कडे जाताना ८x१२ च्या मापाची flexboard लावणेची जागा व परवानगी मिळावी. तो खर्च आम्ही स्वत: करु.

६) आता सध्या प्रसादालयामधून बाहेर पडण्यासाठी जो एकच दरवाजा वापरला जात आहे (प्रसादालयामधून बाहेर पडण्यासाठीचे गेट हे शिवसृष्टीच्या बाजूनेच असावे.) तोच चालू ठेवावा,ही विनंती

७) शिवसृष्टी या उपक्रमाचे सामाजिक योगदान म्हणून विशेष बाब ग्राहय धरुन व त्यासाठी मोठया प्रमाणात झालेला खर्च लक्षात घेता जागेचा करार हा सध्या ११ महिन्याचा आहे तो ११ वर्षे करावा तसेच पूर्वी ठरलेल्या ठरावाप्रमाणे जागेच्या भाडयापोटी व वीज बील व इतर इमारत दुरुस्ती खर्चापोटी रु.१०,०००/- दरमहा भाडे घ्यावे. (सध्याच्या कराराची मुदत पुढील महिन्यामध्ये संपत आहे.)

८) दि.१८/०७/२०१७ चे भाडे मागणी पत्र सोबत जोडत आहे. ते भरलेले आहे पण करारात ठरल्याप्रमाणे शिवसृष्टी चालू झाल्यावर भाडे आकारले जाईल असे ठरले होते. त्याप्रमाणेच भाडे घ्यावे व आता जे भाडे भरले आहे ते पुढील भाडयापोटी घ्यावे. मागील भाडे माफी करुन मिळावे,ही विनंती.

९) श्री साईबाबा संस्थानच्या संकेतस्थळावर शिवसृष्टी या उपक्रमाची माहिती दिल्यास श्रीं च्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना शिवसृष्टी या उपक्रमाची माहिती मिळेल.

१०) शिवसृष्टी व आय.टी.विभाग यांचेसमोर जी मोकळी जागा आहे त्या जागेत भाविक जावून दुर्घटना होवू शकते कारण या जागेतील छत,डोम कमकुवत झाले आहेत. त्यातून मोठी दुर्घटना होवू नये यासाठी आय.टी.विभागासमोर जो सुरक्षा रक्षक आहे त्यावर जबाबदारी द्यावी.

११) सध्या संस्थानमार्फत वीजपुरवठा भेटत आहे तो मिळावाच पण इलेक्ट्रीक बोर्ड यांचेकडून वीजेचे नवीन कनेक्शन घेणेसाठी परवानगी मिळावी. त्याचा दर कमी आहे युनिटचा.

वरील विनंतीनुसार नवीन ज्या जागा संस्थान देणार आहे त्याचे भाडे आकारण्यात येवू नये.

या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१०७८ ने खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिवसृष्टी प्रकल्प हा बी.ओ.तत्वावर श्री.अभिजित शिंदे यांना चालविण्यास दिलेला असल्यामुळे श्री.अभिजित शिंदे यांच्या उपरोक्त मागण्या मंजूर करण्यात येवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. श्री.अभिजित शिंदे यांना शिवसृष्टी संग्रहालयासाठी दिलेल्या जागेची मुदत संपुष्टात येत असल्यामुळे त्यांचे मागणीनुसार पुढे ११ वर्षे मुदतवाढ देण्यासाठी विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा.शिवसृष्टी व आय.टी.विभाग यांचेसमोरील जागेतील डोमची दुरुस्ती करणेत यावी तसेच त्यांना संस्थानच्या वीज पुरवठयासोबतच महाराष्ट्र शासनाचा वीजपुरवठा घेण्यासाठी एन.ओ.सी.देणेबाबत कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करणेत यावी,असे ठरले.

विभागाचा अभिप्राय–

१) उपरोक्त निर्णयातील श्री.अभिजित शिंदे यांची मागणी अ.नं.७ व ८ चे अनुषंगाने यापूर्वीच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारातील अट क्रं.२ मध्ये नमूद केलेप्रमाणे दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिने कालावधीसाठीचे सदर जागेचे मासिक भाडे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६६ प्रमाणे रक्कम रु.१०,०००/- इतके दरमहा प्रमाणे व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेचे निश्चित केलेले आहे. त्याप्रमाणे निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून उक्त कालावधीसाठीची रक्कम रु.१,१०,०००/- इतकी त्यांनी उपरोक्तप्रमाणे दि.२५/१०/२०१७ रोजी संस्थानकडे जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधून वजा करता येईल व उर्वरित रक्कम पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करता येईल.

२) मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभागयांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.१२/१०/२०१८ रोजीचे पत्रात नमूद केलेप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांना उक्त प्रदर्शनासाठी वापरास दिलेली उपरोक्त जागा वापराची पुढील मुदत दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीचे भाडेदराची रक्कम रु.१०,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.११,०००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देता येईल व मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील सदर पत्रात नमूद केलेल्या अटी आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन अथवा समाविष्ट करुन त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल. त्यासाठी मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेता येईल.

३) तसेच उक्त जागा वापराची यापूर्वीची उपरोक्त मुदत देखील दि.३०/११/२०१८ रोजी संपुष्टात आलेली असलेने सदर जागा वापराची पुढील मुदत दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे यापूर्वीची भाडे रक्कम रु.११,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा
रक्कम रु.१२,१००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देता येईल व मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील सदर पत्रात नमूद केलेल्या अटी आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन अथवा समाविष्ट करुन त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव–

१) उपरोक्त निर्णयातील श्री.अभिजित शिंदे यांची मागणी अ.नं.७ व ८ चे अनुषंगाने यापूर्वीच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स करारातील अट क्रं.२ मध्ये नमूद केलेप्रमाणे दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिने कालावधीसाठीचे सदर जागेचे मासिक भाडे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.९६६ प्रमाणे रक्कम रु.१०,०००/- इतके दरमहा प्रमाणे व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारणेचे निश्चित केलेले आहे. त्याप्रमाणे निश्चित केलेल्या भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून उक्त कालावधीसाठीची रक्कम रु.१,१०,०००/- इतकी त्यांनी उपरोक्तप्रमाणे दि.२५/१०/२०१७ रोजी संस्थानकडे जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधून वजा करणेकामी उर्वरित रक्कम पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करणेकामी तसेच

२) मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभागयांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.सासंवि-१०१६/८४०/ प्र.क्र.११०/का.१६ दि.१२/१०/२०१८ रोजीचे पत्रात नमूद केलेप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांना उक्त प्रदर्शनासाठी वापरास दिलेली उपरोक्त जागा वापराची पुढील मुदत दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीचे भाडेदराची रक्कम रु.१०,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.११,०००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेकामी व मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील सदर पत्रात नमूद केलेल्या अटी आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन अथवा समाविष्ट करुन त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेसाठी कार्योत्तर मान्यता मिळणेकामी तसेच

३) तसेच उक्त जागा वापराची यापूर्वीची उपरोक्त मुदत देखील दि.३०/११/२०१८ रोजी संपुष्टात आलेली असलेने सदर जागा वापराची पुढील मुदत दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेप्रमाणे यापूर्वीची भाडे रक्कम रु.११,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.१२,१००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेकामी व मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग यांचेकडील सदर पत्रात नमूद केलेल्या अटी आवश्यकतेनुसार दुरुस्ती करुन अथवा समाविष्ट करुन त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेकामी मान्यता मिळणेसाठी सादर.

**निर्णय क्र.५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे, कलादालन व प्रदर्शन मांडण्याकरीता श्री.अभिजित देविदास शिंदे, रा.श्रीरामपूर यांना संस्थान मालकीचे मौजे निमगाव कोऱ्हाळे, ता.राहाता येथील साईप्रसादालय इमारतीतील वापरास दिलेल्या जागेचे दि.३१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ या ११ महिने कालावधीसाठीचे भाडेदराप्रमाणे श्री.अभिजित देविदास शिंदे यांचेकडून उक्त कालावधीसाठीची रक्कम रु.१,१०,०००/- इतकी त्यांनी उपरोक्तप्रमाणे दि.२५/१०/२०१७ रोजी संस्थानकडे जमा केलेल्या रक्कम रु.१,५०,८४०/- मधून वजा करुन उर्वरित रक्कम पुढील कालावधीसाठीच्या भाडे रकमेतून हिशोबित करुन समायोजित करणेस मान्यता देण्यात आली.**

**उपरोक्त जागा वापराची मुदत दि.०१/०१/२०१८ ते दि.३०/११/२०१८ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी पूर्वीचे भाडेदराची रक्कम रु.१०,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.११,०००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देणेस व करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**तसेच दि.०१/१२/२०१८ ते दि.३१/१०/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वीची भाडे रक्कम रु.११,०००/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजेच दरमहा रक्कम रु.१२,१००/- इतके भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मा.कार्यासन अधिकारी,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडील जा.क्रं.सासंवि-१०१६/८४०/प्र.क्र.११०/का.१६ दि.२२/१०/२०१८ रोजीचे पत्रातील अटी व शर्तीस अधिन राहून मुदवाढ देण्यास व त्याप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१५** **मुंबई-शिर्डी, औरंगाबाद-शिर्डी, पुणे-शिर्डी, मनमाड-शिर्डी, भंडारदरा-अकोले-संगमनेर-शिर्डी यामार्गावर पालखी थांबे सुरु करणेकामी गावांची निवड करणे व निवड केलेल्या गावातील जमीनी पालखी थांब्यासाठी खरेदी करणे.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७५ प्रमाणे "पालखी/पदयात्रीच्या सोयीसाठी शिर्डीकडे येणा-या चारही दिशांच्या रस्त्यांवर (मुंबई-शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे-शिर्डी, मनमाड-शिर्डी, भंडारदरा-अकोले-संगमनेर-शिर्डी) प्रत्येकी ३०-४० किमी.अंतरावर संस्थानमार्फत पालखी थांबे उभारणेत यावे. यासाठी आवश्यक असलेली जमीन/जागा देणगी स्वरुपात मिळणेकरीता संस्थानचे संकेतस्थळावर व स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेत यावी. विशिष्ट कालावधीमध्ये देणगी स्वरुपात जमीन/जागा न मिळाल्यास, समिती सदस्यांनी पालखी थांब्यासाठीच्या गावांची निवड करुन घ्यावी व निवड केलेल्या गावातील जमीन/जागा पालखी थांब्यासाठी खरेदी करणेत यावी,"असा निर्णय झालेला आहे.

सदर निर्णयाचे अनुषंगाने मुंबई-शिर्डी,औरंगाबाद ते शिर्डी,पुणे-शिर्डी,मनमाड-शिर्डी,भंडारदरा-अकोले-संगमनेर-शिर्डी या मार्गावर पदयात्रीच्या सोयींसाठी पालखी थांब्याकरीता किमान ०.४० आर (१ एकर) जागा देणगी स्वरुपात स्विकारणेकामी इच्छुक नागरीक/साईभक्तांना संस्थानचे संकेतस्थळावर आव्हानात्मक जाहिरात संस्थानचे आय.टी.विभागामार्फत प्रसिध्द करणेकामी इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/११३८/२०१८

दि.१९/०७/२०१८ अन्वये आय.टी.विभाग प्रमुख यांना कळविणेत आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी संस्थानचे संकेतस्थळवार प्रस्तुतकामी प्रसिध्दी दिलेली आहे. तसेच मुंबई,औरंगाबाद,पुणे,नाशिक,अहमदनगर या जिल्हयातील स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/११३६/२०१८ दि.१९/०७/२०१८ अन्वये संस्थानचे जनसंपर्क अधिकारी यांना कळविणेत आलेले आहे. त्याप्रमाणे त्यांनी संबंधीत वृत्तपत्रात प्रस्तुतकामीची जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. तसेच सदर जाहिरातीप्रमाणे फलेक्सबोर्ड तयार करुन संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान-१, साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), द्वारावती भक्तनिवासस्थान,साईबाबा हॉस्पिटल,साईनाथ हॉस्पिटल,साई प्रसादालय विभाग, मुंबई कार्यालय इ.ठिकाणी फलेक्सबोर्ड लावून प्रसिध्द करणेकामी इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/११९६/२०१८ दि.२५/०७/२०१८ अन्वये संस्थानचे कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग यांना अलाहिदा कळविलेले आहे.

उपरोक्तप्रमाणे जाहिराती प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत तथापि तदनुषंगाने पालखी थांब्यासाठी देणगी स्वरुपात जागा देण्याबाबत एकही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त निर्णय क्रं.७५ च्या पूर्वार्धात नमूद केलेप्रमाणे जाहिराती प्रसिध्द केलेल्या आहेत. तथापि तदनुषंगाने पालखी थांब्यासाठी देणगी स्वरुपात जागा देणेबाबतचा एकही प्रस्ताव संस्थानला प्राप्त झालेला नसल्याने उपरोक्त निर्णय क्रं.७५ मधील उत्तरार्धात नमूद केलेप्रमाणे समिती सदस्यांना पालखी थांब्यासाठीच्या गावांची निवड करता येईल व निवड केलेल्या गावातील जमीनी पालखी थांब्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेत आलेल्या शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीचे अनुषंगाने खरेदी करता येतील.

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७५ च्या पूर्वार्धात नमूद केलेप्रमाणे जाहिराती प्रसिध्द केलेल्या आहेत. तथापि तदनुषंगाने पालखी थांब्यासाठी देणगी स्वरुपात जागा देणेबाबतचा एकही प्रस्ताव प्राप्त झालेला नसल्याने उपरोक्त निर्णय क्रं.७५ मधील उत्तरार्धात नमूद केलेप्रमाणे समिती सदस्यांनी पालखी थांब्यासाठीच्या गावांची निवड करणेकामीच्या व निवड केलेल्या गावातील जमीनी पालखी थांब्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्यासाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करणेत आलेल्या शासन निर्णय क्रं. सासंवि-१०१७/१८४४/प्र.क्र.२०१/का.१६ दि.२५/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीचे अनुषंगाने खरेदी करणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मुंबई-शिर्डी, औरंगाबाद-शिर्डी, पुणे-शिर्डी, मनमाड-शिर्डी, भंडारदरा-अकोले-संगमनेर-शिर्डी यामार्गावर साधारणत: ३० ते ३५ कि.मी. अंतरावर पालखी थांबे सुरु करणेत यावेत, याकामी खालील प्रमाणे मा.समिती सदस्यांनी संस्थानचे कामगार विभागाकडे उपलब्ध असलेल्या पालखी मंडळाच्या माहितीप्रमाणे त्या-त्या मार्गावरुन येणाऱ्या पालखी मंडळाचे अध्यक्षांशी विचारविनीमय करुन पालखी थांब्यासाठी गावांची निवड करावी,असे ठरले.**

| अ.नं. | मार्ग | मा.समिती सदस्य |
|---|---|---|
| १ | मुंबई-शिर्डी | मा.ॲड मोहन जयकर, सदस्य<br>मा.डॉ. राजेंद्र सिंह, सदस्य् |
| २ | औरंगाबाद-शिर्डी | मा.सौ.योगिता शेळके, सदस्या |
| ३ | पुणे-शिर्डी | मा.श्री.चंद्रशेखक कदम, उपाध्यक्ष |
| ४ | मनमाड-शिर्डी | मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य |
| ५ | भंडारदरा-अकोले-संगमनेर-शिर्डी | मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य |

**उपरोक्त मार्गावरील पालखी थांब्यासाठी गावांची निवड केल्यानंतर याबाबत मा.स्थानिक उपसमिती सभेमध्ये निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.१६ **संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान परिसरातील सुलभ शौचालय इमारतीसमोर मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम सुरु करणेस परवानगी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीटको-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/२२३/२०१८ दि.१०/१२/२०१८ यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/२२३/२०१८ दि.१०/१२/२०१८ अन्वये संस्थानचे साईप्रसाद इमारत परिसरात सुलभ शौचालयलगत साईभक्तांना आपले मोबाईल,कॅमेरा ठेवण्यासाठी क्लोकरुमची सोय नसल्याने साईभक्तांची होणारी गैरसोय लक्षात घेवून मा.पोलीस अधिक्षकसाहेब,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी केलेल्या सूचनेनुसार संस्थेमार्फत दि.२६/०९/२०१८ रोजी साईभक्तांचे सोयीसाठी सुलभ शौचालयासमोरील मोकळया जागेत १०x१२ फूट जागेत मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम सुविधा सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे साईभक्तांची मोठी सोय झाली आहे. संस्थेने मा.पोलीस अधिक्षक साहेब यांचे सुचनेनुसार सुलभ शौचालयासमोर सुरु केलेली मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम सुविधा साईभक्तांच्या सोयीसाठी नियमित सुरु ठेवून संस्थेस साईभक्तांची सेवा करण्याची संधी द्यावी. संस्था संस्थानचे नियमाप्रमाणे सदर जागेचे जागा भाडे भरण्यास तयार आहे. तरी सुलभ शौचालयासमोर सुरु केलेली मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम सुविधा नियमित सुरु ठेवण्यात यावी,ही विनंती, असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- साईभक्तांच्या सोयी-सुविधांच्या दृष्टिकोनातून उक्त संस्थेच्या विनंतीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथील सर्वे नं.२ पैकी क्षेत्रामधील साईप्रसाद निवासस्थान परिसरातील सुलभ शौचालय इमारतीसमोर १०x१२ फूट या मोकळया जागेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत सुरु केलेल्या मोबाईल, कॅमेरा क्लोकरुमसाठी वापरत असलेली जागा सावर्जनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने अथवा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जो भाडेदर जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.२६/०९/२०१८ ते दि.२५/०८/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भाडे कराराने वापरास देणेकामी कार्योत्तर मान्यता देता येईल व इतर मोबाईल क्लोकरुम प्रमाणेच अटी व शर्ती नमूद करुन भाडे करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथील सर्वे नं.२ पैकी क्षेत्रामधील साईप्रसाद निवासस्थान परिसरातील सुलभ शौचालय इमारतीसमोर १०x१२ फूट या मोकळया जागेत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत सुरु केलेल्या मोबाईल, कॅमेरा क्लोकरुमसाठी वापरत असलेली जागा सावर्जनिक बांधकाम विभाग निश्चित करील त्या भाडेदराने अथवा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जो भाडेदर जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.२६/०९/२०१८ ते दि.२५/०८/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भाडे कराराने वापरास देणेकामी कार्योत्तर मान्यता देणेच्या व इतर मोबाईल क्लोकरुम प्रमाणेच अटी व शर्ती नमूद करुन भाडे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे शिर्डी येथील सर्वे नं.२ पैकी क्षेत्रामधील साईप्रसाद निवासस्थान परिसरातील सुलभ शौचालय इमारतीसमोर १०x१२ फूट जागा साईभक्तांसाठी मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम करीता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना दि.२६/०९/२०१८ ते दि.२५/०८/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भाडे कराराने वापरास देण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदर जागेसाठी आकारावयाचे मासीक भाडेदराची रक्कम सावर्जनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चीत करुन घेण्यात यावी. सावर्जनिक बांधकाम विभागाने निश्चीत केलेले दरमहा भाडे तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

विषय नं.१७ **माहे सप्टेंबर-२०१८ ते डिसेंबर-२०१८ या कालावधीत रु.२५,०००/- व त्यापेक्षा अधिक रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तास प्रसादरुपाने भेट देण्यात आलेल्या श्री साईंच्या चांदीच्या पादुका व इतर साहित्यांची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ३० नोव्हेंबर २०१६ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.८७२ अन्वये, "रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची/वस्तु, साहित्याची देणगी देणा-या साईभक्तास २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साईंच्या पादुका तसेच एक श्री साईचरित्र ग्रंथ व एक श्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार दि.०९ जुलै,२०१७ रोजी झालेल्या गुरुपौर्णिमा उत्सवाच्या मुख्य दिवसापासून प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. दि.०९ जुलै २०१७ ते दि.३१ ऑगष्ट २०१८ अखेर एकूण १२०४६ नग चांदीच्या पादुकांचे प्रसादरुपाने वाटप करण्यात आले आहे.

तसेच, माहे सप्टेंबर २०१८ ते डिसेंबर २०१८ मध्ये रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची/वस्तु, साहित्याची देणगी देणा-या साईभक्तास संस्थानतर्फे सप्रेम भेट देण्यात आलेल्या चांदीच्या पादुका व इतर साहित्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.नं | महिना | चांदीच्या पादुका नग | श्री साईसतचरित्र | | | | | | | श्री डी फोटो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मराठी | हिंदी | इंग्रजी | तेलगू | तामीळ | गुजराथी | कन्नड | |
| ०१. | सप्टेंबर - २०१८ | ८८८ | ५५ | १७० | २४४ | २६१ | ८३ | ३६ | ३४ | ८८९ |
| ०२. | ऑक्टो. - २०१८ | ११९७ | ७१ | २२८ | ३५२ | ३३० | ११८ | ३८ | ४८ | ११९७ |
| ०३. | नोव्हेंबर - २०१८ | ९७२ | ७० | १८९ | २६९ | २५५ | ७१ | ४२ | ४७ | ९६१ |
| ०४. | डिसेंबर - २०१८ | १३१२ | ७४ | २७३ | ३९९ | ३३८ | १०२ | ४८ | ६८ | १२४९ |
| | एकूण ... | ४३६९ | २७० | ८६० | १२६४ | ११८४ | ३७४ | १६४ | १९७ | ४२९६ |

(जे साईभक्त नेहमीचे देणगीदार आहेत व त्यांचेकडे पूर्वीचे श्री साईसत्चरित्र असल्याने ते श्री साईसत्चरित्र/श्री डी फोटो सप्रेम भेट घेत नाहीत.)

तरी सप्टेंबर २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत, रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांस उपरोक्तप्रमाणे चांदीच्या पादुका व इतर साहित्य सप्रेम भेट देण्यात आले असून, त्याची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सप्टेंबर २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रकमेची देणगी देणाऱ्या साईभक्तांना सप्रेम भेट म्हणून दिलेल्या चांदीच्या पादुका, श्री साईचरित्र ग्रंथ व श्रीडी फोटो यांचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली व त्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.१८ **आयकर कामकाजासंबधी व मुल्यवर्धीत कामकाजासंबधी सनदी लेखापाल व वकील यांचे रु.५,७५,०००/- खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संबधीत आयकर कार्यालय, मुंबई यांनी आर्थिक वर्ष २०१५-१६ चे करनिर्धारण करुन रु.१८३ कोटी देय कर असलेबाबत व आर्थिक वर्ष २०१२-१३ चे फेर कर निर्धारण करणे बाबत नोटीस दिली आहे. अशा प्रकारे मागील वर्षांची फेर कर निर्धारणे आयकर विभागाकडुन करण्यात येतील. तसेच विक्रीकर विभाग, अहमदनगर यांनी आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅटकर निर्धारण करुन रु.२२.८३ कोटी व्हॅटकर देय असले बाबत नोटीस दिली आहे.

मा.व्यवस्थापन समिती निर्णय:- मा.व्य.स.निर्णय क्र.५३०/दि.२२.०८.२०१८ अन्वये, आयकर संबधीत "आवश्यकते नुसार फेर करनिर्धारण करणे, अपिल, आवश्यकते नुसार मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करणे बाबत तसेच त्यासाठी कर सल्लागार, सीए, विधिज्ञांची नियुक्ती करणे, त्यांचे मानधन ठरविण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार समिती सदस्य ॲड. श्री. मोहन जयकर यांना देण्यात यावे असे ठरले आहे " तसेच

मा.व्य.स.निर्णय क्र.२५०/दि.०४.०४.२०१८ अन्वये व्हॅट कर निर्धारणा संबधीत "या संदर्भात सर्व आवश्यक कायदेशिर कार्यवाही पुर्ण करण्यासाठी सध्याचे वकीला व्यतिरीक्त इतर वकील व सनदी लेखापाल यांची कायदेतज्ञ समिती सदस्य मा. ॲड. श्री मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली आवश्यतेनुसार नियुक्ती करणे व त्यासाठी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली आहे".

सदर निर्णयास अनुसरुन मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांनी संस्थानचे आयकर सल्लागार सीए श्री.राहुल केळकर, मुंबई यांचे वरिष्ठ सी ए श्री.दिपक टिकेकर, मुंबई यांचे मार्फत मा.उपायुक्त, आयकर यांचेकडे विहित पद्धतीने आवश्यक कागदपत्रे सादर करणे, वेळोवेळी सुनावणीकरिता हजर राहणे, फेर करनिर्धारणा संबंधीत अर्ज दाखल करणे, मा. उच्च न्यायालय,मुंबई व मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे प्रत्यक्ष हजर राहणे, अशा प्रकारचे कामकाज केले आहे. सदर कामकाजाचे सीए श्री.दिपक टिकेकर बील क्र.२०१८-२०१९/१०२/ दि.१७.११.२०१८ रु.१२,२७,२००/- सादर केले होते. मा.विश्वस्त श्री. मोहन जयकर यांनी दि.०८.०१.२०१९ रोजी मा.व्य.समितीचे सभेचेवेळी सदर बीलाची पडताळणी करुन सर्व करांसह रु.४,५०,०००/- आदा करणे बाबत प्रस्तावित केले आहे. तसेच व्हॅट करासंबधीत ॲड.पी.सी.जोशी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे पिटीशन, अपिल दाखल करणेसंबधीत व त्या करीता संस्थानचे वरिष्ठ विधीज्ञ श्री. एस गणेश, दिल्ली यांचे बरोबर हजर राहणे, आवश्यक माहिती संकलीत करुन देणे इ. कामकाजाचे बील क्र.००३२/२०१८-१९ /दि.२१.११.२०१८ रु.१,७५,०००/- त्यांनी सादर केले होते. मा. विश्वस्त श्री जयकर यांनी सदर बीलाची पडताळणी करुन बील कमी करणे बाबत त्यांना सुचविले होते. ॲड पी.सी.जोशी यांनी सदर बील कमी करुन रु.१,२५,०००/- मात्र सादर केले आहे. सदर बीलाची पडताळणी करुन सर्व करांसह रु.१,२५,०००/- आदा करणे बाबत प्रस्तावित केले आहे.

विभागाचा अभिप्राय:- मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन मा. विश्वस्त श्री जयकर यांचे समन्वयाने आयकर विषयक कामकाज व मुल्यवर्धीत कर विषयक कामकाज करण्यात आले असुन आयकर विषयक कामकाजाचे सीए श्री दिपक टिकेकर यांचे सर्व करांसह रु. ४,५०,०००/- व ॲड श्री पी.सी.जोशी यांनी

मुल्यवर्धीत कर विषयक कामकाजाचे दिलेल्या सुधारीत बील रु. १,२५,०००/- यांची पडताळणी कायदेतज्ञ समिती सदस्य श्री. मोहन जयकर यांनी केली असुन एकुण रु.५,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे आयकर विषयक कामकाज व मुल्यवर्धीत कर विषयक कामकाजाचे सीए श्री दिपक टिकेकर यांचे सर्व करांसह बील रु. ४,५०,०००/- व मुल्यवर्धीत कर विषयक कामकाजाचे ॲड श्री पी.सी.जोशी यांनी दिलेल्या सुधारीत बील रु.१,२५,०००/- यांची समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी पडताळणी केलेली असल्याने सदर दोन्ही बीलाची एकुण रक्कम रु.५,७५,०००/- मात्र खर्चास व सदरची रक्कम संबधीताना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१९** **शिर्डी विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमान वाहतुक सुरु करण्याचे दृष्टीने नविन टर्मिनल इमारतीचे बांधकाम, विमान पार्किंग व इतर अनुषंगीक कामासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादीत, मुंबई यांचे रक्कम रु.१०० कोटी अनुदान मागणीचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सुरु करण्याचे दृष्टीने नविन टर्मिनल इमारतीचे बांधकाम, विमान पार्किंग व इतर अनुषंगीक कामांसाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी रु.१०० कोटी इतके अनुदान उपलब्ध करुन देणेबाबत दि.२३/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. तूयांचे पत्राचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

"शिर्डी विमानतळावर यशस्वी हवाई वाहतुकीचा वर्षपुर्ती कार्यक्रम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी दि.०१/१०/२०१८ रोजी प्रवाशांना साई स्कार्फ देवून साजरा केला. याप्रसंगी स्पाईसजेटने तूयांचे बोईंग ७३७ विमानाचे दिल्ली ते शिर्डी व परत असे पहिले उड्डाण केले. सदरहू स्पाईसजेटचे विमानाने आलेल्या प्रवास्यांचे शिर्डी विमानतळावर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मार्फत स्वागत करण्यात आले. विमानतळासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दिलेल्या रु.५० कोटी अनुदाना बद्दल आम्ही संस्थानचे अभारी आहोत. सदर विमानतळावरील वाढती हवाई वाहतूक विचारात घेता सध्याच्या सुविधा विशेषतः टर्मिनल बिल्डींग व पार्किंग स्टॅण्डस् यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांनी आवश्यक सुविधांबाबत कार्ययोजना तयार केली आहे. त्यानुसार सध्याचे इमारतीजवळ १२५०० चौरस मिटर इमारत व ॲप्रॉन बांधणे प्रस्तावित केले आहे. त्यासाठी सल्लागार नेमणूक करणेत येत असून, त्यासाठी रु.५० कोटी रकमेची तरतुद केली आहे. तथापी, सदरहू प्रकल्पावरील खर्च रु.१०० कोटीचे वर जाण्याची शक्यता आहे. याबाबत प्रधान सचिव यांनी विमानतळाचे वाढीव सुविधांसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे निधी मागणी करणेस सहमती दिली आहे. सदरचे टर्मिनल बिल्डींग व पार्किंग स्टॅण्डस् यामध्ये वाढ करणेकामासाठी अंदाजे रु.१५० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी संस्थानने सदर कामासाठी रु.१०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी विनंती केली आहे तसेच याबाबत निर्णय झाल्यावर संस्थानला प्रकल्पाची सविस्तर माहिती देण्यात येईल."

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुद:

कलम २१ च्या पोट-कलम (१क) अन्वये, भक्तांच्या सोयीसाठी बस, वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभूत सुविधा यासारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविण्यासाठी शासकीय विभागांना, शासकीय महामंडळांना, शासकीय कंपन्यांना किंवा शासकीय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल.

विभागाचा अभिप्राय :-

१. संस्थानमार्फत यापूर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्र.सासंवि-२०११/(प्र.क्र.४४)/का. १६ दि. २४ जून २०११ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार शिर्डी विमानतळासाठी रु.५० कोटी निधी यापूर्वी देण्यात आलेला आहे.

२. सदर विमानतळाचा उपयोग केवळ साईभक्तांसाठी होत असून त्याचा विकास झाल्यास जगभरातील भाविकांना श्री साईबाबांचे दर्शनाचा लाभ घेता येईल.

३. मा. व्यवस्थापन समितीचे सदर प्रस्तावास मान्यात दिल्यास शासनाचे मान्यतेन अनुदान विमानतळ प्राधिकरणाकडे वर्ग करता येईल.

प्रस्ताव:- शिर्डी विमानतळावर आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक सुरु करण्याचे दृष्टीने नविन टर्मिनल इमारतीचे बांधकाम, विमान पार्किंग व इतर अनुषंगीक कामांसाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित, मुंबई यांनी मागणी केलेले रु १०० कोटी अनुदान उपलब्ध करुन देणेचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५७** **मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचिकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचिका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदीन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील ॲड नितीन भवर यांनी दुरध्वनीव्दारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.**

**मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरुन मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२०** **MVAT संबधीत अपील दाखल करण्यास व देय होणारी १० % व्हॅट कर रक्कम भरण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** विक्रीकर कार्यालय, अहमदनगर यांचेकडुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅट करनिर्धारण करण्यात येऊन दि.११.०७.२०१८ रोजी रु.२२.८३ कोटी व्हॅट कर देय असलेबाबत आदेश आला आहे. सदर कर भरणेबाबत त्यांचेकडुन वेळोवेळी पत्रव्यवहार होत असुन दि.२८.११.२०१८ रोजी १० दिवसांचे आत व्हॅटकराची रक्कम जमा करणे बाबत कळविले आहे. व्हॅट करातून सुट मिळणेबाबत आवश्यक ते प्रयत्न संस्थानकडुन करण्यात आले असुन अंतिमतः व्हॅट करातुन सुट मिळत नसलेबाबत स्पष्ट झाले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय:-

१) मा.व्य.स.निर्णय क्र.२५०/दि.०४.०४.२०१८ अन्वये विक्रीकर विभागाच्या नोटीसीचे अवलोकन करण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली. या संदर्भात आवश्यक कायदेशिर कार्यवाही पुर्ण करण्यासाठी सध्याचे वकीलां व्यतिरिक्त इतर वकील व सनदी लेखापाल यांची कायदेतज्ञ समिती सदस्य ॲड. मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली आवश्यकतेनुसार नियुक्ती करणे व त्यासाठी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता मिळाली आहे.

२) मा.व्य.स.निर्णय क्र.४७७/दि. २६.०७.२०१८ अन्वये व्हॅट बाबत सद्यस्थितीचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

३) मा.व्य.स.निर्णय क्र.७७६/दि.१३.१२.२०१८ अन्वये सद्यस्थितीचे अवलोकन करण्यात आले. त्यामध्ये मा. उपायुक्त विक्रीकर विभाग यांचेकडे अपिल दाखल करणे बाबत विचाराधिन असल्याचे नमुद केले होते. यावर "व्हॅटकर कामकाजा बाबतचे सद्यस्थितीचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली."

४) उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयांस अनुसरुन मा. विश्वस्त श्री मोहन जयकर यांचे समन्वयाने अनुसरुन मा.उपायुक्त विक्रीकर विभाग यांचेकडे अपील दाखल करणे संबंधीत आवश्यक कागदपत्रांची जमवाजमव करण्यात आली आहे. त्याकरिताचे आवश्यक फॉर्मस् व अपीलचा मसुदा त्यांनी पाठविला असुन दि.०८.०१.२०१९ रोजी प्रत्यक्ष कागदपत्रांची पडताळणी करुन त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा केल्या आहेत.

५) मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर यांचेकडे आकारणी करण्यात आलेल्या व्हॅट कराचे पुर्न-करनिर्धारण करण्यासाठी अपिल दाखल करावे लागणार आहे. पुर्न-करनिर्धारणात करदायित्व, दंड, व्याज इत्यादीमध्ये सुट किंवा सवलत मिळु शकते. मात्र व्हॅट कायद्याच्या तरतुदीनुसार अपिल दाखल करण्यापुर्वी मुळ व्हॅट कराच्या १०% रक्कम शासनाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार,

   १) मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर येथे अपिल दाखल करण्यास,

   २) अपिल दाखल करण्याकरीता देय व्हॅट कर एकुण रु.२२,८३,३८,७४५/- पैकी दंड व व्याज वजा जाता मुळ व्हॅट कर रु.७,६१,१२,९१५/- रकमेच्या १०% रु.७६,११,२९२/- व्हॅटकर भरण्यास,

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.५८** **प्रस्तुत प्रकरणी विक्री अधिकारी, अहमदनगर यांचेकडील सन २००९-२०१० चे व्हॅट कर निर्धारणा विरुध्द मा.ना.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे विक्री कर अधिकाऱ्यांच्या उपरोक्त आदेशाविरुध्द तुर्त अपील दाखल करण्याची आवश्यकता नाही. असे समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी सांगीतले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणात तुर्त अपील दाखल करु नये, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२१** **निळवंडे धरणाचे कालव्यांच्या विकसनासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना उसनवार द्यावयाच्या रक्कम रु. ५०० कोटी निधी संदर्भात करावयाच्या सामंजस्य कराराच्या (MOU) प्रारुपास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रं. सासंवि-२०१४/६११/प्र. क्र.८८/का.१६, दि. ३०.११.२०१८ च्या शासन निर्णयानुसार निळवंडे धरणाच्या कालव्याच्या विकासासाठी रु. ५००.०० कोटी निधी उसनवार तत्वावर (बिनव्याजी परत करण्याच्या बोलीवर) जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना देण्याचा शासन निर्णय झाला आहे.

सदर शासननिर्णयातील मुद्दा क्रं. (ब) नुसार निधी वितरणापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तसेच गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्यामध्ये शासनाच्या मंजुरीने सामंजस्य करार (MOU) करण्यात यावा असे नमूद केले आहे. त्यानुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेकडून करारनाम्याचा मसुदा प्राप्त करून संस्थानच्या अटी शर्ती सह खालीलप्रमाणे आहे.

**:- सामंजस्य करार :- (MOU) :-**

| | | |
|---|---|---|
| **करारनामा दिनांक** | :- | दिनांक – . .२०१९ |
| **करारनामा लिहून घेणार** | :- | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी<br>ता. राहाता जि. अहमदनगर तर्फे<br>श्रीमती रुबल प्रखेर अग्रवाल, वय - ३५ वर्षे<br>मुख्य कार्यकारी अधिकारी. रा. शिर्डी |

**पार्टी नं. ०१**

| | | |
|---|---|---|
| **करारनामा लिहून देणार** | :- | जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासनातर्फे<br>गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ तर्फे<br>श्री वय - वर्षे<br>कार्यकारी संचालक, रा. औरंगाबाद |

**पार्टी नं. ०२**

१) सदर निधी केवळ उर्ध्व प्रवरा (निळवंडे-२) प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्याच्या विकसनाचे कामासाठी खर्च करण्यात येईल.

२) सदर निधीपैकी रु. १२५ कोटी इतका पहिला हप्ता सामंजस्य करार झाल्यानंतर लवकरात लवकर गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी उपलब्ध करून देण्यात यावा. यानंतर प्रत्येक वेळी अदा केलेल्या रु. १२५ कोटी रुपयांचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी पुढील हप्ता गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांना १५ दिवसांत अदा करावा.

३) जलसंपदा विभाग सदर काम पहिल्या हप्त्याच्या वाटपापासून २ वर्षात पुर्ण करील.

४) सदर निधी फक्त नवीन कामांवर खर्च करण्यात येईल. तसेच संस्थानतर्फे देण्यात येणा-या रु. ५०० कोटी अनुदानातून पुर्ण करावयाच्या कामांचा सर्वसाधारण आराखडा सामंजस्य करारनामा केल्यापासून १ महिन्याच्या आत महामंडळाने संस्थानला सादर करावा.

५) संस्थानने शेवटचा हप्ता वितरीत केलेल्या दिनांकापासून १ वर्षाने परतफेडीचा पहिला हप्ता देय होईल त्यानुसार शेवटचा हप्ता वितरीत केल्यानंतर त्यापुढील १० वर्षात समान वार्षिक हप्त्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना जलसंपदा विभागामार्फत, कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद सदर रक्कम परत करेल.

६) संस्थानतर्फे देण्यात येणा-या रु. ५०० कोटी मधून सुरु केलेली कामे अपुर्ण राहिल्यास त्यासाठी अतिरिक्त अनुदान संस्थानकडून देण्यात येणार नाही. त्यासाठी आवश्यक निधीची उभारणी महामंडळाने त्यांचे स्तरावर करावी.

७) महामंडळास शेवटचा हप्ता वितरीत केल्यानंतर पुर्ण झालेल्या कामांचा तसेच शेवटच्या हप्त्यातून प्रस्तावित कामांचा सविस्तर अहवाल महामंडळ श्री साईबाबा संस्थानला १ महिन्यात सादर करेल.

८) विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रं. सासवि-२०१४/६११/प्र.क्र.८८/का. १६ दि. ३०.१०.२०१८ मधील अटी शर्ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांचेवर बंधनकारक राहतील.

९) गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी अनुदान कालावधीतील वैधानिक लेखापरिक्षण अहवाल संस्थानला सादर करावा.

१०) करारातील अटींबाबत, अटींच्या अर्थाबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचा निर्णय अंतिम राहील.

उपरोक्त प्रमाणे सामंजस्य करार (MOU) प्रारुप मान्यतेस्तव व मान्यतेनुसार शासनास मंजुरीसाठी सादर करण्याबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.५९ **मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानशी संबधीत जनहीत याचीकेवरील दि.३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचीका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ संस्थानचे दैनंदीन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरीक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेण्यात येऊ नये, असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील अॅड नितीन भवर यांनी दुरध्वनीव्दारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यत निळवंडे धरणाचे कालव्यांच्या विकसनासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना उसनवार द्यावयाच्या रक्कम रु.५०० कोटी निधी संदर्भात करावयाच्या सामंजस्य कराराच्या (MOU) प्रारुपास मान्यता देणेबाबतचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

विषय नं.२२ **मोतीचुर लाडू व बुंदी प्रसादातील ‘खिसमीस’ या ड्रायफ्रुटचा वापर बंद करणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्तावना– दमट वातावरणामुळे तयार होणा-या बुंदीवरआर्द्रतेचा परिणाम होऊन,बुंदीमध्ये ओलसरपणा राहतो, त्यामुळे बुंदी पाकात भिजत घातल्यास पाकात पुर्णतः भिजत नाही व लाडु वळविणेसाठी घेतल्यास सदरचे लाडु वळले जात नाहीत, त्यापासुन तयार होणारेलाडु जास्त काळ टिकत नाहीत. बुंदी पुर्णपणे पाकात न भिजल्यामुळे लाडु वळविणेस अडचणी येत असतात, जेथे २५ ते ५० ट्रे लाडु एका वेळेस तयार होत असतात, त्याठिकाणी सदरचे बुंदीपासुन कारागीर केवळ १० ते १५ ट्रे लाडु वळत आहेत. तसेच लाडु जास्त काळ टिकत नसल्याने लाडुचा स्टॉक तयार करून ठेवता येत नाही. सदरचे लाडु खराब का होत आहेत याबाबत संबंधीत ठेकेदाराचे आचारी व ठेकेदार यांचेशी चर्चा केली असता त्यांनी लाडुमध्ये खिसमिसचा वापर बंद केल्यास लाडुची टिकण्याची क्षमता वाढली जाईल असे कळविले आहे. त्यावर लाडु प्रसाद निर्मिती विभागाने ठेकेदाराकडुन लेखी अभिप्राय देणेबाबत कळविले होते. त्यासअनुसरुन सदरचे पत्रांत त्यांनी खिसमिसच्या वापराबाबत पुढीलप्रमाणे लेखी अभिप्राय दिला आहे.

“मोतीचुर लाडु प्रसादातील ‘खिसमिस’ या ड्रायफ्रुटच्या वापराबाबत आमचेकडील आचारी यांच्यामते खिसमिस ओलसर असल्यामुळे लाडु प्रसाद आतील बाजुने सुकलेला नसतो व खिसमिसला बुरशी येते, त्यामुळे लाडु प्रसादाची चव बदलते व जास्त कालावधी नंतर लाडुप्रसादाचा वास येतो. लाडु प्रसाद खराब होतो, वरील सर्व कारणामुळे लाडुप्रसादामध्ये खिसमीस वापरणे आम्हाला अयोग्य वाटते.” असा अभिप्राय लाडु व बुंदी प्रसाद तयार करणा-या ठेकेदाराने कळविला आहे.सध्या मोतीचुर लाडु तयार करतांना ०१ क्विंटलच्या साखरेच्या मटेरीयलसाठी ०२ किलोग्रॅम काजु व ०२ कि.ग्रॅ. खिसमिसचा वापर केला जात आहे.

खिसमिस सारखे ओलसर पदार्थ लाडुमध्ये वापरल्यामुळे गरम साखरेच्या पाकाने त्यास चिकटपणा निर्माण होतो व सदरचे खिसमिसला चिकटपणा प्राप्त झाल्याने व लाडुच्या आतमधील भागात असल्याने लाडु पुर्णत: सुकत नाही. जास्त काळ खिसमिस लाडुमध्ये ओलसर राहिल्यानेही लाडु ओलसर राहतो. सदरचे कारणाने देखील लाडुस बुरशी येऊ शकते अथवा लाडु खराब होऊ शकतो असे ठेकेदारांचे आचारी यांचे म्हणण्यानुसार लाडु तयार करतांना केवळ काजु पाकळीचा वापर करुन, खिसमिस वापरणे बंद करणे योग्य होईल असे वाटते, जेणेकरुन लाडु प्रसाद टिकण्याची क्षमता वाढेल व लाडु जास्त काळापर्यंत खाण्यायोग्य राहील असे विभागाचे नम्र मत आहे.

त्यानुसार दि.०९/१०/२०१८ रोजीपासुन मोतीचुर लाडु प्रसादामध्ये खिसमिसचा वापर बंद करण्यात आला होता. सदरचे प्रयोगाअंती असे आढळुन आले की, खिसमिसचा वापर बंद केल्यामुळे लाडु लवकर व पुर्णतः सुकतो त्यामुळे लाडुची टिकण्याची क्षमता वाढली आहे. त्याचप्रमाणे खिसमिसचा वापर बंद केलेपासुन लाडुबाबत खराब झाल्याची अथवा उग्र वास येत असल्याची किंवा कोणतीही तक्रार अद्यापपर्यंत आलेली नाही. सदरची वस्तुस्थिती लक्षात घेता –

अ) मोतीचुर लाडु प्रसादातील खिसमिसचा वापर येथुन पुढे बंद केल्यास लाडुची टिकाऊक्षमता वाढण्यास मदत होईल व जास्त दिवस प्रसाद टिकत असल्यामुळे दुरवरुन येणा-या साईभक्तांना प्रसाद घरी घेऊन जाता येईल व लाडु बाबत येणा-या तक्रारी येणार नाहीत असे विभागाचे नम्र मत आहे.

ब) त्याचप्रमाणे सध्या बुंदी प्रसादामध्येही खिसमिसचा वापर होत आहे. बुंदी प्रसादामध्ये वापरात येणारी सध्याची खिसमिस हि रुपये १५४/- चे दराची असल्याने थोडीसी ओलसर येते. त्यामुळे बुंदी पाकात भिजविल्यामुळे बुंदीलाही ओलसरपणा येऊन बुंदी नरम होते. त्यामुळे नरम बुंदी प्रसाद जास्त दिवस टिकत नाही किंवा पाकीटात हवा न लागल्यामुळे बुरशी येऊ शकते. त्यासाठी बुंदी प्रसादामध्ये खिसमिसचा वापर करावयाचा झाल्यास पुर्णतः सुकलेली व "अ" ग्रेडची खिसमिस वापरल्यास बुंदीप्रसादाची गुणवत्ता व टिकाऊक्षमता वाढण्यास मदत होईल अशा खिसमिसचा भाव सध्या मार्केटमध्ये अंदाजे ४५० ते ५०० रू किलो आहे. त्यामुळे खर्च तरतुदमध्ये देखील अडीच पटीने वाढ होईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- सध्या मोतीचुर लाडु तयार करतांना ०१ क्विंटलच्या साखरेच्या मटेरीयलसाठी ०२ किलोग्रॅम काजु व ०२ कि.ग्रॅ. खिसमिसचा वापर केला जात असुन, खिसमीसमुळे लाडुमधील ओलसरपणा कायम टिकुन राहत असतो. त्यामुळे ठेकेदाराकडील आचा-यांचे अभिप्रायानुसार सदरचे खिसमीस मोतीचुर लाडु प्रसाद तयार करतांना वापर केल्यास लाडु केवळ बाहेरील भाग सुकला जातोव आतील भागात खिसमीसमुळे ओलसरपणा राहतो, त्यामुळे लाडु प्रसादास जास्त काळ ठेवल्यास आंबट वास येऊन बुरशी येते. त्याकरीतायेथुन पुढे लाडु व बुंदी प्रसादामधील खिसमीसचा वापर बंद करुन प्रसाद तयार करून त्याचे पाकीटांची विक्री व वाटप करता येईल, त्यामुळे लाडु व बुंदी प्रसादाची टिकाऊ क्षमता (Life) वाढण्यास मदत होणार आहे, त्याचप्रमाणे लाडु प्रसादाचा दर्जा आणखी उतकृष्ट होण्यासाठी सध्या वापरत असलेले काजु पाकळीचे प्रमाण एका क्विंटलसाठी ०२ किलोग्रॅम ऐवजी ०३ किलो ग्रॅम करावे असे विभागाचे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त नमुद केलेनुसार मोतीचुर लाडु व बुंदी प्रसादात खिसमिस वापरल्याने प्रसाद जास्त काळ टिकत नसल्याने, लाडु व बुंदी प्रसादामधील खिसमिसचा वापर येथुन पुढे बंद करुन, फक्त काजु पाकळी या ड्रायफ्रुटचा वापर करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मोतीचुर लाडु व बुंदी प्रसादात सध्या वापरण्यात येणाऱ्या खिसमिस ऐवजी प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यासाठी पुर्णतः सुकलेली "अ" ग्रेडची खिसमिस वापरण्यास व त्याकामी येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली. तीन महिन्यातील अनुभव विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सविस्तर प्रस्ताव सादर करावा,असे ठरले**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.२३** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव-२०१८ संपल्याकारणाने संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता ०५ नग outdoor LED Wall Screen खरेदी करणेचे प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५६(घ) साईभक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपयायोजना हाती घेणे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– दि. २६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०२,निर्णय क्र.४६१ (२ निर्णय क्र.४२३).

प्रस्तावना- संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१८ रोजीचे सभेतील विषय क्र.०२,निर्णय क्र.४६१ (२ निर्णय क्र.४२३) नुसार "संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता प्रथम LED Wall Screen, Size 4.80m x 2.88m ०५ नग LED Wall Screen ई-निवीदा प्रक्रिया राबवुन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ७ कोटी ९० लाख + GST मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच संस्थान परिसरात साईभक्तांना श्रीं चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता सदरचे LED Wall Screen बसविणेकामी प्रथम स्थानिक उपसमितीमध्ये जागेची निश्चिती करणेत यावी. तसेच सभेच्या वेळी LED पॅनेलचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. संस्थानचे सर्व निवासस्थाने, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा रुग्णालय, देणगी कार्यालय इ. ठिकाणी LED ची उपयुक्तता असुन त्याचे अंदाजे खर्च २५ ते ३० लाख असुन प्रथमतः १० LED पॅनेल देखील ई-टेंडर पद्धतीने खरेदी करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.२.५ कोटी चे खर्चास मान्यता देण्यात आली"

त्यानुसार, एकुण ०५ नग LED Wall Screen खरेदी करणेकरीता ई-निवीदा मागविणेकामी दि.११/०९/२०१८ रोजीचे मंजुर टिपणी अन्वये महाराष्ट्र /शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१९/०९/२०१८ ते दि.०९/१०/२०१८ अखेर (Tender ID-2018_SAI_353450_1) अन्वये ई-निवीदा प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

सदर निवीदा प्रक्रीयेत एकुण ०३ निवीदाधारकांच्या ऑनलाईन निवीदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यांचे ई-निवीदांतील तांत्रिक लिफाफे (Technical Bid) दि.२५/१०/२०१८ रोजीचे मा. खरेदी समितीपुढे उघडण्यात

आलेले होते. तथापी, सदर निवीदाधारकांचे तांत्रिक कागदपत्रांची तपासणी केली असता ०३ ही निवीदाधारक अपात्र झालेले आहे. त्यानुसार सदरकामी यापुर्वी प्रसिद्ध केलेल्या ई-निवीदेतील Qurey संबंधीत अनुपालन/खुलासा याचा समावेश सुधारीत ई-निवीदा मसुद्यात करण्यात येवुन नव्याने फेर ई-निवीदा प्रसिद्ध करणेकामीचा प्रस्ताव दि.२८/११/२०१८ रोजी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी " महोत्सव संपलेला आहे. आता गरज आहे का? Committee समोर ठेवा " असे निर्देश दिलेले आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ मध्ये साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभ होण्यासाठी मोठया साईजचे LED Wall Screen मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात कार्यान्वित करणे आवश्यक असल्याने सदरचे LED Wall Screen खरेदी करणेची कार्यवाही करणेत येत होती. परंतु, आता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ चा कालावधी संपुष्टात आला असल्याकारणाने सदर LED Wall Screen खरेदीबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेनुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ मध्ये साईभक्तांना श्रीं चे दर्शन सुलभ होण्यासाठी मोठया साईजचे LED Wall Screen मंदिर परिसरात व संस्थानचे विविध परिसरात कार्यान्वित करणे आवश्यक असल्याने सदरचे LED Wall Screen खरेदी करणेची कार्यवाही करणेत येत होती. परंतु, आता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ चा कालावधी संपुष्टात आला असल्याकारणाने सदर LED Wall Screen खरेदीबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

विभागाचा प्रस्ताव– उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-२०१८ चा कालावधी संपुष्टात आला असल्याकारणाने सदर LED Wall Screen खरेदीबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर सविनय सादर.

**निर्णय क्र.६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव संपुष्टात आला असला तरी साईभक्तांची वाढती गर्दी विचारात घेता, संस्थान परिसरात साईभक्तांना "श्रीं" चे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६१ नुसार ठरविल्याप्रमाणे ०५ नग Outdoor LED Wall Screen खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.२४** **नविन साठवण तलाव या ठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे व पॅनल खरेदी करुन बसविणे कामाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

शासन निर्णय परिच्छेद क्र.४.१ खरेदी किंमत रु. ३ लाखापेक्षा अधिक असेल तेव्हा ई-निविदा प्रणालीचा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

प्रस्ताव:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मौजे निमगांव (को-हाळे) शिवारातील गट नं.२४५/१, २२१/१, २२९ मध्ये साईभक्तांची दैनंदिन पाण्याची गरज भागविण्यासाठी साईभक्तांचे देणगी सहयोगातून साठवण तलावाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदरील साठवण तलावावर रात्रीचे प्रकाश योजनेकरीता स्ट्रीट लाईटची उभारणी करणे व मोटार पंपसेट करीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीज जोडणी करुन घेणे विषयी पाणीपुरवठा विभागाने पत्र पाठवून कळविले आहे.

नविन साठवण तलावावर स्ट्रीट लाईट उभारणी करणे व पॅनेल खरेदी करुन बसविणेचे काम हे बाहेरील ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागवून करुन घ्यावे लागणार आहे. खर्चाचा अहवाल महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१८-२०१९ नुसार अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate Rs | Amount Rs |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | 8-3-13 | Providing & erecting ६ m high (clear height) galvanised octagonal pole with foundation bolts having bottom of १३० mm A/F, top ७० mm A/F, Smart Pack Junction Box with ४ poles ४० Amp. MCB & ३C x २.५ aq.mm.copper flexible cable from fitting to MCB for connection & stud type terminal block suitable for ४C x १६ sq.mm cable on provided foundation as per specification no. OHPL / OPL | 25 Nos. | 15173.93 | 3,79,348.25 |
| ०२) | ८-३-३० | Providing and erecting galvanised १०००mm single arm sword type bracket with FRP dome and ball as per specification no. OHPL / PBKT | 25 Nos. | 2654.23 | 0,66,355.75 |
| ०३) | २-५-८ | Supplying and erecting LED street light fitting १००W, including lamp, with PF > ०.९५ class IP ६५ and above housing of pressure die cast | 25 Nos. | 9674.95 | 2,41,873.75 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | aluminium alloy and heat sink extruded aluminium complete per specification No FG-ODF/FLS-૨. | | | |
| ૦૪) | ૯-૧-૪ | Providing pipe type earthing with ૪૦mm. dia. G.I. pipe or ૨૦ mm dia. G.I. Rod complete with all materials as per specification no. EAEP | 25 Nos. | 1468.82 | 0,36,720.50 |
| ૦૫) | 16-3-9 | Making M- ૨૦ grade reinforced cement concrete foundation by considering the safe soil bearing capacity at site as ૧૦ T/sq.m at ૧.૫ m depth including supply of steel, concrete, excavation and fixing provided nut bolts with the help of template, duly plastered as per design complete (for ૬m to ૮m high octagonal /conical GI pole). | 25 Nos. | 3844.34 | 0,96,108.50 |
| ૦૬) | 7-1-28 | Supplying, erecting & terminating XLPE armoured cable ૪ core ૧૦ sq. mm. aluminium conductor with continuous ૫.૪૮ sq. mm. (૧૨ SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 900 Mtrs. | 179.93 | 1,61,937.00 |
| ૦૭) | 7-6-7 | Supplying & laying (including excavation) ૨૫ cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to ૯૦ cms. Below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet). | 700 Mtrs. | 727.94 | 5,09,558.00 |
| ૦૮) | Non CSR | Providing and constructing (inclusive excavation) Brick Masonry Work (૯" Brick Work) Inspection chamber ૭૫x૭૫x૯૦ cm internal side with ૭૫ mm thick RCC cover, filling of screened sand and smooth internal plaster etc. including watering, streaking joint on expand faces ,rocking at joint on exposed face and watering complete and cleaning the site by removing debris and making the site good. | ૩૨ Nos. | 5000.00 | 1,60,000.00 |
| ૦૯) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of maintenance free earthing comprising of Electrode of ૧૭.૨ mm diameter Low Carbon Steel with ૨૫૦ micron molecular copper bonded earthing rod of Length ૩m along with ૨૫ kg Carbon based environment friendly back fill ground enhancing compound required to fill up the excavated earth with required quantity complete. Specification no. EA-MOBI | ૦૭ Nos. | 14315.45 | 1,00,208.15 |
| ૧૦) | 9-2-2 | Supplying and erecting copper strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. As per specification no. EA-EP. | 10 Kgs. | 862.00 | 0,08,620.00 |
| ૧૧) | ૯-૨-૪ | Supplying and erecting Annealed bare copper wire of high purity of different sizes used for earthing on wall with necessary copper clamps fixed on wall/cable/conduit with screws in an approved manner. | 30 Kgs. | 823.20 | 0,24,696.00 |
| ૧૨) | Non CSR | Supplying and erecting Outdoor, Stand Mounted Water Proof Feeder Pillar for Street Light Panel with ૬૩ Amp. TPN MCCB incomer and Three nos. ૩૨ Amp MCB for outgoing also with suitable timer, contactor, transformer, micro processor based manager and provision for termination of Incoming minimum ૨૫ sq.mm & outgoing minimum ૧૦ sq.mm cables complete erected in min. ૧૪ gauge CRCA sheet box with supporting angle, self lock, gasket ang slating top erected on CC foundation in an approved manner. | 01 No. | 20000.00 | 0,20,000.00 |
| ૧૩) | 7-1-15 | Supplying, erecting & terminating XLPE armoured cable ૩½ core ૨૫ sq. mm. aluminium conductor with continuous ૫.૪૮ sq. mm. (૧૨ SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 75 Mtrs. | 242.26 | 0,18,169.50 |
| ૧૪) | 7-7-3 | Supplying & erecting Flang type brass cable glands for ૩½ core ૨૫ sq. mm. for XLPE armoured cable as per specification no. CB-GL | 04 Nos. | 105.84 | 0,00,423.36 |
| ૧૫) | 7-9-2 | Supplying & erecting crimping type copper lugs for cable ૨૫ sq. mm . complete as per specification no. CB-CL/CU | 16 Nos. | 27.05 | 0,00,432.80 |
| ૧૬) | ૭-૧-૧૮ | Supplying, erecting & terminating XLPE armoured cable ૩½ core ૭૦ sq. mm. aluminium conductor with continuous ૮.૩૫ sq. mm. (૧૦ SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall / trusses / pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 350 Mtrs. | 493.92 | 1,72,872.00 |
| ૧૭) | ૭-૭-૬ | Supplying & erecting Flang type brass cable glands for ૩½ core ૭૦ sq. mm. for XLPE armoured cable as per specification no. CB-GL | 02 Nos. | 178.16 | 0,00,356.32 |
| ૧૮) | 7-9-5 | Supplying & erecting crimping type copper lugs for cable ૭૦ sq. mm. complete as per specification no. CB-CL/CU | 04 Nos | 67.03 | 0,00,268.12 |
| ૧૯) | Non C.S.R. | Supplying, erecting & terminating of Stand / Wall Mounted Water Proof Main Distributions Panel with ૧૪ gauge CRCA sheet complete with powder coating, clip-on terminal for outgoing cable connection, required size of bus bar for incoming cable connection, incoming ang outgoing chamber with required size of bus bar, self locking, Voltmeter, Ampere meter, selector switch for voltmeter & Amp. meter, KWH meter erected on CC/MS Stand foundation. Containing the | 01 Nos. | 145000.00 | 1,45,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | following items.<br>०१).२५० Amp. ४ pole MCCB for incomer -०१ no.<br>०२).६३ Amp. ४ pole MCCB for outgoing -०२ nos.<br>०३).३२ Amp. ४ pole MCCB for outgoing -०२ nos.<br>०४).Automatic star/delta starter with ६३ Amp MCCB for १० H.P. with ON/OFF indicator and Amp Meter -०२ nos.<br>०५).Automatic star/delta starter with ३२ Amp. MCCB for ०५ H.P. with ON/OFF indicator and Amp. Meter -०२ nos.<br>०६). Indicator for main supply & every main switch | | | |
| २०) | Non C.S.R. | Supplying & erecting original १.२५ mm CRCA sheet metal enclosures with Door and locking system of ६००mm x ६००mm x ४५०mm size water proof Box for MSEDCL Meter with २५० Amp. TPN MCCB. | 01 Nos. | 25000.00 | 0,25,000.00 |
| | | | | Total Rs.:- | २१,६७,९४८.०० |

मागणी:- उपरोक्तप्रमाणे नविन साठवण तलाव याठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे, पॅनेल खरेदी करुन बसविणे इत्यादि कामाकरीता महाराष्ट्र शासनमान्य सी.एस.आर.सन २०१८-२०१९ नुसार रक्कम रु.२१,६७,९४८/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. सदरील खर्चास व बाहेरील ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नविन साठवण तलाव याठिकाणी स्ट्रीट लाईट उभारणी करणे, पॅनेल खरेदी करुन बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२१,६७,९४८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२५ शिर्डी येथील स.नं.१७१/१२ मधील बसस्थानक व त्यावरील भक्तनिवास इमारतीचे आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी आर्किटेक्ट नाशिक यांचे इलेक्ट्रीकल कामाची फी आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** बांधकाम विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या शिर्डी बसस्थानक प्रकल्पाचे बांधकामाकरीता मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांना आर्कीटेक्ट म्हणून प्रकल्पाच्या २ % + सर्व्हीस टॅक्स इतकी फी अदा करणेचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-०७-२००८ चे सभेतील विषय क्र.१८ निर्णय क्र.५७६ अन्वये मान्यता मिळालेली आहे. तसेच बांधकाम विभागामार्फत पुन्हा सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७-११-२००९ चे सभेतील विषय क्र.०९ निर्णय क्र.८०७ अन्वये शिर्डी बसस्थानक प्रकल्पासाठी आर्कीटेक्चरल तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्ला सेवा पुरविणेसाठी मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांना प्रकल्पाच्या किंमतीचे २.७५ % + सर्व्हीस टॅक्स इतकी फी आदा करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार बांधकाम विभाग यांचेमार्फत आर्कीटेक्चरल तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्ला सेवा पुरविणेसाठी आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. परंतू आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्ला सेवा पुरविणेस असमर्थता व्यक्त करुन फक्त आर्कीटेक्ट म्हणून (प्रकल्पाच्या किंमतीचे २ % + सर्व्हीस टॅक्स इतकी फी) सेवा देण्यास तयार असल्याचे सांगितले. त्यानुसार आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांचेशी बांधकाम विभागामार्फत करारनामा करण्यात आलेला आहे. बांधकाम विभागामार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये इमारतीचे बांधकामाबरोबरच या इमारतीमधील विद्युतीकरण कामाचाही सदर प्रस्तावामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांनी प्रथम बील तसेच व्दितीय बील सादर केलेले होते. त्यावेळी आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांनी सादर केलेले प्रथम तसेच व्दितीय बील विद्युत विभागाचे टिपणीन्वये बांधकाम विभागाचे ‘‘ बसस्थानक उभारणी ’’ कामाचे बजेट मधून अदा करण्यात आलेले होते. सदर बजेट बांधकाम विभागाकडे असून त्यातून ही बीले अदा केली जातात.

आता आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांनी बसस्थानकाच्या विद्युतीकरण कामाच्या आर्कीटेक्ट फी चे सादर केलेल्या फायनल बीलाचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | आर्कीटेक्ट यांची मंजुर फी | २ % + सर्व्हीस टॅक्स |
| २ | विद्युतीकरण कामाची झालेली एकुण रक्कम | ६६,५५,४५३.०० |
| ३ | आर्कीटेक्ट यांची २ % प्रमाणे होणारी कामाची एकुण रक्कम (०१ x ०२) | १,३३,१०९.०६ + सर्व्हीस टॅक्स |

| | | |
|---|---|---|
| ४ | सादर केलेल्या अंतिम बीलाची रक्कम | १,३३,११०.०० |
| ५ | विद्युत विभागामार्फत दुरुस्त केलेली रक्कम | १,३३,१०९.०० |
| ६ | यापुर्वी अदा केलेल्या १ ले रनिंग बीलाची रक्कम | ०,५३,५७३.०० + सर्व्हीस टॅक्स |
| ७ | यापुर्वी अदा केलेल्या २ रे रनिंग बीलाची रक्कम | ०,४७,१३२.०० + सर्व्हीस टॅक्स |
| ८ | एकुण वजावट (०६+०७) | १,००,७०५.०० + सर्व्हीस टॅक्स |
| ९ | निव्वळ देय रक्कम(०५-०८) | ०,३२,४०४.०० + सर्व्हीस टॅक्स |
| १० | देय रक्कम | ०,३२,४००.०० + सर्व्हीस टॅक्स |

**मागणी** :- तरी आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांना बसस्थानकाच्या विद्युतीकरण कामाच्या आर्कीटेक्टच्या फी चे फायनल बीलाची रक्कम रु. ३२,४००/- (अक्षरी रक्कम रु.बत्तीस हजार चारशे मात्र) + सर्व्हीस टॅक्स मात्र बांधकाम विभागाचे ‘‘ बसस्थानक उभारणी ’’ कामाचे बजेट मधून लेखाशाखा विभागामार्फत अदा करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

निर्णय क्र.६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, बसस्थानकाच्या विद्युतीकरण कामाचे आर्कीटेक्ट मे.काबरे चौधरी आर्कीटेक्ट, नाशिक यांचे आर्किटेक्ट फीचे अंतिम बिलाची रक्कम रु.३२,४००/-+ सर्व्हीस टॅक्स त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**विषय नं.२६ आटा मळणी मशिन्स खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा अधिनियम तरतुद क्रं. १४ (घ) भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किवा उपाययोजना हाती घेण्याचे

प्रस्तावना:- श्री साईप्रसादालयात प्रसाद भोजनात देणेत येणारी चपाती व नाष्टा पाकीटमधील पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार मशिन कार्यन्वित आहे. श्री साईप्रसादालयात दररोज अंदाजे ४५ क्विंटल आटा मळणी करणेत येतो. सदर आटा मळणी करता असलेले मशिन्स सन २००६- २००७ मध्ये खरेदी करणेत आलेले असून दैनंदिन वापरामुळे सदर मशिनचे मेन्टेनंन्स काम वाढत असून आटा मळणी करणेस अडचण आहे.

मागणी:- श्री साईप्रसादालयातील आटा मळणी करणेस अडचण येऊ नये म्हणून चार नविन आटा मळणी मशिन खरेदी करणे आवश्यक आहे. सदरचे खरेदीकरीता येणा-या खर्चाचा अंदाज करीता सध्या कार्यान्वित असलेले जे.के. कंपनीचे स्पायरल आटा मळणी (८० किलो क्षमता) मशिनचे दरपत्रक मागविले असता त्यांनी खालील प्रमाणे दर दिलेले आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | स्पायरल आटा मळणी मशिन (क्षमता ८० किलो ) | ४ | ३,००,०००.०० | १२,००,०००.०० |
| | | | जी. एस.टी १८ % | २,१६,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम रु.** | **१४,१६,०००.००** |

विभागाचा अभिप्राय:- उपरोक्त प्रमाणे चार आटा मळणी मशिन खरेदी करीता अंदाजे रक्कम रु.१४,१६,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. प्रसाद भोजन तयार करणेकामी अडचण येऊ नये याकरीता नविन चार आटा मळणी मशिन खरेदी करणे आवश्यक असून सदरची खरदी कामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेनंतर महाराष्ट शासनाच्या www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावर जाहीरात प्रसिद्ध करुन ई निविदा मागविता येतील.

प्रस्ताव:- श्री साईप्रसादालयात चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार नविन आटा मळणी मशिन्स खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.१४,१६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकरीता तसेच याकामी ई निविदा बोलविणेस मान्यतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयात चपाती व पुरीचा आटा मळणी करणेकरीता चार नविन आटा मळणी मशिन्स खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१४,१६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.२७** **श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१८ चे प्रत्यक्ष झालेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३१ नुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१८ साजरा करणेस व याकामी येणा-या अंदाजे रुपये ४८,९८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना– गुरुपैर्णिमा उत्सव २०१८ मध्ये प्रत्यक्षात झालेल्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ. क्र | खर्च तपशिल | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | तरतुदीपेक्षा जादा खर्च | तरतुदीपेक्षा कमी खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | मंडप, कमानी, स्टेज व इतर | ४,६२,०००.०० | ५,९३,९०९.५३ | १,३१,९०९.५३ | - |
| २ | कलाकार बिदागी (किर्तनकार व निमंत्रीत कलाकार कार्यक्रमासह ) | २,९२,०००.०० | ६१,०४१.०० | - | २,३०,९५९.०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न (श्रम परिहार मजुरीसह) | ८,६९,०००.०० | ७,८६,८४८.०० | - | ८२,१५२.०० |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च ) | १,१०,०००.०० | ९४,९३९.०० | - | १५,०६१.०० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, (आश्रयदाते विदेशी भक्तांसह ) | २५,४०,०००.०० | २३,५३,९३७.२० | - | १,८६,०६२.८० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन | ४,००,०००.०० | २,६७,६५८.०० | - | १,३२,३४२.०० |
| ७ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅकर डिझेलसह) | २५,०००.०० | २२०५.०० | - | २२,७९५.०० |
| ८ | सांऊड सिस्टीम भाडे तत्वावर घेणेकामी | १,५०,०००.०० | ३,०००.०० | | १,४७,०००.०० |
| ९ | इतर खर्च ( वाहन भोड व बॅचेस खर्च) | ५०,०००.०० | २९,७००.०० | - | २०,३००.०० |
| | **एकुण रुपये** | **४८,९८,०००.००** | **४१,९३,२३७.७३** | **१,३१,९०९.५३** | **८,३६,६७१.८०** |

उपरोक्त तपशिल पाहता श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१८ करीता रक्कम ४८,९८,०००/- (अक्षरी रुपये अठ्ठेचाळीस लाख अठ्ठयान्नव हजार) मात्र मंजूर करण्यात आलेले आहे. या रकमेतून उत्सवाकरीता प्रत्यक्षात पूर्णांकित एकूण रु.४१,९३,२३८/- (अक्षरी रुपये एकेचाळीस लाख, त्र्यान्नव हजार, दोनशे अडोतिस ) मात्र खर्च झालेला आहे.

तरी सदरचे प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१८ करीता प्रत्यक्ष झालेल्या रक्कम रु.४१,९३,२३८/- मात्र खर्चाचे अवलोकन करुन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.२८** **अग्निशमन प्रशिक्षण (८१ केंद्र अधिकारी कोर्स) करीता संस्थानमार्फत नागपूर येथे हजर राहणेस व याकामी संस्थानचे शिफारस पत्र मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अ) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेमार्फत सन २०१९ मध्ये दि.०१/०७/२०१९ ते २०/१२/२०१९ अखेर (०६ महिने) आयोजित केलेल्या अग्निशमन प्रशिक्षण (८१ केंद्र अधिकारी कोर्स) करीता संस्थानमार्फत नागपूर येथे जाणेकामी श्री. प्रतापराव संपतराव कोते, प्र.फायर अधिकारी, फायर ॲण्ड सेफ्टी विभाग यांनी दि.१०/१२/२०१८ रोजीच्या अर्जाने विनंती केली असून, सदरहू विनंती अर्जात त्यांनी असे नमूद केले आहे की,

मी, महाराष्ट्र शासनाचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम कोर्स प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केला असून, नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज (N.F.S.C.) नागपूर यांचेमार्फत उप-केंद्र अधिकारी कोर्स (दि.०४.०७.२०१६ ते २३.१२.२०१६) अखेर प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण केलेला आहे. त्यानुसार दि.१३/०७/२०१७ पासून मला संस्थानमार्फत प्र.केंद्र अधिकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

सध्या संस्थानचा वाढता परिसर तसेच श्रींचे दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होत असलेने सध्या फायर विभागाकडे ०१ फोम टेंडर, ०१ फायर बाईक, अद्ययावत अग्निशमन वाहन खरेदीची कार्यवाही चालू आहे. तसेच संस्थानचे सर्व इमारतींना स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्तापीत करणेची कार्यवाही चालू आहे. फायर विभागाकडे सध्या ३१ कायम / कंत्राटी कर्मचारी असून संस्थानचे सर्व परिसर, शिर्डी परिसर, शिर्डी विमानतळ, गॅस टॅक, या ठिकाणी सदर कर्मचारी यांची २४ तास ३ शिफ्टमध्ये नेमणूक करण्यात येते. फायर विभागाचे कार्य अतिसंवदेनशील असल्यामुळे विभागाचे सर्व कर्मचारी यांना प्रशिक्षित असणे आवश्यक आहे.

त्यानुसार संस्थानमार्फत फायर विभागाचे कर्मचारी यांना प्रथम सत्रात ०७, द्वितिय सत्रात ०८ कर्मचारी, तसेच भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचेमार्फत होणा-या विमानाचे आगीचे प्रशिक्षण ०७ कर्मचारी यांनी संस्थानमार्फत संस्थान खर्चाने ऑनडयुटी तसेच संस्थान शिफारशीने उप–केंद्र अधिकारी कोर्सकरीता ०१ कर्मचारी यांना प्रशिक्षणाकरीता पाठवून प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे.

आता, महाराष्ट्र शासन, अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई यांचे जा.क्र.१५०२ दि.२६/०९/२०१८ रोजीचे पत्राने कळविल्याप्रमाणे मी, यापुर्वी नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज (N.F.S.C.) नागपूर यांचेमार्फत उप-केंद्र अधिकारी कोर्स संस्थान शिफारशीने पूर्ण केलेला असून मला पुढील शिक्षण घ्यावयाची तिव्र इच्छा असल्याने पुढील उच्च शिक्षण घेणेकामी (केंद्र अधिकारी कोर्सकरीता) नागपूर येथे ०६ महिने कालावधीसाठी जाणेकामी एकूण रु.८०,७५०/- (अक्षरी रुपये ऐंशी हजार सातशे पन्नास मात्र ) खर्च अपेक्षित असून त्यामध्ये टयुशन फी, रुम भाडे, भोजन खर्च, युनिफॉर्म व इतर प्रशिक्षण साहीत्य किट, प्रवास खर्च इ. खर्चाचा समावेश आहे.

राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेमार्फत सन २०१९ मध्ये दि.०१/०७/२०१९ ते २०/१२/२०१९ अखेर (०६ महिने) आयोजित केलेल्या अग्निशमन प्रशिक्षण (८१ केंद्र अधिकारी कोर्स) करीता प्रवेश मिळणेकरीता दि.०५/०४/२०१९ पर्यंत शिफारस पाठविण्याची अंतिम तारीख असून, याकामी संस्थानचे शिफारस पत्र मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई , व मा. संचालक, N.F.S.C. नागपूर यांचे नावे मिळणे आवश्यक आहे, अशी श्री. कोते यांनी संदर्भीय क्र.२ चे अर्जाने विनंती केली आहे.

श्री. प्रतापराव संपतराव कोते, हे संस्थानमध्ये सन २००६ पासून कायम कर्मचारी म्हणून सेवेत असून, सध्या ते संस्थानचे फायर ॲण्ड सेफ्टी विभागात प्र. फायर अधिकारी, म्हणून कार्यरत आहे. श्री.कोते यांचे दि.१०/१२/२०१८ रोजीचे विनंती अर्जावर श्री. आनंद भोईटे, पोलीस उप अधिक्षक, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी "सदर प्रशिक्षणाचा उपयोग संस्थान सेवेत होणार असलेने श्री. प्रताप कोते यांना सदर कोर्ससाठी पाठविणेस हरकत नाही" असा अभिप्राय दिला आहे.

ब) संस्थान सेवा विनियमातील रजेबाबतच्या तरतूदी खालीलप्रमाणे आहे.

कलम नं.५ (अ) (२) नुसार मा. कार्यकारी अधिकारी यांना एका वेळेस साठ दिवसापेक्षा जास्त काळ अर्जित रजा मंजूर करण्याचा अधिकार आहे.

तसेच कलम नं.५ (ड) नुसार तीस दिवस बिनपगारी रजा मंजूर करण्याचा अधिकार आहे.

परंतू संस्थान सेवा प्रवेश विनियम जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०१४ दि.२७/१२/२०१४ अन्वये शासन मान्यतेसाठी पाठविणेत आलेले असून, अद्याप शासनाची मान्यता मिळालेली नसल्याने अंतिम नाही. त्यामुळे तुर्त संस्थान कर्मचा-यास महाराष्ट्र शासनाच्या कर्मचा-यांना लागू असलेल्या विनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करता येईल, असे मत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१, प्रकरण क्र.७ मधील नियम ८० ते ८३ मध्ये शासकीय कर्मचा-यांना त्यांच्या कर्तव्य क्षेत्राशी प्रत्यक्ष व निकट संबंध असलेल्या व्यवसाय विषयातील अथवा तांत्रिक विषयातील उच्च शिक्षण अथवा नविन पाठयक्रम, भारतामध्ये / भारताबाहेर पूर्ण करण्यासाठी लोकसेवेची निकट लक्षात घेऊन अध्ययन रजा मंजूर करण्याची तरतूद आहे.

उच्च शिक्षणासाठी अध्ययन रजा मंजूर करावयाची झाल्यास त्यासाठी सर्वसामान्य पणे खालीलप्रमाणे शर्ती पुर्ण करणे आवश्यक आहे.

१. कर्तव्यक्षेत्राशी संबंध असलेल्या विषयातील उच्च शिक्षण/ पाठयक्रम भारतामध्ये किंवा भारताबाहेर पूर्ण करण्यासाठी.

२. प्रस्तावित अभ्यासक्रम किंवा प्रशिक्षण लोकहिताच्या दृष्टीने निश्चीतपणे लाभदायक ठरणार आहे असे, रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले असले पाहीजे.

३. अध्ययन रजा पाच वर्षापेक्षा कमी सेवा झाली असेल, अशा शासकीय कर्मचा-यास मंजूर केली जाणार नाही.

४. रजा संपल्यानंतर पुढे किमान तीन वर्ष सेवा करणे बंधनकारक, या तीन वर्षात राजीनामा देता येणार नाही व कर्मचा-यांनी तसा आग्रह धरल्यास अध्ययन रजा काळात दिलेले वेतन भत्ते वसूल करण्यात येतात. याबाबत कर्मचा-यांनी रजेपूर्वी बंधपत्र देणे आवश्यक आहे.

५. हक्क म्हणून रजा मागता येत नाही.

६. एकाच व्यक्तीला ही रजा वारंवार मंजूर करता येत नाही.

७. जो कर्मचारी अध्ययन रजा संपल्यानंतर कामावर परत येणे अपेक्षित असेल अशा तारखेपासून तीन वर्षाच्या आत सेवानिवृत्त होणार असेल अथवा जो सेवा निवृत्त होण्याचा विकल्प देऊ शकेल, अशा शासकीय कर्मचा-यास मंजूर केली जाणार नाही.

८. रजेवरील अनुपस्थितीमुळे शासकीय कर्मचा-याचा त्याच्या नित्याच्या कामाशी संबंध तुटेल अथवा त्याच्या संवर्गामध्ये काही अडचणी निर्माण होतील, तर शासकीय कर्मचा-याला वारंवार अध्ययन रजा मंजूर करण्यात येऊ नये.

९. अध्ययन रजेचा कमाल कालावधी कोणत्याही एका वेळी सर्वसाधारणपणे १२ महिने, आणि त्यांच्या संपूर्ण सेवेच्या कालावधीत (अन्य कोणत्याही नियमान्वये मंजूर केलेल्या तत्सम अध्ययन किंवा प्रशिक्षण रजेचा समावेश करुन) एकूण २४ महिने एवढी असेल.

१०. अध्ययन रजेसाठी अर्ज रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याकडे योग्य मार्गाने सादर करण्यात येईल. अशा प्रकारच्या अर्जामध्ये कर्मचा-याला अभिप्रेत असलेला एक किंवा अधिक पाठयक्रम आणि द्यावयाची कोणतीही परिक्षा याचा स्पष्ट उल्लेख केला पाहीजे.

११. अध्ययन रजा, कर्मचा-याच्या रजा खाती खर्ची घालण्यात येऊ नये.

१२. कर्मचारी भारतामध्ये अध्ययन रजेवर असतांना शासकीय कर्मचा-याला तो अशा रजेवर जाण्याच्या लगतपूर्वी शासनाच्या कामावर असतांना त्याला जितके वेतन मिळाले असेल तितके रजा वेतन (महागाई भत्त्याव्यतिरिक्त इतर भत्ते वगळून) मिळले.

१३. भारतामधील अभ्यासक्रमाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अध्ययन रजेच्या कालावधीत कोणताही अध्ययन भत्ता देण्यात येणार नाही.

**क)** तथापी, संस्थान संचलित रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, पॅरामेडिकल स्टाफ व इतर कर्मचारी यांना अध्ययन रजेसाठी सोडणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/११/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३२ नुसार खालीलप्रमाणे नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे.

१. उच्च शिक्षणासाठी याआधी सोडण्यात आलेल्या संबंधीत विभागातील कर्मचारी परत आलेनंतरच एका वेळी दोन परिचारीका, एक वैद्यकीय अधिकारी, एक पॅरामेडिकल कर्मचारी व इतर पैकी एक असे कर्मचारी असाधारण रजेवर सोडणेस सेवाजेष्ठतेनुसार परवानगी देणे.

२. उच्च शिक्षण झालेनंतर किमान ०३ वर्ष संस्थान सेवा करावी लागेल. तसे रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन घेणे.

३. रजेच्या कालावधीत त्यांना कोणतेही वेतन, भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

४. रजा कालावधीत त्यांना आवश्यक असणारा ०५ वर्षाचा सेवा कालावधी नसल्यास त्यांची सेवाजेष्ठता कोणत्याही प्रकारे सुरक्षित राहणार नाही.

५. रजा कालावधी संपुष्टात आल्यानंतर रजा नियमीत करणे अथवा भत्ते, वेतन वैगरेसाठी साईबाबा संस्थानचे मा. व्यवस्थापन मंडळ, मा. न्यायालय अथवा फोरम समोर त्यांना दाद मागता येणार नाही.

६. उच्च शिक्षणाचा कालावधी संपताच त्यांनी कामावर त्वरीत हजर होऊन ०३ वर्षापर्यंत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीस सेवा द्यावी लागेल. अगर ०३ वर्षाची सेवा करणार नसलेस ०३ महिन्यांचे वेतन संस्थानमध्ये जमा करावे लागेल.

७. याशिवाय उच्च शिक्षणासाठी भरावयाची फी, प्रवास व इतर खर्च त्यांनी स्वतः करावयाचा आहे. याबाबत संस्थानमार्फत कोणत्याही स्वरुपाचा आर्थिक खर्च केला जाणार नाही.

**ड)** श्री. प्रतापराव संपतराव कोते, हे दि.०४/१२/२००६ पासून संस्थान सेवेत आहे. त्यांनी आज अखेर १२ वर्ष संस्थानचे स्थायी पदावर काम केलेले आहे. फायर ॲण्ड सेफ्टी विभागाकडील अग्निशमन वाहन पंप ऑपरेटींग, फायर सिलेंडर ऑपरेटींग व मेन्टेनंन्स, वॉटर हायड्रंट ऑपरेटींग व मेन्टेनन्स इत्यादी फायरमन संबंधीत कामाचा अनुभव आहे. श्री. प्रतापराव संपतराव कोते यांना यापुर्वी दोन वेळेस खालीलप्रमाणे प्रशिक्षणासाठी सोडण्यात आलेले आहे.

१. महाराष्ट्र राज्य अग्निशमन प्रशिक्षण सेवा संचालनालय, मुंबई यांचेकडे बॅच नं.५५ दि.११/०२/२०१५ ते दि.१५/०५/२०१५ अखेर प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण कोर्सचे प्रशिक्षण संस्थानमार्फत (कालावधी ०३ महिने) देण्यात आलेले आहे.

२. तसेच दि.०५/०१/२०१६ रोजीचे विनंती अर्जास अनुसरुन सब ऑफीसर कोर्स (अग्निशमन) ०६ महिने व अटॅचमेंट १ महिना असे एकूण ७ महिने कालावधीचे प्रशिक्षणासाठी ( त्यांची अर्जीत रजा मंजूर करुन) प्रवेश मिळणेकामी संस्थानमार्फत मा. संचालक, महाराष्ट्र राज्य अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुज, मुंबई यांना शिफारस पत्र देणेत आले होते.

सध्या श्री. प्रताप कोते यांची अर्जीत रजा आज अखेर ५९ दिवस इतकी शिल्लक आहे.

**इ)** उपरोक्त परिच्छेद ब, क, व ड मध्ये नमूद केल्या प्रमाणे सर्व बाबी विचारात घेता, श्री. प्रतापराव संपतराव कोते, यांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेमार्फत सन २०१९ मध्ये दि.०१/०७/२०१९ ते २०/१२/२०१९ अखेर (०६ महिने) कालावधीत आयोजित केलेल्या अग्निशमन प्रशिक्षण (८१ केंद्र अधिकारी कोर्स) करीता प्रवेश मिळणेकरीता मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, अग्निशमन सेवा

संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई , व मा. संचालक, N.F.S.C. नागपूर यांचे नावे शिफारस पत्र देता येईल, असे मत आहे.

सदरहू प्रशिक्षण घेणेकामी एकूण रु.८०,७५०/- (अक्षरी रुपये ऐंशी हजार सातशे पन्नास मात्र ) खर्च अपेक्षित असून (त्यामध्ये टयुशन फी, रुम भाडे, भोजन खर्च, युनिफॉर्म व इतर प्रशिक्षण साहीत्य किट, प्रवास खर्च इ. खर्चाचा समावेश आहे.) सदरहू खर्च संस्थानमार्फत मिळणेबाबत श्री. कोते यांनी त्यांचे विनंती अर्जात नमूद केले आहे.

तरी, श्री. प्रतापराव संपतराव कोते, प्र. फायर अधिकारी, फायर ॲण्ड सेफ्टी विभाग यांचे विनंती अर्जास अनुसरुन त्यांना अग्निशमन प्रशिक्षण (८१ केंद्र अधिकारी कोर्स) करीता संस्थान मार्फत सोडणेकामी खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे.

१. प्रशिक्षणासाठी प्रवेश निश्चीत करणेसाठी मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई , व मा. संचालक, N.F.S.C. नागपूर यांचे नावे शिफारस पत्र देणेस मान्यता असावी.

२. तसेच श्री. कोते यांचे विनंती अर्जातील मागणीनुसार त्यांना प्रशिक्षणाकामी येणारा खर्च रु.८०,७५०/- हा संस्थानने करावा किंवा कसे ? याबाबत उचित निर्णय होणेस विनंती.

३. याशिवाय श्री. कोते यांना सदरहू प्रशिक्षणकामी हजर राहणेसाठी (०६ महिने कालावधीसाठी) त्यांना उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमूद केलेप्रमाणे उच्च शिक्षणासाठी अनुज्ञेय असलेली अध्ययन रजा मंजूर करावी.

किंवा

उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमूद केलेप्रमाणे, मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१/११/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३२ नुसार संस्थान रुग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी, पॅरामेडिकल स्टाफ व इतर कर्मचारी यांचे अध्ययन रजा नियमावली अनुसरुन, अध्ययन (असाधारण रजा) मंजूर करावी.

तरी, याबाबत पुढील उचित निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रशिक्षणाचा उपयोग संस्थान सेवेत होणार असल्याने श्री. प्रतापराव संपतराव कोते, प्र. फायर अधिकारी, फायर ॲण्ड सेफ्टी विभाग यांना राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेमार्फत दि.०१/०७/२०१९ ते दि.२०/१२/२०१९ अखेर आयोजित केलेल्या अग्निशमन प्रशिक्षण (८१ केंद्र अधिकारी कोर्स) करीता दि.०१/०७/२०१९ ते दि.२०/१२/२०१९ अखेर (०६ महिने) कालावधीकरीता अध्ययन रजा मंजुर करण्यास व सदर प्रशिक्षणाकामी येणारा खर्च रक्कम रु.८०,७५०/-मात्र संस्थानमार्फत आदा करण्यास तसेच प्रशिक्षणासाठी प्रवेश निश्चीत करणेसाठी मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रुझ, मुंबई , व मा. संचालक, N.F.S.C. नागपूर यांचे नावे शिफारस पत्र देणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९** **समाधी मंदिरातील श्रींचे समाधी स्थळाचे चौथऱ्याच्या खाली तीनही बाजुस असलेल्या सोन्याच्या मुलामाचे नुतनीकरण अथवा पुर्ववत ठिकाणचे रंगकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद – अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

प्रस्तावना– मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२००८ रोजीचे सभेतील विषय नं.५३, निर्णय क्र.६८५ अन्वये समाधी मंदिराला सोने लावणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार उपरोक्त विषयांकीत समाधी मंदिरातील श्रींचे समाधी भिंतींना, खाबांना व समाधीचे चौथ-याला सोन्याचा मुलामा करण्याचे काम तसेच बाबांचे सोन्याचे सिंहासन तयार करण्याचे काम साईभक्त श्री.बी.विजयकुमार, है.बाद व श्री.ए.एम.रेड्डी, है.बाद यांचेकडून सन २००९ मध्ये देणगी स्वरुपात करण्यात आलेले आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१३/१२/२०१८ रोजी समाधी चौथ-याचे खालील खराब झालेल्या भागाची डागडुजी अथवा नुतनीकरण करणेबाबत निर्देश दिलेले आहे. त्यासंदर्भात यापुर्वीचे देणगीदार साईभक्त यांनी उपरोक्त संदर्भिय क्र.२ अन्वये सदरहू कामासाठी लागणारी रक्कम देणगी स्वरुपात देण्याची सहमती दर्शविलेली आहे.

विभागाचा अभिप्राय – श्रींचे समाधीला व चौथ-याला सोन्याचा मुलामा बसविणेचे कामास साधारण ४ ते ६ वर्ष झाली आहे. दररोजची समाधी मंदिरातील साफ सफाई करताना पाण्याने, हार फुलांनी तसेच साईभक्तांचे वर्दळीमुळे समाधी चौथ-याचे खालील काही बाजू खराब झाली आहे. मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशान्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

अ) यापुर्वीचे देणगीदार साईभक्त श्री.विजयकुमार, है.बाद यांचेमार्फत सोन्याचा मुलामा बसविणेचे काम करणारे स्वामीनारायण आर्ट क्रिएशन प्रा.लि.,अहमदाबाद यांचेकडून चौथ-याची खराब झालेल्या

भागाचे नुतनीकरण देणगी स्वरुपात करुन घेता येईल. याकामी अंदाजे ४ ते ५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.
अथवा

ब) समाधी चौथ-याचे खालील बाजूवरील सोन्याचा मुलामा काढून घेऊन पुर्ववत दगडी भागावर बांधकाम विभागामार्फत ब्लॅक स्टोन कलरचे रंगकाम करुन घेता येईल.

प्रस्ताव- तरी श्रींचे समाधी चौथ-याचे खराब झालेल्या सोन्याचा मुलामा लावलेल्या भागाचे नुतनीकरण करणेकामी उपरोक्त "अ" मध्ये नमूद केलेनुसार येणारे अंदाजे ४ ते ५ लक्ष खर्च देणगी स्वरुपात स्विकारणेस अथवा "ब" मध्ये नमूद केलेनुसार बांधकाम विभागामार्फत कार्यवाही करणेबाबत उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७** **सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग)**

---

**विषय नं.३०** **सन २०१९ मधील संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणाऱ्या निरुपयोगी/भंगार/सादिल स्वरुपाच्या साहित्याची विक्री करणेकामी ई-निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र अधिनियम २००४ तरतूद- महाराष्ट्र अधिनियमातील कलम १४(२) (ग) व कलम १७ (४) ला अधिन राहून त्याप्रमाणे कार्यवाही करणेत येत आहे.

प्रस्ताविकः- श्री साईबाबा संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणा-या निरूपयोगी सादिल स्वरूपाच्या भंगार तसेच साहित्याची सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षात ई-निविदा पध्दतीने तसेच वर्तमान पत्रात जाहीरात देवून व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार दर मागविण्यात आलेले होते. त्याप्रमाणे प्राप्त झालेल्या मंजुर उच्चतम दराने जमा झालेल्या निरूपयोगी भंगार साहित्याची विक्री करणेत आलेली आहे. आजपावेतो (माहे डिसेंबर-२०१८ अखेर) अशा प्रकारच्या भंगार साहित्याचे विक्रीतून एकूण-२९,५३,३६५/- (अक्षरी- एकोणतीस लाख त्रेपन्न हजार तीनशे पासष्ट रूपये मात्र ) रूपये संस्थान फंडात जमा करणेत आलेले आहे.

दरवर्षीचे प्रचलित पध्दतीनुसार महाराष्ट्र अधिनियम २००४ मधील कलम १४(२) (ग) व कलम १७(४) ला अधिन राहून रू.५०,००० चे आतील दैनंदीन वापराने जमा होणारे निरूपयोगी डेडस्टॉक तसेच सादील स्वरूपाचे भंगार साहित्य जसे दुध पिशवी, प्लॉस्टिक भंगार, लोखंडी भंगार , रिकामा खोक्याचा पुठ्ठा, रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, नारळाच्या शेंडया, काळे ऑईल, रिकामे तेलातूपाचे डबे, रिकामे बारदान गोण्या वगैरे साहित्य विक्रीचे तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०५.२००८ चे सभेतील निर्णय क्र.४७६ नुसार अशाप्रकारच्या दैनंदिन वापराने तयार होणा-या निरूपयोगी भंगार / डेडस्टॉक साहीत्याची विक्री करण्याचे अधिकार समितीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान केलेले आहेत.

सन २०१८-१९ या वर्षात नेमून दिलेल्या व्यापा-यांना भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०१९ रोजी पुर्ण होत आहे. करिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षात संस्थानचे दैनंदिन वापराने जमा होणारे भंगार साहित्य विक्री कामी ई-निविदा मागविता येईल.

मागणी- उपरोक्तप्रमाणे प्रस्तावीत केलेनुसार सन-२०१९-२० या आर्थिक वर्षातील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्य विक्री कामी ई-निविदा प्रक्रीयासाठी खालील दाखल प्रस्तावांस मान्यता/स्वाक्षरी होणेस विनंती.

१) निरूपयोगी भंगार/सादिल/ तसेच डेडस्टॉक साहित्याचे विक्रीबाबतच्या अटी व शर्तीचा मसुदा.

२) आयटी विभागामार्फत www.sai.org.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी करणे, ईडीपी विभागामार्फत www.mahatenders.gov.in या शासकीय संकेतस्थळावर Online ई-निविदा मागविणे/अपलोड करणे, तसेच जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद या ०३ ठिकाणच्या मराठी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करावयाचा मसूदा.

३) निरूपयोगी भंगार/सादिल स्वरूपाचे साहित्य तपशिलाचे दरपत्रक.

४) नवीन शासन प्रणालीप्रमाणे संस्थानकडील निरूपयोगी / भंगार साहित्य विक्रीसाठी सोबतचे यादीतील साहित्यास GST आकारणीसंदर्भात लेखाशाखा विभागाचे मार्गदर्शन घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

उपरोक्त अ.नं.०१ ते ०४ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

विभागाचा अभिप्रायः- सन-२०१८-१९ या आर्थिक वर्षामधील भंगार साहित्य विक्रीची मुदत दि.३१.०३.२०१९ रोजी पुर्ण होत असल्याने नाशवंत/भंगार साहित्य साठवू नये, त्याचे साठवणूकीतून साईभक्तांचे तसेच सार्वजनिक आरोग्यास धोका पोहचू नये, करिता अशाप्रकारचे साहित्य वेळीच विक्री/विल्हेवाट करणेसाठी सन २०१९-२० करीता ई-निविदा मागविणेकामी जनसंपर्क विभागामार्फत अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद या ०३ ठिकाणीच्या मराठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणेस तसेच Online ई-निविदा मागविणेस, ई-निविदा प्राप्त झालेनंतर त्या खरेदी समितीपुढे उघडणेस,उच्चतम पात्र निविदा धारकास कार्यादेश देणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन-२०१९-२० या आर्थिक वर्षामधील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्य विक्री/विल्हेवाट करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- अभिलेख कक्ष)**

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- (१) २१ (ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मीक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-१) मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२६.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५०.

३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र.१७ निर्णय क्र.६६९.

४) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील विषय क्र.१९ निर्णय क्र.२४२.

प्रस्तावना:- ध्वनिक्षेपण विभागातील साऊंड सिस्टीम यंत्रणा अद्यावत करणेकामी Sound & Audio System Consultant ची नेमणुक करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.६२६ नुसार "प्रस्तावास मान्यता देण्यात आली. परंतु, नेमणुक करण्यात येणा-या सल्लागारास बिलाची ५०% रक्कम आगाऊ न देता त्याचे काम पुर्ण झालेनंतर संपुर्ण रक्कम आदा करणेत यावी, असे ठरले". तदनंतर सदर प्रस्तावाची कार्यवाही अंतीम टप्यात असतानाच पुनश्च मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र.७५० नुसार"सीसीटीव्ही कंट्रोलसेल विभागामार्फत सीसीटीव्ही व Security Surveillance यंत्रणा कार्यान्वीत करणे तसेच ध्वनिक्षेपण विभागाकडील Sound & Audio System अद्यावत करणेकामी एकच Consultant ची नेमणुक करणेकामी विविध पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली". त्यानुसार प्रस्ताव सीसीटीव्ही विभागाकडे कार्यवाहीसाठी देणेत आला होता.

सदर विभागाकडुन देखील कार्यवाही अंतीम टप्यात असतानीच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषयक्र.१७ निर्णय क्र.६६९ नुसार "दि.०६/०७/२०१७ रोजीचे मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या समाधी शताब्दी कृती आराखडा आढावा समितीचे बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी शहरासाठी सीसीटीव्ही प्रकल्प एकत्रीतरीत्या महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत राबविण्यात यावा असे निर्देश दिलेले आहे. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले की, प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) हे शिर्डी येथे वरील विषयासंदर्भात आढावा बैठक घेणार असून, त्यावेळी सीसीटीव्ही प्रकल्पाबरोबरच साऊंड ॲण्ड ऑडीओ, सिक्युरिटी सर्व्हेलंस, साईटेक टप्पा -२, हॉस्पीटल सॉफ्टवेअर व HMIS या प्रकल्पाबाबत संस्थानमार्फत त्यांचेशी चर्चा करणे उचीत होईल. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी",असे ठरले.

त्यानुसार उपरोक्त ठरावास अनुसरुन महाराष्ट्र शासनाचे Maha IT विभागाचे प्रतिनिधींनी संस्थानचे साऊंड ॲण्ड ऑडीओ सिस्टीम यंत्रणा शिर्डी स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत अद्यावत करणेकामी प्रत्यक्ष सर्व्हे करण्यात आलेला आहे. त्यानुसार दि.०६/११/२०१७ रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्रशासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागास (Maha IT Maharashtra) सविस्तर प्रस्ताव पाठविण्यात आलेला असून, त्यांचेमार्फत कार्यवाही प्रस्तावित आहे. परंतु, सदरकामी शासनाकडुन कार्यवाही अंतिम होणेस विलंब होत असल्याचे दिसुन येत असून सदरची प्रक्रिया कधी पुर्ण होईल व केंव्हा संस्थानला आवश्यक असणारे साऊंड सिस्टीम साहित्य उपलब्ध होईल याबाबत शाशंकता निर्माण झाली आहे.

तथापि, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेत "श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व बाहेरील स्टेज कार्यक्रमाकरीता आवश्यकअसलेले साऊंड सिस्टीम साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेकामीप्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊननिर्णय क्र.२४२ प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्तावित साहित्य खरेदी करतेवेळी समिती सदस्य मा. ॲड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे" , असे ठरले. सदर निर्णयास अनुसरुन तत्कालीन उपकार्यकारी अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार विभागाने प्रत्यक्ष संपर्क साधुन आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश दिलेले होते. त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती सदस्य मा. ॲड.मोहन जयकर यांचेशी वेळोवेळी संपर्क साधुन त्यांचेशी वेळोवेळी समक्ष भेटुन पाठपुरावा करुन त्यांनी सदर साहित्य देणगीदाराकडुन उपलब्ध करुन देणार असल्याचे सुचवुन सदर साहित्य खरेदी करु नये, असे चर्चेअंती तसेच समक्ष भेटीअंती त्यांनी सागीतले आहे.

परंतु,आज अखेर त्यांचेकडुन सादर केलेल्या प्रस्तावातील नमुद कुठलेही साऊंड सिस्टीम साहित्य संस्थानला देणगी स्वरुपात मिळालेले नाही.

श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरतीचे आवाजाकरीता मुख्य ध्वनिकक्ष रुममध्ये साऊंड सिस्टीम यंत्रणाबसविण्यात आलेली असून, सद्यस्थितीत कार्यरत असलेली ध्वनिक्षेपण विभागाची यंत्रणा सन १९९५ साली खरेदी करुन कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदरहु यंत्रणा ही २२ वर्षापुर्वीची असून ती तांत्रीक दृष्ट्या कालबाह्य झालेली असल्याने सध्यस्थितीत कार्यान्वित असलेले ॲम्प्लीफायर नियमीतपणे बंद पडतात. तथापि, सदरचे ॲम्प्लीफायर हे २२ वर्षापुर्वीचे असल्याने त्याचे स्पेअर पार्टस् देखील मार्केटमध्ये उपलब्ध होणेस असंख्य अडचणी निर्माण होत आहे. त्यातील सध्यस्थितीत “साईभजन संध्या” कार्यक्रमाकरीता वापरात येणारे साऊंड सिस्टीम साहित्य हे देखील २००१ पासून कार्यरत आहे. तसेच तांत्रीकदृष्टया कालबाह्य झालेले व नादुरुस्त असलेले साहित्य अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडुन तपासून त्याची विक्री अभिलेख विभागामार्फत जाहिर लिलावाने विक्री करणेबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.

तथापी, मंदिर व शताब्दी विभागामार्फत दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाचे नियोजन करणेत येत असून, इकडील विभागामार्फत सदर कार्यक्रमाला साऊंड सिस्टीम यंत्रणा पुरविली जाते.त्यामुळे साहित्याचा दैनंदिन वापर होत असून आयोजित कार्यक्रमाकरीता इकडील विभागाकडे उपलब्ध असलेले साऊंड सिस्टीम साहित्य कमी पडत असल्याने वाढीव साहित्य तातडीने खरेदी करणेची आवश्यकता आहे. त्यामुळे सध्यस्थितीत विभागास श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यकअसलेले साऊंड सिस्टीम साहित्य खालील तपशिलातील नमुद केलेनुसार ई-निविदा पध्दतीने खरेदी करणे हितावह ठरेल.

| No. | Item Description/ Specification | Model Number | Make | Quantity | Rate | Amount Rupees |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Power Amplifier | CMX 1200 VA | QSC | 5 Nos | 80,000/- | 4,00,000/- |
| 2 | Power Amplifier | CMX 800 VA | QSC | 5 Nos | 50,000/- | 2,50,000/- |
| 3 | Mic Stand (Big) | ATS-200 | Ahuja | 10 Nos | 615/- | 6,150/- |
| 4 | Mic Stand (Small) | DGT | Ahuja | 10 Nos | 600/- | 6,000/- |
| 5 | Mic | SM 58-S | Shure/USA | 10 Nos | 8,300/- | 83,000/- |
| 6 | Mic | SM 58A | Shure/USA | 20Nos | 10500/- | 2,10,000/- |
| 7 | Shure MIC | SM 57 | Shure/USA | 10 Nos | 6200/- | 62,000/- |
| 8 | Mic | 845-S | SENNHISER made in Jermany | 10 Nos | 7000/- | 70,000/- |
| 9 | Shure gooseneck cordless mic | MX415+MX8 90base | shure | 3 Nos | 43000/- | 1,29,000/- |
| 10 | Gooseneck mic | mx 418 Gooseneck mic + mx 412 Base | Shure | 4 Nos | 21000/- | 84,000/- |
| 11 | Audio Mixer (CMS 1000) | CMS 1000-10 Channel | Dynacord | 2 Nos | 107350/- | 2,14,700/- |
| 12 | Optic Audio Video (Transmitter & Receiver) | ----- | optilink | 10 Set | 6300/- | 63,000/- |
| 13 | Sennheiser cordless mic | EW 500/ mic 945 G3 | SENNHISER | 5 Nos | 62000/- | 3,10,000/- |
| 14 | Head mic set | EW152-G3-1G8 | Sennheiser | 5 Nos | 53000/- | 2,65,000/- |
| 15 | Drama (Stage) Condenser Mic | High Frequency | Sennheiser | 6 Nos | 15000/- | 90,000/- |
| 16 | Studio master Amp | PA.6.0 KW | Studio master | 7 Nos | 58844/- | 4,11,908/- |
| 17 | Studio master Amp | PA.7.5 KW | Studio master | 6 Nos | 70305/- | 4,21,830/- |
| 18 | DBX driver 260 | DBX260 | DBX | 2 Nos | 36000/- | 72,000/- |
| 19 | Amp. Crown | MA 12000 I | Crown | 4 Nos | 175000/ | 7,00,000/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 20 | Amp. Crown | 9000 MAI | Crown | 6 Nos | 145000/ | 8,70,000/- |
| 21 | Amp. Crown | 6002 XTI | Crown | 4 Nos | 76,500/- | 3,06,000/- |
| 22 | Amp. Crown | 5000 MAI | Crown | 4 Nos | 110000/ | 4,40,000/- |
| 23 | JBL Speaker | SRX 835 | JBL-USA make | 6 Nos | 95500/- | 5,73,000/- |
| 24 | JBL Speaker | SRX712 | JBL-USA make | 6 Nos | 69427/- | 4,16,562/- |
| 25 | JBL speaker | PRX 415 m | JBL | 6 Nos | 40000/- | 2,40,000/- |
| 26 | JBL Speaker | VRX 932LA1 | JBL-USA make | 8 Nos | 93000/- | 7,44,000/- |
| 27 | JBL Speaker | VRX 918 S | JBL-USA make | 2 Nos | 80,000/- | 1,60,000/- |
| 28 | JBL Tuter Coil | JBL SRX725 | JBL-USA make | 10 Nos | 7000/- | 70,000/- |
| 29 | JBL Tuter Coil with Cone | JBL MR 825 | JBL-USA make | 12 Nos | 12000/- | 1,44,000/- |
| 30 | Audio Distributter | 1 in 10 out distributter 1 | Behringrer | 4 Nos | 15000/- | 60,000/- |
| 31 | Universal Ampli Rack | 24 with wheel | Better Quality | 2 Nos | 20000/- | 40,000/- |
| 32 | Chairman UNIT- Short Gooseneck Length | LBD8791/00 | Bosch | 4 Nos | 4838/- | 19,352/- |
| 33 | Delegate UNIT- Short Gooseneck Length | LBD8792/00 | Bosch | 50 Nos | 4248/- | 2,12,400/- |
| 34 | Controller | LBD8794 | Bosch | 4 Nos | 18762/- | 75,048/- |
| 35 | Mic Wire | | Falcon | 10 Bundal Differen t Color | 3000/- | 30,000/- |
| | | | | **Total Amount** | **82,48,950/- + Taxes** | |

विभागाचा अभिप्राय:- उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेल्या तपशीलानुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी मध्ये जाहीरात प्रसिध्द करुन जनसंपर्क विभागाचे प्रसिध्दी विभागामार्फतमुंबई व पुणे येथुन प्रकाशित होणारे जास्त खपाचे मराठीव इंग्रजी वृत्तपत्रात

याकामी जाहिरात प्रसिध्द करणेस व सदरहु साहित्य खरेदी करणेकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ८२,४८,९५०/-+ टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सादर करता येईल.

विभागाचा प्रस्ताव:- उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचे अभिप्रायात नमुद केलेनुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य ई-निविदा पध्दतीने खरेदी करणेकामी संस्थानचे संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी मध्ये जाहीरात प्रसिध्द करुन जनसंपर्क विभागाचे प्रसिध्दी विभागामार्फतमुंबई व पुणे येथुन प्रकाशित होणारे जास्त खपाचे मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात याकामी जाहिरात प्रसिध्द करणेस व सदरहु साहित्य खरेदी करणेकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ८२,४८,९५०/- + टॅक्स (अक्षरी रक्कम रुपये ब्याऐंशी लाख अठ्ठेचाळीस हजार नऊशे पन्नास मात्र+कर) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील आरती व दैनंदिन साईभजन संध्या कार्यक्रमाकरीता आवश्यक असलेले साऊंड सिस्टीम साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ८२,४८,९५०/-+ टॅक्स खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- ध्वनिक्षेपन व टेलिफोन विभाग)**

---

**विषय नं.३२** **श्रींचे मंदिर परिसर तसेच साईभक्तांची गर्दी विचारात घेता, सुरक्षेच्या दृष्टीने भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या बॅगेजेस स्कॅनर मशिन,डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर व हॅन्ड हेल्ड मेटल डिटेक्टर या सुरक्षा साहित्यांबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, श्री साईबाबांचे समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्ष पुणे होत असल्याने त्या निमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि. १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार असल्याने, सदर शताब्दी महोत्सवाकरीता संपुर्ण वर्षभरात वेगवेगळया धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे संस्थानमार्फत आयोजन करण्यात आलेले होते.

श्री साईबाबांचे समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने साईभक्तांना पुरविणेच्या सोयी-सुविधा तसेच श्रींचे मंदिर व परीसराचे सुरक्षेच्या दृष्टिकोनातुन, उपाय योजना करणेकामी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा. व्यवस्थापन समितीमार्फत १) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८३७, २) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०६०, ३) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१ (४), ४) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०२/२०१८ रोजीचे सभेतील विषय क्र. ०९ वरील निर्णय क्र.०९, ५) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३८१, ६) मा.उप समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५७ चे निर्णयान्वये आर.एफ.क्यु. निविदा प्रक्रीया तसेच ई-निविदा प्रकीयेव्दारे माहे सप्टेंबर- २०१७ ते माहे जानेवारी-२०१९ अखेर या कालावधीत वेळोवेळी मुदतवाढी देवुन, सदरचे सुरक्षा साहीत्य भाडेतत्वावर घेण्यात आलेले होते. दरम्यानचे कालावधीत गर्दीचे नियोजनाकरीता आवश्यक सुरक्षा साहीत्य खरेदी करण्याकरीता ई-निविदा मसुदा बनवुन, सदरची ई-निविदा प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात येवुन, सदर ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात येणार होती परंतु त्यानंतर शिर्डी शहराकरीता महाराष्ट्र शासनाचे माहीती व तंत्रज्ञान विभागामार्फत स्मार्ट शिर्डी प्रकल्प राबविणेत येत असल्याने, ई-निविदा प्रक्रीया स्थगीत ठेवण्यात आलेली होती व आवश्यकतेनुसार सुरक्षा साहीत्य भाडेतत्वावर घेणेकामी संबंधित पुरवठाधारक मे. रिलाएंन्स इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक यांना जा.क्र./एसएसएसटी/संरक्षण/३४६८/२०१७, दि. २७/०९/२०१७, जा.नं.- ५१७०/२०१७ दि.२८/१२/२०१७, जा.नं.-६४७०/२०१८ दि.०५/०३/२०१८ व जा.नं.- १३७४/२०१८ दि.१९/०६/२०१८ व जा.नं.-१९१३/२०१८ दि.१८/०७/२०१८ अन्वये व मे. ईव्हॉल्व टेक्नॉलॉजीस प्रा.लि., पुणे यांना जा.क्र./एसएसएसटी/ संरक्षण/ ३४४९/ २०१७ दि.२७/०९/२०१७, जा.नं.-५१७१/२०१७ दि.२८/१/२०१७, जा.नं.-५७०५/२०१८ दि.२५/०१/२०१८, जा.नं.-६४६९/२०१८ दि.०५/०३/२०१८, जा.नं.- १३७६/२०१८ दि.१९/०६/२०१८ व जा..नं.-१९१२/२०१८ दि.१८/०७/२०१८ शॉर्ट टेंडर ई-निविदेतील मंजुर दराने मुदतवाढी/कार्यादेश देवुन, सुरक्षा साहीत्य भाडेतत्वावर बसविण्यात आलेले होत्या. सदरकामी माहे सप्टेंबर- २०१७ ते माहे जानेवारी-२०१९ अखेर या कालावधीत संस्थानचा रुपये- ८९,२६,११३/- मात्र खर्च झालेला होता. सदर खर्च जास्त प्रमाणात होत असल्यामुळे, मा. कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना संस्थानमार्फत डी.ओ.लेटर देखिल सादर केलेले आहे. तरी सदर सुरक्षा साहीत्यांचे खर्चाबाबत तपशील पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | साहीत्यांचा तपशील | नग /संख्या | कार्यादेश क्र. व दिनांक | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| A | | | | | |
| १ | मे.ईव्हॉल्व टेक्नॉलॉजीस, पुणे | बॅगेजेस स्कॅनर मशिन | ०४ | जा.नं./एसएसएसटी/संरक्षण/३४४९/ २०१७ दि.२७/०९/२०१७ | ४,६२,५६० X 3 महिने = **१३,८७,६८०/-** |
| | मे.ईव्हॉल्व टेक्नॉलॉजीस, पुणे | बॅगेजेस स्कॅनर मशिन | ०४ | जा.नं./एसएसएसटी/संरक्षण/५१७१/ २०१७ दि.२८/१२/२०१७ | २, ३१,२८०/- १५दिवसांकरीता |
| | मे.ईव्हॉल्व टेक्नॉलॉजीस, पुणे | बॅगेजेस स्कॅनर मशिन | ०४ | जा.नं./एसएसएसटी/संरक्षण/५७०५/ २०१७ दि.२५/०१/२०१८ | ४,६२,५६० X १ महिने = **४,६२,५६०/-** |
| | मे.ईव्हॉल्व टेक्नॉलॉजीस, पुणे | बॅगेजेस स्कॅनर मशिन | ०४ | जा.नं./एसएसएसटी/संरक्षण/६४६९/ २०१८ दि.०५/०३/२०१८ | ४,१०,६४० X 3 महिने = **१२,३१,९२०/-** |
| | मे.ईव्हॉल्व टेक्नॉलॉजीस, पुणे | बॅगेजेस स्कॅनर मशिन | ०४ | जा.नं./एसएसएसटी/संरक्षण/१३७६/ २०१८ दि.१९/०६/२०१८ | ४,१०,६४० X दिड महिने = **६,१५,९६०/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मे.ईव्हॉल्व टेक्नॉलॉजीस, पुणे | बॅगेजेस स्कॅनर मशिन | ०४ | जा.नं./एसएसएसटी/संरक्षण/१९१२/ २०१८ दि.१८/०७/२०१८ | ४,१०,६४० X ६ महिने = २४,६३,८४०/- (दि.०७/०१/१९ अखेर ) |
| | | खरेदीकामी प्रथम जाहिरातीस अनुसरुन ०३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यामुळे सदर मशिनरी खरेदीकामी दि.१६/०४/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०६/०६/२०१८ पासून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन ज्या मशिनरी खरेदीकामी ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या होत्या, अशा मशिनरी खरेदीकामी शासन निर्णयानुसार दोनदा मुदतवाढ देऊन दि.०९/०७/२०१८ पर्यंत निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती.त्यास अनुसरुन ०२ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. पुरेश्या ई-निविदा प्राप्त न झाल्यामुळे पुन्हादि.१०/०८/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये फेर-ई-निविदा मागविणेतस मान्यता घेण्यात येवुन दि.२४/०९/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ पर्यंत फेर ई-निविदा मागविणेतआल्या होत्या.त्यास अनुसरुन प्राप्त ०४ ऑनलाईन ई-निविदेमध्ये दि.२५/१०/२०१८ रोजीचे खरेदी समितीपुढे उघडण्यात आले होते त्यापैकी M/S Ecoqure Engineeringहयांनी USFDA/CE Certificate न दिल्यामुळे अपात्र ठरविण्यात आले असुन उर्वरीत ०३ ई-निविदा तांत्रिकदृष्टया पात्र असल्याबाबत बायोमेडिकल विभागाने कळविले आहे.त्यानुसार पात्र ०३ ई-निविदांचे ऑनलाईन कमर्शियल निविदा दि.०७/१२/२०१८ रोजी उघडण्यात आलेले आहे. |
| अ) | निविदा कालावधी | २७ दिवस |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि. २५/१०/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०४ |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | होय, एक निविदाधारकाने दिले नव्हते,उर्वरीत तीन निविदाधारकांनी जमा केले आहे. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (EMD) जमा केली आहे काय ? | होय, जमा केली आहे. |
| ई) | वाणिज्यिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि.०७/१२/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| ७) | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल – | |

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Sun Medical Systems | | SUN ELECTROMEDICAL DEVICES | | PINNACLE BIOMED PVT LTD | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | Video Gastroscope (OGD Scope) with All Accessories with five years warranty & Consumables as per Technical Specification for Shri Saibaba & Shri Sainath Hospital, Shirdi. | 2.00 | Nos. | 1010000.00 | 2020000.00 | 2160000.00 | 4320000.00 | 1805274.00 | 3610548.00 |
| 1.01 | Accessories : | | | | | | | | |
| 1.02 | a. Biopsy Standard type fenestrated | 2.00 | Nos. | 1400.00 | 2800.00 | 32000.00 | 64000.00 | 0.00 | 0.00 |
| 1.03 | b. Biopsy forceps - Alligator Type with RAT Tooth | 2.00 | Nos. | 1800.00 | 3600.00 | 35000.00 | 70000.00 | 0.00 | 0.00 |
| 1.04 | c. Channel Cleaning Brush | 4.00 | Nos. | 14808.00 | 59232.00 | 2000.00 | 8000.00 | 0.00 | 0.00 |
| 1.05 | d. Air Water Channel cleaning adapter | 2.00 | Nos. | 20556.00 | 41112.00 | 4400.00 | 8800.00 | 0.00 | 0.00 |
| 1.06 | e. Biopsy valve | 4.00 | Nos. | 2430.00 | 9720.00 | 200.00 | 800.00 | 0.00 | 0.00 |
| 1.07 | f. Channel plug | 2.00 | Nos. | 2500.00 | 5000.00 | 2500.00 | 5000.00 | 0.00 | 0.00 |
| 1.08 | g. Channel Opening Cleaning Brush | 4.00 | Nos. | 14808.00 | 59232.00 | 1000.00 | 4000.00 | 0.00 | 0.00 |
| 1.09 | h. Injection Tube | 2.00 | Nos. | 500.00 | 1000.00 | 4300.00 | 8600.00 | 0.00 | 0.00 |
| 1.10 | i. Mouth piece | 2.00 | Nos. | 1010.00 | 2020.00 | 510.00 | 1020.00 | 0.00 | 0.00 |
| 1.11 | j. Suction cleaning adapter | 2.00 | Nos. | 20556.00 | 41112.00 | 2300.00 | 4600.00 | 0.00 | 0.00 |
| 1.12 | k. Water resistant cap | 2.00 | Nos. | 5000.00 | 10000.00 | 11800.00 | 23600.00 | 0.00 | 0.00 |
| 1.13 | 1. Should be supplied with suitable trolley with hanger | | | | | | | | |
| 1.14 | 2. Trolley should have at least 5 power sockets to connect the processor, monitor etc. | | | | | | | | |
| 1.15 | 3. Should provide Electronic Water Leakage Tester | 2.00 | Nos. | 17195.00 | 34390.00 | 14908.00 | 29816.00 | 0.00 | 0.00 |
| 1.16 | 4. Should provide a Carrying Case | | | | | | | | |
| 1.17 | 5. Should provide a ETO cap. | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2.00 | CMC Cost- CMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | | | | | |
| 2.01 | CMC Cost For 6th Year | 2.00 | No. | 82600.00 | 165200.00 | 73308.00 | 146616.00 | 90264.00 | 180528.00 |
| 2.02 | CMC Cost For 7th Year | 2.00 | No. | 82600.00 | 165200.00 | 73308.00 | 146616.00 | 90264.00 | 180528.00 |
| 2.03 | CMC Cost For 8th Year | 2.00 | No. | 82600.00 | 165200.00 | 73308.00 | 146616.00 | 90264.00 | 180528.00 |
| 2.04 | CMC Cost For 9th Year | 2.00 | No. | 82600.00 | 165200.00 | 73308.00 | 146616.00 | 100000.00 | 200000.00 |
| 2.05 | CMC Cost For 10th Year | 2.00 | No. | 82600.00 | 165200.00 | 73308.00 | 146616.00 | 120000.00 | 240000.00 |
| | Total in Figures | | | | 3115218.00 | | 5281316.00 | | 4592132.00 |

| | |
|---|---|
| ७) | निम्नत्तम निविदाधारकांचा तपशिल – |

| Sr. No. | Name of Supplier | Name of Item(s) | No. of Qty. | Rate per in Rs. | CMC Amt.in Rs. | Total Amount +CMC in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Sun Medical Systems,Mumbai | Video Gastroscope (OGD Scope) with All Accessories with five years warranty & Consumables as per Technical Specification for Shri Saibaba & Shri Sainath Hospital, Shirdi. | 02 | 2289218.00 | 826000.00 | 3115218.00 |
| | | | Total Amt.in Rs. | | | 3115218.00 |

निविदा टक्केवारी कमी / अधिक - ३२.६७ % कमी

| | | |
|---|---|---|
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार- | मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करता M/s. Sun Medical Systems,Mumbai हयांनी ०२ नगाकरीता रक्कम रु.२२,८९,२१८/- व पुढील ०५ वर्षाकरिता CMC ०२ मशिनकरीता रक्कम रु.८,२६,०००/-इतकी दिली आहे.बायोमेडिकल विभागाने सदर मशिनच्या अंदाजे खर्चास मान्यता घेतेवेळेस मशिनची मुळ किंमत व ०५ वर्षे वॉरंटी यासह ३४,००,०००/- इतक्या रक्कमेस मान्यता घेतलेली आहे.सदर मशिनचे Technical Specification हे बायोमेडिकल विभागाकडुन तपासून घेण्यात आलेले असुन, सदर मशिनचे Specification प्रमाणे असल्याबाबत बायोमेडिकल विभागाने अभिप्राय दिलेला आहे. त्यानुसार M/s. SunMedical Systems,Mumbai हयांनी दिलेले ०२ नगाकरीता दर रक्कम २२,८९,२१८/- व CMCचे दर पुढील ०५ वर्षाकरीता रक्कम रु.८,२६,०००/- इतकी दिली असुन,अशी एकुण रु.३१,१५,२१८/- इतका खर्च येणार असुन सदर रक्कमेवर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेलया ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक M/s. Sun Medical Systems, Mumbai हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी CMC चे रकमेवर १० टक्के सवलत देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Video Gastroscope खरेदीकामी निम्नतम निविदाधारक M/s. Sun Medical Systems, Mumbai यांनी चर्चेअंती देऊ केलेले Video Gastroscope २ नगाकरीता रक्कम रु.२२,८९,२१८/- व CMC चे दर पुढील ०५ वर्षाकरीता रक्कम रु.७,४३,४००/- अशी एकुण रक्कम रु.३०,३२,६१८/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**११ श्री साईबाबा रुग्णालयातील Radiology या विभागाकरीता 500 mA X-RayMachine खरेदीकामी चर्चा विनिमय करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | श्री साईबाबा रुग्णालयातील X-rayया विभागाकरिता500mA X-ray Machine खरेदीकामी चर्चा विनिमय करुन पुरवठा आदेश देणेबाबत. |
| २) | प्रशासकीय मान्यता | दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५५ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१२,,००,०००/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५५ अन्वये, श्री साईबाबा हॉस्पीटलमधील एकूण १०८ नग व श्री साईनाथ रूग्णालयातील १६ नग असे एकूण १२४ नग मशिन्स ०५ वर्ष वॉरंटीसह खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व |

| | | |
|---|---|---|
| | | त्यामधील सदर मशिनसाठी येणाऱ्या अंदाजे रु.१२,००,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. |
| ५) | निविदा तपशिल | त्यानुसार दि.२६/०१/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२०/०२/२०१८ पासून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन ज्या मशिनरी खरेदीकामी ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या होत्या, अशा मशिनरी खरेदीकामी शासन निर्णयानुसार दोनदा मुदतवाढ देऊन दि.०८/०४/२०१८ पर्यंत निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती.परंतु,सदर मशिनरी खरेदीकामीप्रथम जाहिरातीस अनुसरुन ०३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या होत्या,त्यामुळे सदरमशिनरी खरेदीकामी दि.१६/०४/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०६/०६/२०१८ पासून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन ज्या मशिनरी खरेदीकामी ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या होत्या, अशा मशिनरी खरेदीकामी शासन निर्णयानुसार दोनदा मुदतवाढ देऊन दि.०९/०७/२०१८ पर्यंत निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती.पुरेश्या निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.११/०८/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये फेर-ई-निविदा मागविणेतस मान्यता घेण्यात येवुन दि.२४/०९/२०१८ ते दि.१२/१०/२०१८ पर्यंत फेर ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. त्या अनुसरुन ०१ निविदा प्राप्त झाली होती.त्यानंतर प्रथम एक आठवडयाची दि.१९/१०/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.त्यानुसार ०२ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.त्यानंतर दि.२६/१०/२०१८ पर्यंत दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली होती.दोन वेळेस मुदतवाढ देवुन देखील ०२ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या.पात्र ०२ ऑनलाईन निविदा दि.२९/११/२०१८ रोजी खरेदी समितीपुढे उघडण्यात येवुन तांत्रीक बाबींचा तक्ता बायोमेडिकल विभागाकडुन तपासुन घेण्यात आलेला असुन सदर दोन्ही निविदाधारकांनी दिलेले Technical Specification आपण मागितलेल्याTechnical Specification प्रमाणे असल्याबाबत बायोमेडिकल विभागाने अभिप्राय दिलेला आहे.पात्र ०२ निविदांचे कमर्शियल तक्ता दि.०७/१२/२०१८ रोजी खरेदी समिती सभेपुढे उघडण्यात आलेला आहे. |
| अ) | निविदा कालावधी | २७ दिवस |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि. २९/११/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०२ |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | होय, जमा केले आहेत. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (EMD) जमा केली आहे काय ? | होय, जमा केली आहे. |
| ई) | वाणिज्यिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि.०७/१२/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| ६) | तांत्रिक दृष्ट्या पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल – | |

| S.N. | Description | Qty. | PINNACLE BIOMED PVT LTD | | Vision Medicaid Equipments Private Limited,Pune | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
| | | | Make - Allengiers | | Make - Vision Medicaid Equipments Private Limited | |
| 1.00 | 500 MA X-RAY MACHINE WITH MOTORIZED TABLE WITH ACCESSORIES WITH FIVE YEARS WARRANTY & CONSUMABLES AS PER TECHNICAL SPECIFICATION FOR SHRI SAIBABA HOSPITAL, SHIRDI. | 1.00 | 2195000.00 | 2195000.00 | 1350000.00 | 1350000.00 |
| Total Amt. in Rs. | | | | 2195000.00 | | 1350000.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1.01 | Consumables : Colimeter Bulb | | | | | |
| 2.00 | CMC Cost- CMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | | |
| 2.01 | CMC Cost For 6th Year | 1.00 | 150000.00 | 150000.00 | 50000.00 | 50000.00 |
| 2.02 | CMC Cost For 7th Year | 1.00 | 150000.00 | 150000.00 | 60000.00 | 60000.00 |
| 2.03 | CMC ost For 8th Year | 1.00 | 170000.00 | 170000.00 | 70000.00 | 70000.00 |
| 2.04 | CMC Cost For 9th Year | 1.00 | 200000.00 | 200000.00 | 80000.00 | 80000.00 |
| 2.05 | CMC Cost For 10th Year | 1.00 | 200000.00 | 200000.00 | 90000.00 | 90000.00 |
| **Total Amt. CMC in Rs.** | | | | **870000.00** | | **350000.00** |

७) निम्नत्तम निविदाधारकांचा तपशिल -

| Sr. No. | Name of Supplier | Name of Item(s) | No. of Qty. | Rate per in Rs. | CMC Amt.in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Vision Medicaid Equuipments Private Ltd, Pune | 500 MA –X-Ray Machine With Motorized Table | 01 | 1350000.00 | 350000.00 | 1700000.00 |
| | | | Total Amt.in Rs. | | | 1700000.00 |

निविदा टक्केवारी कमी / अधिक - १२.५ % जास्त

| | | |
|---|---|---|
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार- | मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

उपरोक्त तुलनात्मक दरांच्या तक्त्याचा विचार करता M/s. Vision Medicaid Equipments Private Ltd, Puneयांचे प्रती नग रु.१३,५०,०००/- हे निम्नतम दर प्राप्त झालेले आहे, तसेच CMC करीता वॉरंटी कालावधी संपल्यानंतर पुढील ०५ वर्षाकरिता एकूण रक्कम रु.३,५०,०००/- इतकी देऊ केलेली आहे. बायोमेडिकल विभागाने सदर मशिनच्या अंदाजे खर्चास मान्यता घेतेवेळेस मशिनची मुळ किंमत व ०५ वर्षे वॉरंटी यासह १२,००,०००/- इतक्या रक्कमेस मान्यता घेतलेली असुन,त्यामध्ये CMC च्या किंमतीचा विचार करण्यात आलेला नव्हता.परंतु निम्नतम दरधारक M/s. Vision Medicaid Equuipments Private Ltd, Pune यांचे प्रती नग रु.१३,५०,०००/- दर प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सदर पुरवठाधारकाला मा.उपसमिती सभेसमोर समक्ष बोलावुन चर्चा/वाटाघाटी करुन निविदेत दिलेले दर कमी करुन त्यांना पुरवठा आदेश देता येईल,असे मत आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयातील Rediologyया विभागाकरिता 500 MA X-RAY MACHINE WITH MOTORIZED TABLEखरेदीकामी M/s. Vision Medicaid Equuipments Private Ltd, Pune यांचेबरोबर मशिनची रक्कम रु.१३,५०,०००/- व वॉरंटीचा कालावधी संपल्यानंतर CMC ची रक्कम रु.३,५०,०००/- अशी एकुण रु.१७,००,०००/- या रक्कमेवर चर्चा विनिमय करुन त्यांना पुरवठा आदेश देण्यास तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेण्यासाठीची शिफारस मा.व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदाप्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक M/s. Vision Medicaid Equuipments Private Ltd, Pune हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. परंतु त्यांनी दुरध्वनीव्दारे मशिनचे किंमतीमध्ये रक्कम रु.३०,०००/-मात्र सवलत देण्याचे कळविले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील Radiology या विभागाकरीता 500 mA X-RayMachine खरेदीकामी निम्नतम निविदाधारक M/s. Vision Medicaid Equuipments Private Ltd, Pune यांचे मशिनची रक्कम रु.१३,२०,०००/- व ५ वर्ष वॉरंटीचा कालावधी संपल्यानंतर पुढील ५ वर्षाकरीता CMC ची रक्कम रु.३,५०,०००/- अशी एकुण रक्कम रु.१६,७०,०००/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन तसेच मशिनचे किंमतीमध्ये दिलेली रक्कम रु.३०,०००/-मात्रचे सवलतीबाबत त्यांचेकडून लेखी स्वरुपात घेऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**१२ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Imported Operation Table खरेदीकामी चर्चा / वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Imported Operation Table खरेदीकामी चर्चा विनिमय करुन पुरवठा आदेश देणेबाबत. |
| २) | प्रशासकीय मान्यता | दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५५(१५) |

| | | |
|---|---|---|
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.७०,००,०००/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Imported Operation Tableखरेदीस व याकामी येणा-या करणेकामी येणा-या रक्कम रु.७०,००,०००/-इतक्या खर्चास दि.०८/०१/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५५(१५) अन्वये मान्यता मिळालेली आहे. |
| ५) | निविदा तपशिल | त्यानुसार दि.२६/०१/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.२०/०२/२०१८ पासून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन ज्या मशिनरी खरेदीकामी ३ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या होत्या, अशा मशिनरी खरेदीकामी शासन निर्णयानुसार दोनदा मुदतवाढ देऊन दि.०८/०४/२०१८ पर्यंत निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. परंतु ज्या मशिनरी खरेदीकामी प्रथम जाहिरातीस अनुसरुन तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्या होत्या, अशा मशिनरी खरेदीकामी दि.१६/०४/२०१८ अन्वये फेर निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.०६/०६/२०१८ ते दि.२५/०६/२०१८ या कालावधीत ऑनलाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.परंतु, त्यास अनुसरुन देखील पुरेश्या निविदा प्राप्त न झाल्यामुळे दि.११/०८/२०१८ रोजीचे मंजूर टिपणीन्वये फेर निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.२४/०९/२०१८ ते दि.१९/१०/२०१८ या कालावधीत ऑनलाईन निविदा मागविण्यात आलेल्या आहेत, त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी पुरेश्या निविदा प्राप्त न झाल्यामुळे तसेच ब-याच पुरवठाधारकांनी दूरध्वनीवरुन मुदतवाढ मिळणेकामी विनंती केली होती, त्यामुळे शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.०१ डिसेंबर २०१६– प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ अन्वये सदरहू ई-निविदेस प्रथम एक आठवडयाची दि.१९/१०/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यास अनुसरुन ०३ ऑनलाईन ई – निविदा प्राप्त झाल्या आहेत. |
| अ) | निविदा कालावधी | २५ दिवस |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि.२५/१०/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०३ |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | होय, जमा केले आहेत. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (EMD) जमा केली आहे काय ? | होय, जमा केली आहे. |
| ई) | वाणिज्यिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि. ०७/१२/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| ६) | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल – | |

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | Farmachem Enterprises | | MEDITEK | | KOPRAN LABORATORIES LIMITED | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | Imported Operation Table for General And Urology Surgery with all Accessories as per Technical Specification with Five years warranty for Shri Saibaba Hospital, Shirdi. | 2.00 | Nos. | 2100853.00 | 4201706.00 | 2289200.00 | 4578400.00 | 1670000.00 | 3340000.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.01 | Accessories - | | | | | | | | |
| 1.02 | 1) Padded Arm Boards with clamp | 4.00 | Sets | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 22500.00 | 90000.00 |
| 1.03 | 2) Anaesthesia Screen with clamp | 2.00 | Set | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 22500.00 | 45000.00 |
| 1.04 | 3) J Stirrups or Leg Holders with Safety Clark Socket (2) | 4.00 | Sets | 35000.00 | 140000.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 1.05 | 4) Radial setting clamp | 4.00 | Sets | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 20178.00 | 80712.00 |
| 1.06 | 5) Body Restrainer strap | 4.00 | Sets | 16000.00 | 64000.00 | 0.00 | 0.00 | 13500.00 | 54000.00 |
| 1.07 | 6) Leg Holders with Safety Clark Sockets (2) | 2.00 | Pair | 70000.00 | 140000.00 | 0.00 | 0.00 | 189000.00 | 378000.00 |
| 1.08 | 7) Lateral Supports (2) with Side Rail Locks (2) | 4.00 | Sets | 74340.00 | 297360.00 | 0.00 | 0.00 | 78000.00 | 312000.00 |
| 1.09 | 8) Adjustable side supports | 2.00 | Pair | 99120.00 | 198240.00 | 0.00 | 0.00 | 225000.00 | 450000.00 |
| 1.10 | 9) Upper Arm support | 2.00 | Pair | 140000.00 | 280000.00 | 0.00 | 0.00 | 124000.00 | 248000.00 |
| 1.11 | 10) Bolster pillows | 2.00 | No. | 17194.00 | 34388.00 | 0.00 | 0.00 | 15400.00 | 30800.00 |
| 1.12 | 11) Urology Top with Drain Pan & tube Uro Catcher System with Fluid Collector Bags | 2.00 | No. | 79727.00 | 159454.00 | 0.00 | 0.00 | 196000.00 | 392000.00 |
| 1.13 | 12) All Accessories required for General and Urology surgery | 1.00 | Lumsum | 138158.00 | 138158.00 | 0.00 | 0.00 | 100000.00 | 100000.00 |
| | Total Amt. of Accessories | | | | 1451600.00 | | 0.00 | | 2180512.00 |
| 2.00 | CMC Cost- CMC Cost should be including Taxes. It should be fixed for next 5 years. | | | | | | | | |
| 2.01 | CMC Cost For 6th Year | 2.00 | No. | 96030.00 | 192060.00 | 36000.00 | 72000.00 | 80000.00 | 160000.00 |
| 2.02 | CMC Cost For 7th Year | 2.00 | No. | 102752.00 | 205504.00 | 36000.00 | 72000.00 | 85000.00 | 170000.00 |
| 2.03 | CMC Cost For 8th Year | 2.00 | No. | 113027.00 | 226054.00 | 36000.00 | 72000.00 | 90000.00 | 180000.00 |
| 2.04 | CMC Cost For 9th Year | 2.00 | No. | 124330.00 | 248660.00 | 36000.00 | 72000.00 | 95000.00 | 190000.00 |
| 2.05 | CMC Cost For 10th Year | 2.00 | No. | 136763.00 | 273526.00 | 36000.00 | 72000.00 | 100000.00 | 200000.00 |
| | Total Cost of CMC | | | | 1145804.00 | | 360000.00 | | 900000.00 |

1st Imported OT Table - General And Urology Surgery

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Basic cost | | 4201706.00 | | 4578400.00 | 3340000.00 |
| Accessories | | 1451600.00 | | 00.00 | 2180512.00 |
| CMC Cost | | 1145804.00 | | 360000.00 | 900000.00 |
| Basic Cost + Accessories + CMC cost | | 6799110.00 | | 4938400.00 | 6420512.00 |

७) निम्नतम निविदाधारकांचा तपशिल –

| Sr. No. | Name of Supplier | Qty | Rate per | CMC Cost | Basic Cost + CMC Cost |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s. Meditek, Panvel | 02 | 2289200.00 (2289200x2 Total Amt. | 360000.00 | 4938400.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | in Rs. 4578400 | | |
| | | निविदा टक्केवारी कमी / अधिक :- | -३४.५९ % | | | |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार निविदा स्वीकारणेचे अधिकार- | | | मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | | |

उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्त्यामध्ये श्री साईबाबा रुग्णालयाकरिता Imported Operation Table खरेदीकामी M/s. Meditek, Panvel यांनी ०२ नगांची मशिन्स् मूळ किंमत व Accessories ची किंमत मिळून रक्कम रु. ४५७८४००/-, ५ वर्षानंतरची वॉरंटी संपल्यानंतर CMC चे दर रक्कम रु. ३६००००/- इतकी दिली असून अशी एकूण रक्कम रु.४९३८४००/- इतके निम्नतम दर दिले आहेत. सदर पुरपठाधारकाने Accessories च्या Column मध्ये दर न दिल्यामुळे याबाबत त्यांना विचारले असता, मशिनच्या मूळ किंमतीतच सदर Accessories चे दर दिलेले असलेबाबत त्यांनी कळविले आहे. तसेच श्री साईनाथ रुग्णालयांतील ENT Surgery Operation Theatre करिता M/s. Meditek, Panvel यांची ऑनलाईन एकच (०१) ई –निविदा प्राप्त झाली आहे, त्यामुळे याकामी पुन्हा ई–निविदा मागवाव्या लागणार आहेत.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील ENT Surgery Operation Theatre या विभागाकरिता खरेदी करणेत येणा-या Operation Table साठी फेरनिविदा मागविणेस व श्री साईबाबा रुग्णालयातील General O.T. व Urology Operation Theatre या विभागांकरिता ०२ नग - Imported Operation Table खरेदीकामी M/s. Meditek, Panvel यांचेकडून रक्कम रु. ४९३८४००/- इतक्या दरात अजून सूट मिळणेकामी मा. उपसमितीचे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी तसेच सदरचे खरेदीकामी येणा-या खर्चास मान्यता घेणेसाठीची शिफारस मा. व्यवस्थापन समितीकडे करणेसाठी सदर प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**श्री साईबाबा रुग्णालयातील General O.T. व Urology Operation Theatre या विभागाकरीता ०२ नग - Imported Operation Table खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक M/s. Meditek, Panvel हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी मशिनच्या मुळ किंमतीमध्येच Accessories चे दर नमुद केले असल्याचे सांगीतले. तसेच मशीनची किंमत व CMC चे दर या एकुण रकमेवर ०.५% सवलत देऊ केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील General O.T. व Urology Operation Theatre या विभागाकरीता ०२ नग-Imported Operation Table खरेदी करणेकामी निम्नतम निविदाधारक M/s. Meditek, Panvel यांनी चर्चेअंती देऊ केलेले ०२ नग मशिन्सची Accessories सह किंमत रक्कम रु.४५,५५,५०८/-मात्र व ५ वर्षाची वॉरंटी संपल्यानंतर पुढील ५ वर्षाकरीता CMC चे दर रक्कम रु.३,५८,२००/- मात्र स्विकारणेत यावेत, व मशिन्सची किंमत ही Accessories सह असल्याचे त्यांचेकडून लेखी घेऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस आहे.**

**तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील ENT Surgery Operation Theatre करीता M/s. Meditek, Panvel यांची ऑनलाईन एकच ई-निविदा प्राप्त झालेली असल्याने याकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आजचे स्थानिक उपसमिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे शिफारस करणेत आली.**

**१३ संस्थानतर्फे जिल्हा परिषदेला शाळा खोल्या बांधकामासाठी पहिल्या टप्प्यात रु. १० कोटीचा पहिला हप्ता जिल्हा परिषदेला वितरीत केलेला आहे. जिल्हा परिषदेकडे संस्थानने वितरीत केलेले अनुदान प्रत्यक्ष शाळा खोल्याच्या बांधकामासाठी येणा-या खर्चा पेक्षा कमी असल्याचे वृत्त विविध वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेले आहे.**

**आजचे सभेत या विषयावर सविस्तर चर्चा झाली वास्तवीक साधारण क्षेत्रासाठी प्रती वर्ग खोली बांधकामासाठी रु. ६ लक्ष २० हजार व डोंगराळ क्षेत्रातील प्रती वर्ग खोली बांधकामासाठी रु. ६ लक्ष ७० हजार या प्रमाणे रक्कम संस्थानने निश्चीत केलेली नाही, सदर रक्कम मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खालील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांचे समितीने निश्चीत केलेली आहे. जिल्हा परिषदेला शाळा खोल्या बांधकामासाठी निधी कमी पडत असेल तर जिल्हा परिषदेने सविस्तर कारणे नमुद करुन नव्याने प्रस्ताव सादर केल्यास संस्थान वाढीव फरकाची रक्कम रु. ३० कोटी पर्यंतच्या मर्यादेत राहून देण्यास तयार आहे. अशी संस्थान तर्फे प्रेस नोट देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- जनसंपर्क विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **नियोजीत शैक्षणिक संकुल इमारतीचे बांधकाम करणेकामी निमगांव को-हाळे येथील गट नं.१८३ मधील क्षेत्राचे बांधकाम परवागी प्राप्त करुन घेणेसाठी विकास शुल्क व प्रिमीयम रक्कम मिळून रु.७,५२,६३,०००/-मात्र सहा.संचालक,नगररचना,अहमदनगर यांचेकडे जमा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-

अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय-

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१९

"यावरसविस्तरचर्चाहोऊन, श्री साईबाबा संस्थान संचलित शैक्षणिक संकुलाचे बांधकाम मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ मधील जागेत करणेसाठीमुख्य अभियंता, सा.बां.विभाग, नाशिक यांनी तपासणी करुन दिलेले सुधारित रक्कम रु.१५८.७४कोटी मात्रचे खर्चाचा तसेच प्रशासकिय मान्यतेचे वेळी छानणीअंती होणा-या सुधारीत वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली."

प्रस्तावना- संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट न.१८३ मधील ५ हे.४० आर जागेत नविन अदयावत शैक्षणिक संकुलाची उभारणी करणे प्रस्तावीत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१९ अन्वये सदरहूकामी येणा-या रककम रु.१५८.७४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाचे शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/९६९/प्रक्र११०/का/१६ दि.०८/१०/२०१६ अन्वये सदरहू खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या प्रकल्पास बांधकाम परवानगी घेणेसाठी उप विभागीय अधिकारी, शिर्डी यांचेकडे दि.१७/०३/२०१८ रोजी प्रस्ताव पाठविणेत आला होता. त्यांचेमार्फत बांधकाम आराखडयांचे मंजूरी करीता अभिप्रायासाठी मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांचेकडे दि.११/१०/२०१८ रोजीचे पत्राने बांधकाम आराखडे मंजूरी बाबत अभिप्राय मिळणेसाठी पाठविणेत आले आहेत. मा.सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांनी सदरहू आराखडयांचे छाननी करुन विकास शुल्क व प्रिमियम रक्कम खालीलप्रमाणे भरणेबाबत दि. १७/०१/२०१९ रोजीचे चलनाव्दारे कळविले आहे.

| Sr. No. | Description | Amount |
|---|---|---|
| 01 | **Development Fees -**<br>a) Total Built up area = 54675.71 Sqm<br>b) Fees 2 % of Rs.10,500/- = Rs.210 /Sqm<br>(Ready reckoner rate of Gat. No. 183, Nimgaon-Korhale = Rs.10,500/- Sqm)<br>Development Fees = 54675.71 x210 = 1,14,81,899.10<br>Say Rs. = 1,14,81,900.00 | **1,14,81,900/-** |
| 02 | **Paid FSI Premium –**<br>a) Total paid FSI area = 6074.39 Sqm<br>b) Fees @ 100 % of Rs.10,500/ per Sqm.<br>Paid FSI Premium = 6074.39 x Rs.10500 = Rs.6,37,81,095.00<br>Say Rs. = 6,37,81,100.00 | **6,37,81,100/-** |
| | **एकुण रक्कम रुपये** | **7,52,63,000/-** |

**प्रस्ताव-** तरी सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांचेकडेस विकास शुल्क व प्रिमियम याची एकूण रक्कम रु.७,५२,६३,०००/- मात्र लेखाशाखेमार्फत अदा करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.७५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत शैक्षणिक संकुल इमारतीचे बांधकाम करणेकामी निमगांव को-हाळे येथील गट नं.१८३ मधील क्षेत्राचे बांधकाम परवागी प्राप्त करुन घेणेसाठी सहाय्यक संचालक, नगर रचना, अहमदनगर यांनी कळविलेली विकास शुल्क रक्कम रु.१,१४,८१,९००/- व प्रिमियम शुल्क रक्कम रु.६,३७,८१,१००/- असे एकुण रक्कम रु.७,५२,६३,०००/- मात्र त्यांना लेखाशाखेमार्फत आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे नुतनीकरणाचे कामात फ्लोरिंग टाईल्स बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :

अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) अन्वये,समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतुद आहे.

प्रस्तावनाः-श्रीसाईबाबा भक्तनिवास इमारतीमधील पहिल्या टप्प्यातील उर्वरीत खोल्यांसह संपूर्ण इमारतीचे नुतनीकरण कामासाठी ठेकेदार जे. के. कन्स्ट्रक्शन ॲण्ड कंपनी,परळी वैजनाथ यांना कार्यादेश देणेत आला आहे. ठेकेदार यांचा काम पूर्ण करणेचा कालावधी १८ महिने (०१/०८/२०१८ ते ३१/०७/२०१९) असा आहे. ठेकेदार यांना कामासाठी A व B विंगच्या एकूण ६३ खोल्या ताब्यात देण्यात आलेल्या असून त्यापैकी २७ रुमचे काम पर्णत्वावर आले असून उर्वरीत ३६ खोल्यांचे काम प्रगती पथावर आहे.

अ) निविदेमध्ये व्हेट्रीफाईड टाईल्स फ्लोरींगचे ॲटमकरीता जुन्या टाईल्स (सिमेंट मॉर्टरसह) काढणे व सिमेंट मॉर्टरसह नविन टाईल्स बसविणे अशा दोन बाबी नमूद आहे. निविदेमध्ये जुन्या सिमेंट टाईल्स काढणे प्रती चौ.मी.रु.२०/-हा दर आहे. तसेच जुन्या टाईल्स काढल्यानंतर नव्याने व्हेट्रीफाईड टाईल्स सिमेंटमध्ये बसविणे कामी रु. ९५०/- प्रती चौ. मी.असा दर आहे.

आता ठेकेदार यांनी दि.११/१२/२०१८ रोजीचे पत्रान्वये जुन्या फ्लोरींगवर ॲडेझीव्ह मटेरिअल वापरुन नविन टाईल्स बसविणेसाठी मान्यता मिळणेची विनंती केली असून सिमेंट ऐवजी ॲडेझीव्ह मटेरिअल वापरून टाईल्स बसविणे कामी दर पृथकरण करुन सिमेंट व मॉर्टर मटेरिअलसाठी रु.३१३/- प्रती चौ.मी. व टाईल्स ॲडेझिव्ह वापरल्यास रु.३७१.७०/- प्रती चौ.मी. दर सादर केला आहे. मंजूर निविदेतील दरा पेक्षा प्रती चौ. मी.रु.५८.७० इतका वाढीव खर्च येणार आहे. परंतु या वाढीव दराची मी मागणी करणार नाही.तसेच निविदेतील ॲटमनुसार फ्लोरींगच्या जुन्या टाईल्स काढून सिमेंट मॉर्टरमध्ये टाईल्स बसविणेकामी वेळ लागणार आहे. तसेच तोडफोडीचे कामासाठी वापरण्यात येणारे ब्रेकरमुळे स्लॅब व भिंतीना तडे जाण्याची शक्यता असल्यामुळे लिकेज होऊ शकते, असे कळविले आहे.

याबाबत इकडील विभागामार्फत बाजार भावानुसार दर पृथकरण केले असून सिमेंट मॉर्टरमध्ये टाईल्स बसविणे व ॲडेझीव्हमध्ये टाईल्स बसविणेकामी खालीलप्रमाणे दर येतो.

| सिमेंट मॉर्टर मध्ये टाईल्स बसविणे | ॲडेझीव्ह (केमीकल) मध्ये टाईल्स बसविणे |
|---|---|
| प्रति १० चौ.मी. करीता आवश्यक मटेरील<br>सिमेंट - १.८७६ गोणी दर प्रती रु.२६०/- रु. ४८७.७६<br>वाळू – ०.१९९५ घ.मी.प्रती रु.१४१३.४२ रु. २८१.९८<br>मजुरी – १० चौ.मी. करीता रु.१७२.१६ रु. १७२१.६०<br>-----------------------<br>-<br>**एकूण – रु. २,४९१.३४**<br>रु.२४९.१३ प्रती चौ.मी. (रु.२३.१५ प्रती चौ.फुट ) | प्रति १० चौ.मी. करीता आवश्यक मटेरील<br>ॲडेझीव्ह - २.१५२ गोणी(२५Kg) रु.४१५.००- रु.८९३.०९<br>मजुरी-१०चौ.मी.प्रती रु. १७२.१६ - रु.१७२१.६०<br>-------------------------------<br>**एकूण – रु.२,६१४.६९**<br>रु.२६१.४७ प्रती चौ.मी. (रु.२४.३० प्रती चौ.फुट ) |
| रु.२४९.१३ प्रती चौ.मी. (रु.२३.१५ प्रती चौ.फुट )<br>अधिकजुन्या टाईल्स काढणेप्रती चौ.मी.रु.२०/- २००.००<br>काढलेले मटेरियल २ कि.मी. वाहतुक<br>१०x०.०५=०.५x ५०३/-प्रती घ. मी. २५१.५० | अधिकजुन्या टाईल्स काढणेप्रती चौ.मी.रु.२०/- ०.००<br>काढलेले मटेरियल २ कि.मी. वाहतुक ०.०० |

वरील तपशिलानुसार ॲडेझीव्ह वापरुन काम करणेसाठी रु.१२.३४ चौ.मी. मात्र इतका वाढीव खर्च येत आहे. परंतु या वाढीव खर्चाची ठेकेदार हे मागणी करणार नाही.

ब) निविदेमध्ये भितींचे जुने रंगकाम काढून साफ केलेल्या प्लॅस्टरवर ०६ फुट उंचीपर्यंत व्हेट्रीफाईड टाईल्सचा डॅडो सिमेंट मॉर्टर वापरून बसविणेबाबत नमूद आहे. त्यानुसार साईटवर काम चालू आहे.

विभागाचा अभिप्रायः- जुन्या टाईल्स तोडणेकामी प्रती चौ.मी.रु.२०/- मात्र इतका खर्च असून तोडफोड मटेरिअल वाहतूक करणेकामी प्रतीचौ.मी.रु.४७.७५ मात्र इतका खर्च आहे.

जुन्या फ्लोरींगवर ॲडेझिव्ह वापरुन नविन टाईल्स बसविल्यास सदर कामासाठी वेळ कमी लागेल. जुन्या टाईल्स तोडणे व मटेरिअलची वाहतुक करणे इत्यादी कामे करण्याची आवश्यकता नाही त्यामुळे कमी

कालावधीत काम होईल व खर्चाची बचत होईल. तसेच सदरचे काम सिमेंट मॉर्टर इतकेच टिकाऊ होईल. त्यामुळे सिमेंट मॉर्टर ऐवजी टाईल्स ॲडेझीव्ह (केमीकल) वापरून नविन व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणेस हरकत नाही, असे मत आहे.

प्रस्ताव:- तरी ठेकेदार यांचे मागणीनुसार फ्लोरींगकरीता निविदेतील मंजूर दरात सिमेंट मॉर्टर ऐवजी आहे त्याच स्थितीत जुन्या फ्लोरींग टाईल्सवर टाईल्स ॲडेझिव्ह वापरून नविन व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणेस तसेच निविदेतील तरतुदीनुसार भिंतीला डॅडो बसविणेबाबत निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे नुतनीकरणाचे कामात जुन्या फ्लोरींगवर ॲडेझिव्ह वापरुन नविन टाईल्स बसविल्यास या कामासाठी वेळ कमी लागेल व जुन्या टाईल्स् तोडणे व मटेरिअलची वाहतूक करणे इत्यादी कामाचे खर्चाची बचत होईल याकरीता सदर कामाचे ठेकेदार जे.के.कन्स्ट्रक्शन ॲण्ड कंपनी, परळी वैजनाथ यांनी केलेल्या मागणी नुसार फ्लोरींगकरीता निविदेतील मंजूर दरात सिमेंट मॉर्टर ऐवजी आहे त्याच स्थितीत जुन्या फ्लोरींग टाईल्सवर टाईल्स ॲडेझिव्ह वापरुन नविन व्हेट्रीफाईड टाईल्स बसविणेस तसेच निविदेतील तरतुदीनुसार भिंतीला डॅडो बसविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **आर्थिक वर्ष सन २०१९-२० करीता पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आर्थिक व्यवहारांसंबंधीत केंद्र व राज्य शासनाकडुन विविध आर्थिक बाबींशी निगडीत, कायदे पारित केले जातात. यामध्ये आयकर, जीएसटी इ. सबंधीत कायद्यातील नव-नवीन तरतुदींचा प्रभाव संस्थानच्या दैनंदिन आर्थिक व्यवहारांवर पडत असतो. शासनामार्फत नियुक्त लेखापरिक्षकांमार्फत अंतर्गतव वैधानिक लेखापरिक्षण करण्यात येते. वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल शासनास सादर केला जातो व विधीमंडळाच्या पटलावर मांडण्यात येतो. या लेखापरिक्षण अहवालामध्ये लेखापरिक्षकांच्या आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्यांच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी दैनंदिन आर्थिक व्यवहार लेखाविषयक, करविषयक व मा.व्यवस्थापन व शासनाच्या नियमांस अनुसरुन होत असलेबाबत व त्यानंतरच पुरवठादार, कार्य कंत्राटदार यांना बिले आदा करण्यासाठी दरवर्षी पुर्व लेखापरीक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यांचे मार्फत सर्व आर्थिक नियमांचे पालन होत असलेबाबत तपासणी केली जाते. काही अनियमितता असेल तर तात्काळ दुरुस्ती करुन व्यवहार पुर्ण केले जातात. त्यामुळे शासन नियुक्त लेखापरिक्षकांमार्फत करण्यात येणा-या वैधानिक व अंतर्गत लेखापरिक्षण अहवालात आक्षेपांचे प्रमाण कमी होते.

अशा प्रकारे आर्थिक वर्ष २०१८-१९ करिता संस्थान व रुग्णालये विभागांचे पुर्व लेखपरिक्षणाकरिता विहीत पध्दतीने मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, नासिक यांची संस्थान व रुग्णालय विभागाकरिता प्रत्येकी रु.१,००,०००/- एकत्रीत इतक्या मानधनावर / फी वर पुर्व लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक करण्यात आली होती. त्यांची मुदत ३१ मार्च,२०१९ रोजी पुर्ण होत आहे.

प्रस्तावः- आर्थिक वर्ष २०१९-२० करिता संस्थान व रुग्णालय विभागाकरिता पुर्व लेखापरिक्षकांची (Pre Auditor) नेमणुक करणे आवश्यक आहे. याकामी विहीत पध्दतीने संस्थानच्या संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन, नामांकित संस्थांकडून (साधारणतः रु.४०० कोटींचे वर वार्षिक उलाढाल असलेल्या संस्था/कंपन्यांचे लेखापरिक्षण करण्याचा अनूभव असलेल्या) लेखापरिक्षण संस्थाकडून बंद पाकिटामध्ये त्यांचे फर्मची माहिती व दुस-या पाकिटात अपेक्षित फी अशी माहिती मागविता येतील. मुदतीत आलेल्या अर्जांची मा.उपसमिती सभेसमोर छाननी करणेत येऊन त्यामधील पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फिचा तुलनात्मक तक्ता निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

विभागाचा अभिप्रायः- आर्थिक वर्ष २०१९-२० करिता पुर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणुकी करिता संस्थानचे संकेतस्थळावर माहिती प्रसिध्द करुन प्रस्तावित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीपुढे सादर.

निर्णय क्र.७७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१९-२० करिता संस्थान व रुग्णालय विभागाकरिता पुर्व लेखापरिक्षकांची (Pre Auditor) नेमणुक करणेकामी मागील अर्थिक वर्ष २०१८-१९ करीताचे पुर्व लेखापरिक्षक मे.उल्हास बोरसे ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, नासिक यांची संस्थान व रुग्णालय विभागाकरिता पुर्वीच्याच प्रत्येकी रु.१,००,०००/- एकत्रीत इतक्या मानधनावर/फी वर पुर्व लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबांच्या चरणी रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणाऱ्या साईभक्तांना २० ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे प्रसादरुपाने देणेबाबतच्या योजनेचे पुनर्विलोकन होणेबाबत.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका –

(अ) मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७२ व मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.१८ एप्रिल, २०१७ रोजीचे शासन निर्णयान्वये,

" जे साईभक्त रक्कम रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम रोख अथवा वस्तू-साहित्य रुपात देणगी देतील त्यांना संस्थान व्यवस्थापनामार्फत पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची चांदी प्रतिमा ( नाणी), ०१ साईचरित्र व श्री साईंचा एक थ्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यास मान्यता मिळालेली आहे."

सदर योजनेची कार्यवाही श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१७ पासून करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४ मे,२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ४५३ अन्वये निर्णय घेणेत आलेला असून त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५ जुन,२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४९४ अन्वये, विषयांकित प्रसाद रुपाने द्यापवयाची शुध्द चांदीची प्रतिमा (नाणी ) तयार करुन घेणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय पारित करणेत आलेला आहे-

" मा.व्यवस्थापन समितीने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयास अनुसरुन, रुपये २५,०००/- मात्र व त्यापेक्षा जास्त देणगी देणा-या साईभक्तांना संस्थान व्यवस्थापनामार्फत प्रसादरुपाने भेट द्यावयाचे २० ग्रॅम वजनाच्या श्रींच्या पादुकांची प्रतिमा असलेली चांदीची नाणी केंद्र शासन मान्यता प्राप्त भारत सरकार टंकसाळ, मुंबई (INDIA GOVERNMENT MINT,MUMBAI) या संस्थेकडून दरपत्रकात नमूद केलेल्या अटी-शर्तीनुसार व चांदीच्या मुल्यांमध्ये होणा-या वाढ अथवा घटीस अधिन राहून, १०००० नग थेट खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. यापैकी प्रथमत: २००० नग चांदीची नाणी तयार करुन घेण्यात यावी व याप्रमाणे भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांना कार्यादेश देण्यात यावा.तसेच सदरची नाणी तयार झालेनंतर मुंबई येथून शिर्डी येथे आणणेकामी विमा व इतर बाबींसाठी खर्चासही मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयानुसार, भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांना आवश्यकतेनुसार कार्यादेश देण्यात आलेले असून, त्यांनी सदर कार्यादेशानुसार चांदी नाणींचा पुरवठा ही पुर्ण केलेला असून,बिलाची रक्कम आदा करणेत येऊन,हिशोब पूर्ण करणेत आलेला आहे.सदर योजनेची कार्यवाही,श्री गुरुपोर्णिमा उत्सव – २०१७ चे मुख्य दिवशी म्हणजेच दि.९ जुलै २०१७, रोजी मा.व्यवस्थापन समिती सदस्याचे उपस्थितीत करणेत आलेली असून, योजनेनुसार पात्र ठरणा-या देणगीदार साईभक्तांना प्रसादरुपाने २० ग्रॅम वजनाची पादुकांची प्रतिमा असलेली चांदी नाणी वाटप करण्यात येत आहेत. दि.१२ एप्रिल, २०१८ रोजी लेखाशाखेकडे २३४५ नाणी शिल्लक होती. पुढील वाटपासाठी चांदीची नाणी आवश्यक असल्याने भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून एका वर्षात एकाच वेळी १०००० नग चांदीची नाणी खरेदी करणेकामी कार्यादेश देऊन, चार टप्प्यात नाणी पुरवठा करणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२ मे २०१८ रोजी झालेल्या सभेसमोर सादर करणेत आला होता. त्यास निर्णय क्र.३०३ अन्वये मान्यता देण्यात आली होती.

त्यास अनुसरुन, भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांना कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार १०००० नग चांदीची नाणी खरेदी करण्यात आलेली असून, हिशोब पूर्ण करणेत आलेला आहे.

भारत सरकार टंकसाळ,मुंबई यांचेकडून आतापर्यंत २० ग्रॅम वजनाची एकूण २०००० नग चांदीची नाणी खरेदी करणेत आली आहे. सदर योजनेत दि.९ जुलै २०१७ ते दि. ३१/१२/२०१८ अखेर एकूण १६४१५ चांदीचे नाणींचे वाटप करणेत आले असून, त्यापैकी आता फक्त ३५८५नग नाणी शिल्लक आहेत.

दरमहा सर्व साधारणपणे ११०० ते १२०० नाण्यांचे देणगीदार साईभक्तांना वाटप होत असल्याने शिल्लक असलेली नाणी मार्च २०१९ पर्यंतच पुरतील, असा अंदाज आहे.

सदर योजना श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवाचे पार्श्वभूमीवर श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१७ पासूनसुरु करण्यात आली असून, जे साईभक्त रक्कम रु. २५,०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम रोख अथवा वस्तू-साहित्य रुपात देणगी देतील त्यांना संस्थान व्यवस्थापनामार्फत श्री साईबाबांचे पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची चांदी नाणी ०१,साईचरित्र ०१ व श्री साईंचा एक थ्रीडी फोटो प्रसादरुपाने देण्यात येत आहे. तसेच मोफत दर्शन व आरतीची सुविधा देण्यात येत आहे.

विभागाचा अभिप्राय– या योजनेअंतर्गत रक्कम रुपये २५,०००/- व त्यापुढील देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांस सध्या पुढील प्रमाणे वस्तु सप्रेम भेट देण्यात येत आहेत.

१) साई पादुकांची प्रतिमा असलेले २० ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे -०१ नग

२) श्री साई चरित्र– ०१ नग

३) श्रींसाईबाबांचा थ्रीडी फोटो – ०१ नग

४) मोफत व्ही.आय.पी. दर्शन १ वेळेला

५) मोफत व्ही.आय.पी. आरती ०१ वेळेला

६) उपलब्धतेनुसार कॅलेंडर व साईराम शॉल – ०१ नग

सदर योजना श्रींचे समाधी शताब्दी महोत्सवाचे पार्श्वभूमीवर सुरु करण्यात आली असून, आता समाधी शताब्दी महोत्सव सोहळयाची सांगता झाली असल्याने, सदर योजनेचे औचित्य राहिलेले नाही. त्यामुळे येथुनपुढे

१) रक्कम रुपये २५,०००/- ते रक्कम रुपये ९९,९९९/- पर्यंत देणगी देणा-या साईभक्तांस फक्त ०१ वेळचे व्ही.आय.पी. मोफत दर्शन, तसेच श्री साई चरित्र ०१ नग व श्रींचा थ्रीडी फोटो ०१ नग व साईराम शॉल ०१ नग देता येईल. आणि -

२) रक्कम रुपये १,००,०००/- व त्यापुढील देणगी देणा-या साईभक्तांस ०१वेळेला व्ही.आय.पी.आरती, तसेच श्री साई चरित्र ०१ नग व श्रींचा थ्रीडी फोटो ०१ नग व साईराम शॉल ०१ नग देता येईल.

प्रस्ताव– तरी रक्कम रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणा-या साईभक्तांना सप्रेम भेट देण्यात येत असलेले २० ग्रॅम वजनाचे चांदीचे नाणे व देण्यात येणा-या इतर सुविधाबाबत पुनर्विलोकन होणेकामीसदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या चरणी रुपये २५,०००/- किंवा त्यापेक्षा अधिक देणगी देणाऱ्या साईभक्तांना संस्थान व्यवस्थापनामार्फत पादुकांची प्रतिमा असलेली २० ग्रॅम वजनाची चांदीची प्रतिमा (नाणी), एक साईचरित्र व श्री साईंचा एक थ्रीडी फोटो प्रसादरुपाने देणे पुर्वीप्रमाणेच सुरु ठेवण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **आयकर व व्हॅटकर कामकाजाबाबत सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला आयकर विभाग व विक्रीकर विभाग यांच्या कर वसुली बाबत व कर निर्धारणे, फेर कर निर्धारणे बाबत नोटीसा आल्या असुन त्या बाबतची सद्यस्थिती खाली प्रमाणे आहे.

(अ) आयकर (Income Tax) :-

१. दि.३१.१२.२०१७ रोजी मा.उपायुक्त, आयकर, मुंबई यांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ चे करनिर्धारण करुन रु.१८३,८६,१४,३३०/- देय कर असलेबाबत नोटीस पाठविली होती. यामध्ये साईबाबा संस्थान धार्मीक ट्रस्ट नसुन धर्मादाय ट्रस्ट गृहीत धरुन दक्षिणापेटीमध्ये प्राप्त झालेल्या देणगी रक्कम, आर्थिक वर्ष २००९-१० चे अखर्चित उत्पन्ना संबधीत फार्म नं.१० आनलाईन दाखल करणे व या सर्वांवर दंडव्याज याचा समावेश आहे.

२. सदर नोटीस विरोधात दि.३१.०१.२०१७ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट अर्ज नं.३९५/२०१८ दाखल करण्यात आला होता.

३. दि.०९.०२.२०१८ रोजी रिट अर्जावर सुनावणी होऊन आयकर विभागाने फेर करनिर्धारण करण्यात येऊन आयकर लवादाकडे अपिल दाखल करण्याचा व स्टे करिता आयकर विभागाकडे प्रस्ताव देण्याचा निर्णय दिला.

४. दि.१८.०२.२०१८ रोजी ऑनलाईनद्वारे मा.आयकर आयुक्त (अपिल) यांचेकडे अपिल अर्ज दाखल करण्यात आला आहे. यामध्ये श्री साईबाबा संस्थान धर्मादाय व धार्मीक देवस्थान असले बाबत ट्रस्ट डिड, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,अधिनियम २००४ दाखल केला आहे. आर्थिक वर्ष २००९-१० चे अखर्चित उत्पन्ना संबधीत फार्म नं.१० अपिलात दाखल करण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे सखोल अपिल अर्ज दाखल केला आहे. त्यावर आयकर विभागाने अदयाप निर्णय दिलेला नाही.

५. तत्पुर्वी दि.२०.०२.२०१८ रोजी आयकर विभागाने फेर करनिर्धारण करुन रु.१२२,०४,६१,८४०/- व्याजासह देय कर कळविला आहे.

६. दि.२०.०३.२०१८ व दि.२१.०३.२०१८ अखेर अपिल संबंधीत आवश्यक कागदपत्रे दाखल करण्यात आली असून त्यावर अद्याप आयकर विभागाकडून अपिल ऑर्डर झालेली नाही.

७. आर्थिक वर्ष २०१२-१३ चे वार्षिक करविवरणपत्र विहीत वेळेत दाखल करण्यात आले असून आयकर विभागाकडून त्यांचे करनिर्धारणही करण्यात आले आहे. तथापि, दि.०३.०८.२०१८ रोजी मा.उपायुक्त, आयकर विभाग, मुंबई यांनी आर्थिक वर्ष २०१२-१३ चे फेर करनिर्धारणाकरिता आवश्यक कागदपत्रांची मागणी केली.

८. आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१५-१६ चे अपिल पुर्ण करण्यापुर्वीच मागील वर्षांची फेर करनिर्धारणे करु नयेत करिता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.१६.१०.२०१८ रोजी रिट पिटीशन नं.३२७८ दाखल करण्यात आले. त्यावर दि.२१.१०.२०१८ रोजी सुनावणी होऊन दि.२४.१०.२०१८ रोजी संस्थानचे विरोधात मागील वर्षांची फेर करनिर्धारणे करण्याबाबत आदेश झाला आहे.

९. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे Special Leave Petition (Civil) No.30475/2018 दाखल करण्यात आली होती. त्यावर दि.३०.११.२०१८ रोजी सुनावणी

होऊन सदर SLP मध्ये कोर्टाने "Issue Notice" चे आदेश दिले आहेत व मागील वर्षांची फेर करनिर्धारणे करण्यास स्थगिती आदेश (Stay Order) दिला आहे, त्याची प्रत सोबत परिशिष्ठ "अ " जोडली आहे.

१०. मा.सर्वोच्च न्यायालयात Special Leave Petition (Civil) No.30475/2018 ची दि.१८.०१.२०१९ रोजी द्वीतीय सुनावणी होऊन खालीलप्रमाणे आदेश झाला आहे.

i). The Assessing Officer shall complete the assessment for Assessment Year 2013-14 pursuant to the notice for reassessment which has been issued on 23 March 2018, in accordance with law;

ii). The issue as to whether the notice under Section148 for reopening the assessment for Assessment Year 2013-14 is valid is kept open to be urged in appropriate proceedings after the assessment order is passed;

iii). Upon the passing of the order of assessment for Assessment Year 2013-14 and in order to enable the assessee to pursue its remedies before the Commissioner of Income Tax (Appeals) there shall be an interim protection in terms of the order dated 27 March 2018 that was passed by the Division Bench of the Bombay High Court in Writ Petition No. 939 of 2018;

iv). Both the appeals for the Assessment Years 2013-14 and 2015-16 shall be heard together by the Commissioner of Income Tax (Appeals);

v). The appellant shall be at liberty to pursue its remedies in accordance with law.

११. अशाप्रकारे करनिर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण करणे, व यापुर्वीचे आयकर विभागाकडे प्रलंबित असलेले करनिर्धारण वर्ष २०१५-१६ चे अपिल व २०१३-१४ चे अपिल असे दोन्हीही एकत्र करणे व तोपर्यंत कर भरण्यास स्थगिती दिली आहे.

१२. त्यास अनुसरुन मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांचे समन्वयाने आयकर विभागाकडे अपिल अर्ज दाखल करणे, करनिर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण करणे, करनिर्धारण वर्ष २०१५-१६ चे अपिल मा.उपायुक्त, आयकर विभाग यांचेकडे दाखल करण्यात आले असुन त्यावर काही सुनावण्या झाल्या आहेत. तसेच करनिर्धारण वर्ष २०१३-१४ चे फेर करनिर्धारण झाल्यानंतर आवश्यकतेप्रमाणे अपिल बाबत कार्यवाही करण्यात येईल.

(ब) मुल्यवर्धीत कर (VAT) :-

१. मुंबई विक्रीकर कायदा १९५९ अंतर्गत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी डिलर नसले बाबत महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण (IIIrd Bench of Maharashtra Sales Tax Tribunal Bombay) यांनी दि.२०.०३.१९९० रोजी निर्णय दिला आहे.त्यास अनुसरुन संस्थानला विक्रीकर लागु नव्हता.

२. विक्रीकर कायद्याचे रुपांतर मुल्यवर्धीत कर कायदा २००२ (VAT Act 2002) मध्ये झाले. व सन २००५ पासुन कार्यवाही सुरु झाली. विक्रीकर कायद्याप्रमाणे MVAT कायद्यात संस्थानला सुट मिळणे बाबत मा.आयुक्त विक्रीकर विभागाकडे प्रस्ताव सादर केला होता. त्यांनी संस्थान "Deemed Dealer" असले बाबत दि.१८.०३.२००९ रोजी आदेश केला. सदर आदेशाविरुद्ध (IIIrd Bench of Maharashtra Sales Tax Tribunal Bombay) मध्ये दि.२०.०४.२००९ रोजी अपिल दाखल करण्यात आले. सदर न्यायाधिकरणात २००९ पासुन ते २०१८ पर्यंत कोणताही निर्णय झाला नाही.

३. तत्पुर्वी विक्रीकर कार्यालय, अहमदनगर यांनी आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅट कर निर्धारण करुन एकुण रु.२४,२६,२४,४२४/- व्हॅट कळविला आहे. यामध्ये प्रसादालय जमा, पुस्तक फोटो डायरी कॅलेंडर विक्री, रुग्णालय बील रक्कम, साई प्रतिमा असलेली सोने चांदी नाणी मिळकत रक्कम इत्यादी संस्थानला देणगी वजा जाता मिळणाऱ्या सर्व मिळकतीवर व्हॅटकर आकारणीचा समावेश आहे. सर्व सदर बाब न्यायाधिकरणात (Tribunal) न्यायप्रविष्ठ असल्याने कर निर्धारण करु नये असा पत्रव्यवहार त्यांचेशी करण्यात आला होता.

४. दि.०७.०९.२०१८ रोजी मा.आयुक्तांनी कळविल्या प्रमाणे संस्थान "Deemed Dealer" असले बाबत निर्णय विक्रीकर न्यायाधिकरण मुंबई यांनी दिला आहे.

५. विक्रीकर न्यायाधिकरणाच्या संस्थान डिलर असले बाबत निर्णयाविरुद्ध मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे अपिल अर्ज दाखल करण्यात आला असुन त्यावर दि.२१.११.२०१८ रोजी सुनावणी होऊन मा.उच्च न्यायालयाने अपिल अर्ज दाखल करुन घेतला आहे.

६. तथापि विक्रीकर विभागाकडुन दि.०४.१२.२०१८ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे. त्यामध्ये १० दिवसांचे आत आर्थिक वर्ष २००९-१० चा व्हॅटकर एकुण रु.२२,८३,३८,७४५/- भरणे बाबत कळविले आहे.

७. महाराष्ट्र शासनाकडुन संस्थानला तिरुमला तिरुपती देवस्थानप्रमाणे व्हॅट करात सवलत मिळणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यास अनुसरुन मा.विधि व न्याय विभागाने आवश्यक माहिती मागविली होती. त्यानंतर दि.१२.१२.२०१८ रोजी सदर विषयावर दि.१८.१२.२०१८ रोजी मा.राज्य कर आयुक्त, मा.मुख्य

कार्यकारी अधिकारी, मा.प्रधान सचिव (वि.सु.) यांची एक बैठक मा.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे दालनामध्ये आयोजित केली होती. या बैठकीमध्ये संस्थानला व्हॅट करातुन सवलत देता येणे शक्य नाही. तथापि, देय व्हॅट करावरील दंड व व्याज यामध्ये सुट देता येईल, अशी चर्चा झाली.

८. मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांचे समन्वयाने मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई, ॲड.पी.सी. जोशी यांचेमार्फत मा.उपायुक्त, व्हॅटकर चिभाग, अहमदनगर यांचेकडे अपिल दाखल करणेबाबत कार्यवाही अंतिम टप्प्यात असुन लवकरच अपिल दाखल करण्यात येऊन कर सल्लागार, चार्टर्ड अकौंटंटस् यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येईल.

अशाप्रकारे आयकर व मुल्यवर्धीत करविषयक दि.२५.०१.२०१९ अखेर सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर व व्हॅटकर कामकाजाबाबत सद्यस्थितीचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०७ **केंद्र शासनामार्फत चलनातुन बाद करण्यात आलेल्या परंतु संस्थान व्यवस्थापनाकडे जमा होत असलेल्या रु.१०००/- व रु.५००/- च्या जुन्या चलनी नोटासंबधीत सद्यस्थितीबाबत.**

प्रस्ताव- मा.वित्त विभाग, भारत सरकार यांनी दि.०८ नोव्हेंबर २०१६ रोजीचे शासन निर्णयानुसार रु.१०००/- व रु.५००/- मुल्यांच्या जुन्या चलनी नोटा व्यवहारातून बाद (बंद) केलेल्या आहेत. संस्थान परिसरात ठेवण्यात आलेल्या दक्षिणा पेटीमध्ये साईभक्त दान करतात. दान पेटयांमध्ये खालीलप्रमाणे :-

१. दि.०८.११.२०१६ ते दि.३०.१२.२०१६ या कालावधीत दक्षिणा पेटीमध्ये प्राप्त झालेल्या रु.६,४६,२०,५००/- इतकी रक्कम बॅंकेकडे जमा करण्यात आली आहे.

२. दि.३१.१२.२०१६ ते दि.३०.०९.२०१८ अखेर रु.१०००/- च्या रु.८३,३८,०००/- व रु.५००/- च्या रु.१,४७,६१,५००/- असे एकुण रु.२,३०,९९,५००/- जुन्या नोटा प्राप्त झाल्या असुन सिलबंद करुन स्ट्रॉंग रुममध्ये साठविल्या आहेत.

सदर चलनातून बाद झालेल्या नोटांसंबंधीत सद्यस्थिती मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१८ रोजीचे सभेसमोर अवलोकनार्थ सादर केली होती. त्यावर निर्णय क्र.६९९ अन्वये, "केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करण्यात आलेल्या रु.१०००/- व रु.५००/- च्या जुन्या नोटा स्विकारणेबाबत रिझर्व्ह बॅंकेला निर्देश देण्यासाठी मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन मा.न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले. तसेच याप्रकरणी समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली याचिका दाखल करणेस व त्यासाठी येणा-या अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली."

मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन मा.विश्वस्त श्री.मोहन जयकर यांनी मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट अर्ज दाखल करणेबाबत कागदपत्रांची जमवाजमव केली आहे. दरम्यानच्या कालावधीत दि.१३.१२.२०१८ रोजीचे मा.विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यामध्ये, *"निश्चलनीकरणानंतर चलनातून बाद झालेल्या जुन्या रु.१०००/- व रु.५००/- च्या नोटासंदर्भात केंद्र शासनाने अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत चलनातून बाद झालेल्या व आपल्या देवस्थानाकडे असलेल्या जुन्या नोटासंदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये,"* असे कळविण्यात आले आहे.

तरी केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करण्यात आलेल्या परंतु संस्थान व्यवस्थापनाकडे जमा होत असलेल्या रु.१०००/- व रु.५००/- च्या दि.३०.०९.२०१८ अखेर दक्षिणा पेटीमध्ये भक्तांकडुन देणगी स्वरुपात प्राप्त झालेल्या रु.२,३०,९९,५००/- जुन्या चलनी नोटासंबंधीत सद्यस्थिती अवलोकनार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर.

निर्णय क्र.८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, केंद्र शासनामार्फत चलनातून बाद करण्यात आलेल्या जुन्या रु.१०००/- व रु.५००/- च्या नोटा संबधीच्या कायद्यामध्ये एकुण् १० पेक्षा अधिक जुन्या नोटा बाळगणाऱ्या विरुध्द त्याच्याकडील जुन्या चलनातील रकमेच्या पाच पटीपर्यंत दंड आकारण्याची तरतुद आहे. सदर तरतुद शासनाच्या निर्दशनास आणून देऊन शासनाचे पुन्हा मार्गदर्शन घ्यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०८ **महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त शिर्डी संस्थान येथे विक्री केंद्राकरीता गाळा उपलब्ध करुन मिळणेबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचेकडील जा.नं.कार्यासन-८/पणन/७७३३ दि.२१.१२.२०१८ व जा.नं.कार्यासन/पणन/८१३५ दि.०८.०१.२०१९**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना - मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांनी त्यांचेकडील दि.२१/१२/२०१८ रोजीचे पत्रान्वये "महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त मंडळाने ग्रामीण भागातील उद्योजक/कारागीर यांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ व प्रसिध्दी मिळण्यासाठी महाखादी ब्रॅन्डखाली विक्री केंद्र सुरु करण्याचा मंडळाचा मानस आहे. त्याकरीता आपल्या संस्थानमार्फत शिर्डी मंदिर परिसरात जागा उपलबध झाल्यास महाखादी या नावाच्या ब्रॅन्डखाली संस्थानच्या जागेत महाखादी शॉपी सुरु केल्यास ग्रामिण उत्पादकांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध होईल. ग्रामीण भागातील पारंपारीक कारागिरांनी उत्पादित केलेल्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येवून ग्रामीण कारागिरांच्या आर्थिक उन्नतीसाठी मदत होईल व त्यांच्या उत्पादनांची प्रसिध्दी होईल. तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की, शिर्डी मंदिर परिसरात संस्थानमार्फत जागा उपलब्ध करुन मिळावी," असेबाबत नमूद करुन दि.०८/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये साईबाबा संस्थानच्या मालकीच्या साईनाथछाया इमारतीमधील ३३.८७ चौमी.(३६४.५७ चौ.फूट) आकाराचा गाळा, ५ वर्षाच्या भाडे कराराने मंडळास देण्यात यावा. मंडळ सदर गाळयाचे नियमाप्रमाणे शासकीय दराने आकारण्यात येणारे दरमहाचे भाडे भरण्यास तयार आहे. तरी सदरील गाळा मंडळास आवंटीत करावा,असेबाबत विनंती केलेली आहे.

संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील क्षेत्र ३३.८७ चौमी. (३६४.५७ चौ.फूट) या आकाराचा गाळा यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/१०/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३३४ अन्वये झालेल्या ठरावानुसार युनियन बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांचे ए.टी.एम.कक्षासाठी दिलेल्या जागेस मागील भाडे रु.२३,३००/- मध्ये १०% वाढ करुन रु.२५,६३०/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारणेत येवून पूर्वीच्याच अटी व शर्तीवर दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ अखेर या ११ महिन्यांचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापि मा.व्यवस्थापक, युनियन बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.२९/०२/२०१६ रोजीचे पत्रान्वये सध्यस्थितीत मार्केटमधील जागेचे भाडे दर ५ वर्षांनी १० ते १५% दराने भाडेवाढ केली जाते. त्यामुळे प्रत्येक वर्षी मागील वर्षाचे भाडे रकमेत १०% भाडे वाढ करुन रक्कम अदा करणे यापूढे बॅकैला शक्य होणार नाही. त्यामुळे सदरची जागा दि.३१ मार्च २०१६ रोजी बँक खाली करुन देणार असलेबाबत इकडेस कळविले व त्याप्रमाणे बॅकैने सदरची जागा खाली करुन दिलेली आहे. तेंव्हापासून सदरचा गाळा रिकामा पडलेला आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधींना उपरोक्त गाळा दि.०५/०१/२०१९ रोजी समक्ष दाखविणेत आलेला आहे. सदरचा गाळा त्यांनी त्यांचे मंडळाचे महाखादी शॉपीसाठी उपयुक्त असलेबाबत सांगितलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांनी उपरोक्त पत्रान्वये सदर गाळा ग्रामीण भागातील उद्योजक/कारागीर यांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना बाजारपेठ व प्रसिध्दी मिळण्यासाठी महाखादी ब्रॅण्डखाली विक्री केंद्र सुरु करणेकामी ५ वर्षांच्या भाडेकराराने शासकीय दराने आकारणेत येणारे दरमहाचे भाडेदराने वापरास मिळणेकामी विनंती केलेली आहे.तथापि श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम १७(३) प्रमाणे विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

यास्तव संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील क्षेत्र ३३.८७ चौमी. (३६४.५७ चौ.फूट) आकाराचा गाळा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांना महाखादी शॉपीसाठी ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करील ते अथवा संस्थान निश्चित करील ते भाडे यापैकी जे जास्त असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन भाडेकराराने देता येईल. सदरचा गाळा महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे प्रतिनिधींना दि.०५/०१/२०१९ रोजी समक्ष दाखविणेत आलेला आहे. सदरचा गाळा त्यांनी त्यांचे मंडळाचे महाखादी शॉपीसाठी उपयुक्त असलेबाबत सांगितलेले आहे.

प्रस्ताव– संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथछाया इमारतीतील क्षेत्र ३३.८७ चौमी. (३६४.५७ चौ.फूट) या आकाराचा गाळा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांना महाखादी शॉपीसाठी ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग

निश्चित करील ते अथवा संस्थान निश्चित करील ते भाडे यापैकी जे जासत् असेल त्या मासिक भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन भाडेकराराने देणेच्या निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.३२ मधील साईनाथ छाया इमारतीतील क्षेत्र ३३.८७ चौमी. (३६४.५७ चौ.फूट) या आकाराचा गाळा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई यांना महाखादी शॉपीसाठी ११ महिन्यांचे कालावधीसाठी भाडेकराराने देण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदर जागेसाठी आकारावयाचे दरमहा भाडे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून निश्चीत करुन घेण्यात यावे, सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चीत केलेले दरमहा भाडे व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ **मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात दाखल झालेल्या रिट पिटीशन नं.१२२८/२०१५ मधील सिव्हील ॲप्लिकेशन नं.४२३९/२०१८ मधील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकरीता धर्मशाळा व इतर बांधकाम करणे या सार्वजनिक प्रयोजनासाठी मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्व्हे नं.१४८ पैकी क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौ.मी.) इतके संपादन निवाडा क्र.एलएक्यएसआर १०/२००० दि.१३.०८.२०१५ अन्वये घोषीत झालेली जमीन सन २०१३ चे सुधारीत भूसंपादन कायद्यानुसार घेणे अथवा न घेणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थान शिर्डी हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे धार्मिक स्थळ/क्षेत्र आहे. येथे दर दिवशी भाविकांची मोठया प्रमाणात वर्दळ असते. भाविकांच्या सोयीसाठी धर्मशाळा व इतर बांधकाम करणेसाठी या सार्वजनिक प्रयोजनासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे व्यवस्थापन मंडळाची दि.०४-०५/१२/१९९९ रोजीच्या आयत्या वेळचा विषय क्रं.१९ निर्णय क्रं.१२६ अन्वये मौजे शिर्डी,ता.राहाता येथील सर्वे नं.१४८/१ ही जमीन भुसंपादन करणेसाठी विहित पध्दतीने भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडे सादर करणेत आलेला आहे.

तदनुषंगाने मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्वे नं.१४८ पैकी क्षेत्र ४७३१९ चौमी. इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्वस्था,शिर्डी यांचेकरीता धर्मशाळा व इतर बांधकाम करणे या सार्वजनिक प्रयोजनासाठी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील भुसंपादन निवाडा क्रं.एलएक्युएसआर १०/२००० दि.१३/०८/२०१५ अन्वये संपादित करणेत आलेले आहे. तथापि अद्याप ताबा मिळणे बाकी आहे.

भुसंपादन कायदा १८९४ चे कलम ३१(२) नुसार "जर नुकसान भरपाईची रक्कम स्विकारणेस संमती दिली नाही तर ज्यांच्याकडेस कलम १८ खालील निर्देशन सादर करणेत येईल अशा न्यायालयात भुसंपादन अधिकारी हे नुकसान भरपाईची रक्कम जमा करतील." या तरतुदीनुसार प्रस्तुत प्रकरणात निवाडाधारक यांनी कलम १२(२) ही नोटीस देवून सुध्दा या दरम्यानचे काळात निवाडयाची रक्कम स्विकारण्यास संमती न दिल्यामुळे कलम २१ नुसार भरपाईची निव्वळ देय रक्कम रु.४,४८,०६,४००/- + टीडीएस ची रक्कम रु.४९,७८,४८९/- अशी एकूण रक्कम रु.४,९७,८४,८८९/- इतकी विद्यमान न्यायालयात पाठविणेत येत असलेबाबत मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मा.जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांना उद्देशून लिहीलेल्या दि.३१/०७/२०१५ रोजीचे पत्रात नमूद केलेले आहे.

प्रस्तुत भुसंपादन प्रकरणात जमीन मालक श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांनी,भुसंपादन करुन नये म्हणून संपादनाचे विरोधात भुसंपादन कायदा १८९४ चे कलम ४ व ६ चे विरोधात नाराज होवून मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं.३९०/२००२ चे माहे जानेवारी २००२ मध्ये दाखल केले. त्यावर ना.हायकोर्ट,औरंगाबाद यांनी प्रस्तुत भुसंपादन प्रकरणी जैसे थे परिस्थिती ठेवणेचे आदेश दिले. त्यामुळे भुसंपादन कार्यवाही स्थगित ठेवणेत आलेली आहे.

सदर रिट पिटीशन नं.३९०/२००२ मध्ये सुनावणी होवून त्याचा अंतिम निकाल दि.२५/०४/२०१४ रोजी देण्यात आला असून त्यात मा.उच्च न्यायालयाने कलम ४ व ६ चे अधिसुचनेस करण्यात आलेले चॅलेंज

डिसमिस केलेले आहे आणि भुसंपादनाचा नवीन कायदा सन २०१३ प्रमाणे मोबदला रक्कम निश्चित करुन मोबदला रक्कम देणेबाबत आदेश केलेले आहेत.

उक्त निर्णयाप्रमाणे प्रस्तुत भुसंपादन प्रकरणी मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं. कावि/भुसंपादन/७९/२०१४ दि.०४/०६/२०१४ रोजीचे पत्रान्वये भुसंपादन मोबदला रक्कम रु.८,४२,४९,३७५/- इतकी शासनाकडे बिनव्याजी ठेव म्हणून सत्वर जमा करावी म्हणून संस्थानला कळविलेले आहे. त्याप्रमाणे संस्थानने भुसंपादनाची संभाव्य रक्कम रु.८,४२,४९,३७५/- इतकी दि.२७/०१/२०१५ रोजी RTGS द्वारे स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी येथील मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे खाते नं.३४२१४१४४५९६ मध्ये जमा केली असून तसे इकडील जा.नं.एसएसएस/मालमत्ता/५३६६/२०१५ दि.२८/०१/२०१५ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांना कळविणेत आलेले आहे. सदरची रक्कम त्यांचेकडेस जमा झाली असलेबाबत त्यांनी त्यांचेकडील जा.क्रं.कावि/भुसं/८३/२०१५ दि.०७/०२/२०१५ अन्वये इकडेस कळविलेले आहे.

उपरोक्त रिट पिटीशन नं.३९०/२००२ मधील निर्णयाप्रमाणे मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी प्रस्तुत भुसंपादन प्रकरणी मुल्यांकन दि.१६/१०/२००० धरुन भुसंपादन कायदा सन २०१३ नुसार जमीनीचे मुल्यांकन ठरविलेले आहे. त्याप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम रु.४,९७,८४,८८९/- इतकी निश्चित करुन मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी दि.१३/०८/२०१५ रोजी निवाडा घोषीत केलेला आहे.

उपरोक्त रिट पिटीशन नं.३९०/२००२ चे निर्णयावर नाराज होवून जमीन मालक साखरबाई हरीभाऊ शेळके मयत वारस संजीवनी दशरथ महांबरे व इतर यांनी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात भुसंपादन कायदा कलम ४(२) प्रमाणेफ्रेश नोटीफिकेशन काढणेकामी रिट पिटीशन नं.१२२८/२०१५ व सदर भुसंपादन प्रक्रिया मुदतबाहय (Lapse) झालेने ती रद्द करणेकामी रिट पिटीशन नं.१९४३/२०१६ चे दाखल केलेले होते. सदरचे दोनही रिट पिटीशन अनुक्रमे दि.०९/०२/२०१५ व दि.०३/०३/२०१६ रोजीचे आदेशान्वये मे.कोर्टाने डिसमिस केलेले आहेत.

त्यावर नाराज होवून जमीन मालक यांनी मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली यांचे कोर्टात एसएलए नं.२९८७५/२०१५ व एसएलपी नं.३५८४६/२०१६ चे दाखल करुन त्यात मौजे शिर्डी येथील उक्त सर्वे नं.१४८/१ मधील क्षेत्र ४७३१९ चौमी. ची संस्थानकरीता भुसंपादनाची कार्यवाही मा.उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेमार्फत चालू आहे. सदरची भुसंपादनाची कार्यवाही थांबविण्यात यावी याकरीता पिटीशन दाखल केलेले होते.

उपरोक्त एसएलपी मध्ये पिटीशनरने केंद्र शासनाकडील दि.२६/१०/२०१५ रोजीचे पत्रातील मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने भुसंपादन नुकसान भरपाई रक्कम निश्चित करुन मिळणेकामी मा.उच्च न्यायालयात दावा दाखल करणेसाठी सदरचे दोन्हीही एसएलपी मागे घेतलेल्या आहेत. त्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१९/०२/२०१८ रोजी मंजूरी देवून दोन्हीही एसएलपी निकाली काढलेल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणातील जमीन मालक श्रीमती साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे वारस सौ.संजीवनी दशरथ महांबरे व इतर यांनी प्रस्तुत प्रकरणातील दि.१३/०८/२०१५ रोजी जाहीर केलेला भुसंपादन निवाडा रद्द करुन मिळणेकामी आणि नव्याने भुसंपादन कायदा २०१३ चे कलम २६ ते ३० मधील तरतुदीनुसार व केंद्र सरकारचे दि.२६/१०/२०१५ रोजीचे पत्रातील मार्गदर्शन सुचनांप्रमाणे बाजारमुल्य निश्चित करणेत यावे या व इतर मागण्यांसाठी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात रिट पिटीशन नं.१२२८ /२०१५ मध्ये सिव्हील ॲप्लिकेशन नं.४२३९/२०१८ चे माहे मार्च २०१८ मध्ये दाखल केलेले आहे. तथापि त्यात अर्जदार जमीन मालक यांनी संस्थानला प्रतिवादीपणात दाखल केलेले असलेचे दिसून येत नाही. प्रस्तुत प्रकरणात सध्यस्थितीत मे.कोर्टाचेकोणतेही स्थगिती आदेश नाहीत. तथापि मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद हे उक्त दाव्यामध्ये मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१४८ पैकी क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) चे भुसंपादना संबंधी नुकसान भरपाईची सन २०१४ चे मुल्य दर धरुन होणारी रक्कम वादी यांना सन २०१३ चे सुधारीत भुसंपादन कायद्याप्रमाणे अदा करणेबाबतचे आदेश निर्गत करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विभागाचा अभिप्राय- प्रस्तुत निवाडयामध्ये जुना भुसंपादन कायदा १८९४ प्रमाणे कलम ४ ची अधिसुचना दि.२६/०७/२००० रोजी काढण्यात आलेली आहे व कलम ६ ची अधिसुचना दि.२१/०९/२००१ रोजी काढण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचा निवाडा सन २००३ पूर्वीच घोषित होणे अपेक्षित होते. तथापि यातील जमीन मालक यांनी सदरचे भुसंपादन करु नये म्हणून भुसंपादन कायदा १८९४ चे कलम ४ व ६ चे विरोधात नाराज होवून मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथे रिट पिटीशन नं.३९०/२००२ चे माहे जानेवारी २००० मध्ये दाखल केले व प्रस्तुत भुसंपादन प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडून स्थगिती मिळिवली व सदरची स्थगिती २०१४ पर्यंत म्हणजेच सुमारे १२ वर्षे कायम राहीली.

दरम्यानचे काळात भुसंपादन नवीन कायदा सन २०१३ चा अस्तित्वात आला. मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी जमीन मालक यांचे सदरचे रिट पिटीशन न.३९०/२००२ चा दावा दि.१४/०४/२०१४ रोजी डिसमिस करुन भुसंपादनाचा नवीन कायदा सन २०१३ प्रमाणे मोबदला रक्कम निश्चित

करुन मोबदला रक्कम देणेबाबत आदेश केलेले आहेत. त्याप्रमाणे भुसंपादन अधिकारी उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांनी मुल्यांकन दि.१६/१०/२००० धरुन त्याप्रमाणे नवीन भुसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार दि.१३/०८/२०१५ रोजी निवाडा घोषित केलेला आहे. प्रस्तुत निवाडयामध्ये मौजे शिर्डी येथील जमीन सर्वे नं.१४८/१ मधील क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) इतके क्षेत्राचे संपादित जमीनीचे जुना मुल्यांकन दि.१६/१०/२००० प्रमाणे मुळ मालकास नुकसान भरपाईची एकूण रक्कम रु.४,९७,८४,८८९/- इतकी देय होत आहे. मात्र मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी जमीन मालक यांचे उपरोक्त रिट पिटीशन नं.१२२८/२०१५ मधील सिव्हील ॲप्लिकेशन नं. ४२३९/२०१८ चे मान्य केल्यास व प्रस्तुत भुसंपादन प्रकरणी सन २०१४ चे मुल्य दराप्रमाणे नवीन सन २०१३ चे भुसंपादन कायद्यानुसार नुकसान भरपाईची रक्कम द्यावयाचा आदेश केल्यास सदरची रक्कम सुमारे ९० कोटी इतकी होईल. सदरची रक्कम ही अवास्तव होईल.

सदर भुसंपादन क्षेत्राचे पूर्वेकडेस रोडलगत संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५ पैकी व १२६ पैकीचे क्षेत्र ३ हेक्टर ८७ आर हे सुमारे २००६ पासून पडीत आहे. शिवाय सर्वे नं.१२६ पैकी आरक्षण क्रं.३४ मधील भुसंपादनाद्वारे क्षेत्र ०.६९.०३ इतके दि.०७/०३/२०१८ पासून संस्थानचे ताब्यात मिळालेले आहे. असे एकूण क्षेत्र सुमारे ४ हेक्टर ५६ आर इतके आजपर्यंत संस्थानचे वापरात आलेले नाही.

महाराष्ट्र शासनाचे विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रं.सासंवि-१०१७/१८४४/ प्र.क्र.२०१ / का.१६ दि.२५ जुन २०१८ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी जमीन खरेदी धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. त्यात केवळ प्रस्तावित असलेल्या एखाद्या प्रकल्पासाठी आवश्यकता असल्यास जमीन खरेदीचा विचार करणेत यावा. जमीनीची गरज आणि उपयुक्तता विचारात न घेता अशी जमीन विकत घेण्याबाबत विचार करण्यात येवू नये तसेच मुल्यांकन संबंधात खाजगी भुधारकाची जमीन ही केवळ शासनाच्या नोंदणी विभागाकडील बाजारमुल्य तक्त्यातील दराने किंवा त्यापेक्षा कमी दराने खरेदी करण्यात यावी,अशी तरतुद आहे. त्यामुळे केवळ धर्मशाळा व इतर बांधकाम करणेकामी इतक्या मोठया रकमेचे आणखी क्षेत्र खरेदी करणे संस्थानला किफायतशीर व आर्थिकदृष्टया परवडणारे ठरणार नाही.

प्रस्तुत निवाडयातील जमीनीचे क्षेत्र आणि सदर क्षेत्राची संस्थानला उपयुक्तता आणि त्यासाठी द्यावी लागणारी किंमत हे संयुक्तिक दिसून येत नाही. यास्तव सदरच्या भुसंपादन निवाडयामधील क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) इतके सन २०१४ चे मुल्य दराप्रमाणे सन २०१३ चे भुसंपादन कायद्यान्वये घेणे उचित होणार नाही.

प्रस्ताव– प्रस्तुत निवाडयातील जमीनीचे क्षेत्र आणि सदर क्षेत्राची संस्थानला उपयुक्तता आणि त्यासाठी द्यावी लागणारी किंमत हे संयुक्तिक दिसून येत नाही. यास्तव सदरच्या भुसंपादन निवाडयामधील क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौमी.) इतके सन २०१४ चे मुल्य दराप्रमाणे सन २०१३ चे भुसंपादन कायद्यान्वये घेणे अथवा न घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी येथील साखरबाई हरीभाऊ शेळके यांचे मालकीचे सर्व्हे नं.१४८ पैकी क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौ.मी.) या क्षेत्राची संस्थानला उपयुक्तता आणि त्यासाठी द्यावी लागणारी अंदाजीत किंमत रक्कम रुपये ९० कोटी हे संयुक्तिक दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुत क्षेत्राचे भूसंपादन करण्यात येऊ नये व तसे प्रांताधिकारी, शिर्डी यांना कळविण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **दि.१७ जुलै,२०१९ चे पहाटे १.३२ वाजता खंडग्रास चंद्रग्रहण असल्यामुळे मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ तरतुद-

| अ.क्र | कलम/तरतूद क्रमांक | कलम/ तरतूदीचे शीर्षक | पोटकलम/उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे |

प्रस्तावना- श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत समाधी मंदिर येथे विविध उत्सव, स्थानिक उत्सव, सण, महोत्सव असे विविध कार्यक्रम साजरे करण्यात येतात. त्याचप्रमाणे चंद्रग्रहण व सुर्यग्रहण दिसणार असल्यास संस्थान प्रथेप्रमाणे ग्रहणाचे वेध पाळण्यात येत नाहीत अशी पूर्वीपासून प्रथा आहे. याबाबत मंदिर पुजारी- श्री.बाळासाहेब जोशी यांनी ग्रहण कालावधीबाबत अनुभवातून मत व्यक्त केले आहे. त्यामध्ये खालील गोष्टी नमूद केल्या आहेत.

संदर्भीय दाते पंचांग पान नंबर २४ व २६ मध्ये दर्शविले नुसार, आषाढ शु.॥१७,शके१९४१, बुधवार, दि.१७ रोजीचे दिवशी खंडग्रास चंद्रग्रहण आलेले आहे. व त्याच दिवशी श्रीगुरुपौर्णिमेचा मुख्य दिवसाची रात्र व सांगता दिवशीची पहाट येते. ग्रहणकाल १७/०७/२०१९ रोजी पहाटे ०१:३२ ते पहाटे ०४:३० असा आहे. प्रथेप्रमाणे ग्रहण काळात दर्शन, आरती इ.कार्यक्रम बंद ठेऊन संस्थान पुजा-यांमार्फत मंत्रोच्चार करण्यात येतो. यावर्षी ग्रहण कालावधीत श्रीगुरुपौर्णिमेचा मुख्य दिवस आलेला आहे. त्यामुळे ग्रहणकाळात खालील प्रमाणे कार्यक्रम घेता येतील.

१) रात्रभर मंदिर खुले ठेवल्यास पहाटे ०१:२५ वाजता दर्शन बंद होईल. पहाटे ०१:३२ ते ०४:३० वाजता मंत्रोपच्चार होईल.पहाटे ०४:४५ वाजता श्रींचे स्नान होऊन शिरडी माझे पंढरपुर आरती होईल. पहाटे ०४:५५ वाजता भक्तांसाठी दर्शन सुरु होईल.
(संस्थान प्रथेप्रमाणे शेजारतीनंतर व काकड आरतीपूर्वी आलेले ग्रहण पाळले जात नाही. )
किंवा

२) त्याचप्रमाणे समाधी मंदिर बंद केल्यास काकडआरती पहाटे ०५:१५ वाजता सुरु करता येईल. असे मत पुजारी यांनी लेखी स्वरुपात कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय- यापूर्वी मा.व्यवस्थापन समिती सभा दि. ०२/०५/२०१८ विषय क्रं. ३३ दि. २७ जुलै,२०१८ चे रात्रौ खग्रास चंद्रग्रहण असलेमुळे मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात बदल करणे तसेच दि. २८/०७/२०१८ रोजी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवणे बाबत- अ) प्रमाणे श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचे मुख्य दिवशी दि. २७/०७/२०१८ चे रात्रीसमाधी मंदिर उघडले ठेवल्यास दर्शन पुर्णपणे बंद ठेवून मंत्र पठण (मत्रोपच्चार) करणे. मुख्य दिवशी दर्शन बंद असलेने मंदिर बंद ठेवणेबात निर्णय व्हावा. ब) प्रमाणे श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाचे सांगता दिवशी (दि. २८/०७/२०१८) श्रींचे दर्शनासाठी समाधी मंदिर रात्रभर उघडे ठेवणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. मा.व्यवस्थापन समितीने निर्णय क्रं. ३१९ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि. २७ जुलै, २०१८ खग्रास चंद्रग्रहण असल्यामुळे मंदिराचे दैनंदिन कार्यक्रमात प्रस्तावात नमूद केलेल्या अ व ब प्रमाणे बदल करणेस मान्यता देण्यात यावी, असे ठरले. तसेच उत्सवाचे मुख्य दिवशी होणा-या कलाकार हजेरीचे कार्यक्रम दि. २८/०७/२०१८ रोजी मंदिर रात्रभर उघडे राहणार असल्याने त्यादिवशी आयोजित करावेअसे ठरले. सदर निर्णयाच्या अनुषंगाने विभागाने श्रीगुरुपौर्णिमा उत्सवाच्या मुख्य दिवशी रात्री शेजारती करुन मंदिर बंद केले होते व सांगता दिनी सकाळी ०४:३० वाजता काकडआरती केली होती. तसेच सांगतादिनी दि.२८/०७/२०१८ रोजी गर्दीचे प्रमाण अत्यल्प असलेने रात्रो २२.३० वा. शेजारती करुन मंदिर बंद करण्यात आले होते.

प्रस्ताव - तरी अ) दि.१६/०७/२०१९ रोजी रात्रभर मंदिर खुले ठेवल्यास पहाटे ०१:२५ वाजता दर्शन बंद होईल. पहाटे ०१:३२ ते ०४:३० वाजता मंत्रोपच्चार होईल. पहाटे ०४:४५ वाजता श्रींचे स्नान होऊन शिरडी माझे पंढरपुर आरती होईल. पहाटे ०४:५५ वाजता भक्तांसाठी दर्शन सुरु करता येईल.

किंवा

ब) दि. १६/०७/२०१९ रोजी समाधी मंदिर बंद केल्यास दि. १७/०७/२०१९ रोजी काकड आरती पहाटे ०५:१५ वाजता सुरु करता येईल असे नम्र मत आहे.

तरी 'अ' किंवा 'ब' मध्ये नमूद केलेले पर्यायांबाबतनिर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१६ जुलै,२०१९ रोजी गुरुपोर्णीमा उत्सवाचे मुख्य दिवशी पहाटे ०१:३२ ते ०४:३० या काळात खंडग्रास चंद्रग्रहण आलेले असल्याने शेजारती रात्रौ.१२.०० वाजता ठेवावी व शेजारती नंतर मंदिर बंद करण्यात यावे. दि.१७ जुलै, २०१९ रोजी काकड आरती पहाटे ०५.१५ वाजता सुरु करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- मंदिर विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग/संरक्षण विभाग/जनसंपर्क विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **शताब्दी महोत्सव संपला असल्याने व्हिडीओ डॉक्युमेन्टरीचे चित्रीकरणाबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ मधील ३५७ – (ठ). श्री साईबाबांचे जिवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील.

मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.– १) दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. १४, निर्णय क्र. ४५४.

२) दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ६, निर्णय क्र. ४५४.

प्रस्तावना - श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षातील कार्यक्रमांची व्हिडीओ डॉक्युमेन्टरी करणेकामीचे प्रस्तावावर दि.३०/०६/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.४५४ अन्वये सविस्तर चर्चा होवुन, "श्रीं चे साईबाबांचे समाधीचे शताब्दी महोत्सव ०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत Video Documentry चे चित्रीकरण तयार करणेकामी विहीत पद्धतीने ई-निवीदा प्रक्रीया

राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.१,२५,००,०००/- + GST मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे शताब्दी कालावधीतील सर्व उत्सव सोहळे, सांस्कृतीक कार्यक्रम तसेच संस्थानतर्फे राबविणेत आलेले विविध उपक्रम यांची माहिती पुस्तक स्वरुपात प्रसिद्ध करावी, असे ठरले त्यासाठी विहीत पद्धतीने निवीदा प्रक्रीया राबविण्यास व त्यासाठी येणा-या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली."

परंतु, तदनंतर पुनश्चः उपरोक्त निर्णयाऐवजी दि.२६/०७/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र. ६, निर्णय क्र. ४५४, सदर प्रस्तावावर फेर सविस्तर चर्चा होवुन, " समिती सदस्य मा.ॲड. मोहन जयकर यांचे चिरंजीव श्री सिद्धार्थ जयकर हे समाधीचे शताब्दी महोत्सव दि.१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत संस्थानतर्फे राबविणेत आलेल्या विविध कार्यक्रमाची व उपक्रमाची Video Documentry मोफत करुन देणार आहेत. त्यासाठी काही उपकरणे व साहित्य भाडयाने घ्यावे लागल्यास त्याचे भाडे भरण्याची जबाबदारी मा. समिती सदस्य ॲड. मोहन जयकर यांनी स्विकारली. तसेच Video चित्रीकरणासाठी येणा-या कर्मचा-यांची येण्या-जाण्याची व्यवस्था, निवासाची व भोजनाची व्यवस्था मोफत करावी, असे ठरले.

शताब्दी कालावधीचे १०० ते १२० पानांचे कॉफी टेबल बुक समिती सदस्य मा.ॲड. मोहन जयकर हे देणगी स्वरुपात करुन घेणार आहेत, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर कॉफी टेबलच्या बुकच्या आवश्यक तेवढया प्रती विहीत पद्धतीने छपाई करण्यास व त्यासाठी येणा-या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, श्रीं चे साईबाबांचे समाधीचे शताब्दी महोत्सव वर्षभरातील साजरे केले जाणारे कार्यक्रमाचे Video Documentry श्री सिद्धार्थ जयकर यांचेकडुन करुन घेणेकामी मा.व्यवस्थापन समिती सदस्य ॲड.मोहन जयकर सो. यांना दि.०३/०९/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन, सदरकामी मा. व्यवस्थापन समिती सदस्य ॲड.मोहन जयकर सो. व त्यांचे चिरंजीव व त्यांचे सहका-यांसमवेत शिर्डी येथे येवुन पहाणी करुन गेलेले आहे.

तथापी, मंदिर विभागाकडुन प्राप्त झालेल्या संदेशानुसार मा. व्यवस्थापन समिती सदस्य ॲड.मोहन जयकर सो. यांचेशी दुरध्वनीद्वारे चर्चा केली असता, त्यांचे संबंधीत प्रतिनीधी सदर Video Documentry कामी श्री साईबाबांचे आरतीचे पुर्ण दिवस चित्रीकरण आवश्यक असल्याकारणाने सदर आरतींचे चित्रीकरण करणेकामी दि.२१/०१/२०१९ व दि.२३/०१/२०१९ रोजी शिर्डी येथे येणार असलेचे तरी, उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समिती सदस्य ॲड.मोहन जयकर सो. यांचे संबंधीत प्रतिनीधी सदर Video Documentry चे चित्रीकरण करणेकामी दि.२१/०१/२०१९ व दि.२३/०१/२०१९ रोजी शिर्डी येथे येणार असल्याचे दि.१६/०१/२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे कळविले होते.

त्यानुसार दि.१७/०१/२०१९ रोजीचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी "A" आरतीबाबत Chairman, Management Board यांनी फक्त Videography साठी बोलले त्यासाठी पत्र द्यायची गरज नाही. "B" मान्य पण आता Documentry करणे उपयुक्त आहेत का ? Committee ला परत ठेवा. शताब्दी संपली आता Documentry चा उपयोग आहेत का? असे निर्देशित केले आहे. त्यानुसार मा.विश्वस्त ॲड.श्री जयकर सो. यांचेशी चर्चा झाली असता, त्यांचे संबंधीत प्रतिनीधी हे दि.२१/०१/२०१९ ते दि.२३/०१/२०१९ या कालावधीत शिर्डी येथे येवुन श्रींचे समाधी मंदिरातील आरतीचे व्हिडीओग्राफी करणार आहे.

तरी, उपरोक्त मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचे निर्देशास अनुसरुन, शताब्दी महोत्सव संपला असलेकारणाने Video Documentry करणेबाबतचे उपयुक्तता व त्याची आवश्यकता यावर निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

विभागाचा अभिप्राय– उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेनुसार शताब्दी महोत्सव संपला असलेकारणाने Video Documentry करणेबाबतचे उपयुक्तता व त्याची आवश्यकता यावर निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

विभागाचा प्रस्ताव- उपरोक्त प्रस्तावनेत व विभागाचा अभिप्रायात नमुद केलेनुसार शताब्दी महोत्सव संपला असलेकारणाने Video Documentry करणेबाबतचे उपयुक्तता व त्याची आवश्यकता यावर निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.८४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी महोत्सव संपलेला असला तरीही संस्थानतर्फे साजरे केले जाणारे विविध उत्सव तसेच संस्थानचे विविध उपक्रम व मंदिरातील आरत्या यांची Video Documentry असणे योग्य राहील असे समिती सदस्यांचे मत झाल्याने मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६१(६) अन्वये ठरविण्यात आल्याप्रमाणे Video Documentry करावी असे ठरले.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१२** **“श्री रामनवमी उत्सव २०१९” मध्ये दि.१२.०४.२०१९ ते दि.१४.०४.२०१९ अखेर श्री साई मंदिर, मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणेस व येणाऱ्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

२१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

(ख) रुढीनुसार व प्रथेनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे ;

(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनसाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

वरील अधिनियम २१ (१) (ख) व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत रामनवमी उत्सवात, श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात ह्या दोन्ही उत्सवात ०३ दिवस संपुर्ण मंदिर व परिसरात विद्युत रोषणाई केली जाते.

श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव या दोन्ही उत्सवात विद्युत रोषणाई व देखावा उभा करण्यासाठी (ट्रान्सपोर्ट + मटेरियल भाडे + भाडोत्री जनसेट + इंधन वगैरे ) प्रत्येक उत्सवात मिळून रु. ८ ते ९ लाख खर्च संस्थानमार्फत केला जातो. परंतु उत्सवात उभारण्यात येणा-या देखाव्यासाठी यापेक्षा जास्त खर्च येत असतो व त्याचा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: सहन करत असतात.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी आता दि.०१-०१-२०१९, दि.२३-०१-२०१९ व दि.२४-०१-२०१९ रोजी अशी तीन पत्रे संस्थानकडे सादर केली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

दि.०१-०१-२०१९ रोजीचे पत्र.

विषय :- श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांच्या पत्त्यातील बदलाची नोंद घेणेबाबत . . . .

मा.महोदया,

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचे संस्थापक, संचालक, श्री.शशिकांत एकनाथ दळवी यांचे दि.२८-०६-२०१७ रोजी मुंबई येथे अल्पशा आजाराने निधन झालेले होते. तत्पुर्वी गेल्या ४० वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचा संस्थानशी व संस्थानचा श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेशी होणारा सर्व प्रकारचा पत्रव्यवहार श्री.शशिकांत एकनाथ दळवी यांचे पत्त्यावर होत होता.

श्री.शशिकांत दळवी यांचे निधन झालेनंतर श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेशी यापुढील सर्व पत्रव्यवहार हा श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचे दुसरे संस्थापक,संचालक श्री.विलास राजाराम महाडीक यांचे नावावर व पत्त्यावर करण्यात येत होता.

परंतू श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई च्या संचालकांच्या सभेत श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई चे नुतन अध्यक्ष म्हणून श्री.रमेशभाई सेहेटा यांची एक मताने निवड करण्यात येऊन श्री.रमेशभाई सेहेटा यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे दरवर्षी श्री रामनवमी व श्री पुण्यतिथी (दसरा) उत्सवात करण्यात येणा-या विद्युत रोषणाई बाबत व देखाव्या बाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेशी संपर्कात राहून पुढील संपुर्ण जबाबदारी पार पाडावी असे ठरले.

त्यानुसार आपणाला विनंती करण्यात येते की, श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेशी पुढील सर्व प्रकारचा पत्रव्यवहार हा श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचे तिसरे संस्थापक संचालक श्री.रमेशभाई सेहेटा यांचे नावावर व खालील पत्त्यावर करण्यात यावा.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई, व्दारा श्री.रमेशभाई सेहेटा, ८०१/९०१, उर्वशी टेरेस, १४/बी रोड, खार, मुंबई-४०००५२

०२). दि.२४-०१-२०१९ रोजीचे पत्र.

विषय :- “श्री रामनवमी उत्सव-२०१९” विद्युत रोषणाई आणि सजावट करण्याबाबत . . . .

मा.महोदया,

आपण श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये विद्युत रोषणाई व सजावट करण्याच्या निमित्ताने श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी आम्हाला देत आहात, याबद्दल श्री व्दारकामाई मंडळ आपले शतशः ऋणी आहे. प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही, याहीवर्षी विद्युत रोषणाई व सजावट करण्यास येत आहोत.

श्री साईबाबांचे मंदीर आणि संस्थान परिसर इ.ठिकाणी विद्युत रोषणाई व सजावट करण्याकरीता साहित्याची ने-आण करण्याकरीता हूड असलेल्या भाडोत्री ०७ (सात) ट्रक आणि श्री साईबाबा संस्थानचा मोठा

ट्रक तसेच उत्सव काळात ०३ नग भाडोत्री जनसेट (१२५ केव्हीएचे)-०३ दिवसाकरीता संस्थानमार्फत व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत.

मटेरिअल मुंबईहून आणतेवेळी दोन टप्प्यात आणावे लागणार आहे. यासाठी ट्रका पाठविण्यासाठी तपशीलवार तारीख नंतर कळवित आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष साहेब, मा.सर्व विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

०३). दि.२३-०१-२०१९ रोजीचे पत्र.

विषय :- " श्री रामनवमी उत्सव-२०१९" विद्युत रोषणाई आणि सजावट करण्याबाबत....

मा.महोदया,

श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये विद्युत रोषणाई व सजावट करण्याच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही याहीवर्षी विद्युत रोषणाई व सजावट करण्यास येत आहोत.

श्री साईबाबांचे मंदीर आणि संस्थान परिसर इ. ठिकाणी विद्युत रोषणाई व सजावट करण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत खालीलप्रमाणे व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत व लागणा-या खर्चाचा तपशिल देत आहोत.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३० x २३० x २ | १,९७,८००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सीरींज, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह ( रु. ४३० x रु. ४० x २ ) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | ०,३५,०००/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | **५,६७,२००/-** |

(०१) गोल्टे-१४ फूटी ४० नग, १६ फूटी ५० नग, १८ फूटी ४० नग, बांबू- १५ ते १६ फूटाचे१५० नग.

(०२) कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी फक्त १५ खोल्या मिळाव्यात.

(०३) रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरात मिळावा.

(०४) प्रतीवर्षाप्रमाणे सर्व कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय व्हावी.

तसेच वरील रक्कम ही श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक, श्री.सतिष राव यांचे बॅंक खातेवर मिळणेस विनंती. श्री.सतिष राव यांचे बॅंक अकाऊंट डिटेल्स, पॅनकार्ड, आधारकार्ड इत्यादि सोबत जोडलेले आहे.

श्री साईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष साहेब, मा.उपाध्यक्ष साहेब, मा.सर्व विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया, मा.उपजिल्हाधिकारी साहेब, मा.उपकार्यकारी अधिकारी साहेब व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

श्री रामनवमी उत्सव-२०१८ मध्ये तीन दिवसाकरीता विद्युत रोषणाई व उभारण्यात आलेल्या देखावा करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना रक्कम रु. ५,६३,७८०/- इतकी संस्थानमार्फत अदा करण्यात आलेली आहे. तसेच मटेरियल वाहतुकीसाठी प्रती ट्रक रु.३३,०००/- (रु.तेहतीस हजार) मात्र प्रमाणे ८ (आठ) ट्रक्सचे भाडे रु.२,६४,०००/- इतका खर्च आलेला आहे. विद्युत रोषणाईचे विद्युतपुरवठयासाठी १२५ केव्हीएचे ०३ नग

भाडोत्री जनसेटसाठी रक्कम रु. ८८,५००/- इतका खर्च आलेला आहे. उत्सव कालावधीतील डिझेल जनसेट इंधनकामी रक्कम रु. १९,९४७/- इतका खर्च आलेला आहे. श्री रामनवमी उत्सव-२०१८ करीता (विद्युत रोषणाई व देखावा खर्च + मटेरियल वाहतुक खर्च + भाडोत्री जनसेट + इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु. ९,३६,२२७/- झालेला आहे.

प्रत्येक उत्सवाचे खर्चाबाबत प्रशासन शाखेच्या वशी-०५ मार्फत संस्थानच्या सर्व विभागांकडून अपेक्षित खर्चाचा व मागील वर्षी झालेल्या खर्चाचा तपशिल मागवून घेऊन तो एकत्रित करुन वशी-०५ मार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे तो मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला जात असतो.

यावर्षी शताब्दी विभागाकडे (शताब्दी विभागाकडील पत्र क्र.एसएसएस / शताब्दी / ३०६१ / २०१९ दि.१०-०१-२०१९) विद्युत विभागामार्फत दि.११-०१-२०१९ रोजी खालीलप्रमाणे खर्चाचा तपशिल कळविण्यात आला होता.

| अ.क्र. | तपशील | श्री रामनवमी उत्सव-२०१८ साठी अपेक्षित खर्च | श्री रामनवमी उत्सव-२०१८ मध्ये झालेला खर्च | श्री रामनवमी उत्सव-२०१९ साठी अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत रोषणाई | रु. ६,००,०००/- | रु. ५,६३,७८०/- | रु. ७,००,०००/- |
| २ | भाडोत्री जनसेट खर्च + त्यासाठी इंधन खर्च | रु. २,००,०००/- | रु. १,०८,४४७/- | रु. २,००,०००/- |
| ३ | वाहतुक खर्च | रु. २,५०,०००/- | रु. २,६४,०००/- | रु. ३,००,०००/- |
| | एकुण :- | रु. १०,५०,०००/- | रु. ९,३६,२२७/- | रु. १२,००,०००/- |

श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये करावयाच्या विद्युत रोषणाईच्या अंदाजित खर्चाबाबत श्री व्दारकामाई मंडळ यांनी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

**अ) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी श्री रामनवमी उत्सव-२०१९ करीता कळविलेला खर्च :-**

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २३० कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३० x २३० x २ | १,९७,८००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सीरींज, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह ( रु. ४३० x रु. ४० x २ ) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | ०,३५,०००/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | **५,६७,२००/-** |

ब). याव्यतिरिक्त श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केल्याप्रमाणे ०७ नग भाडोत्री ट्रक, १२५ केव्हीए क्षमतेचे ०३ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसाठी लागणारे इंधन, संस्थानचे टेम्पोसाठी मुंबई येथे जाणे व येणेसाठी लागणारे इंधन, टोल व भाडोत्री १३० नग गोल्टे व १५० नग बांबू यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | ७ नग भाडोत्री ट्रकसाठी अपेक्षित खर्च (रु. ३४,०००/- x ७ भाडोत्री ट्रक) | रु. २,३८,०००/- |
| २ | ०३ नग भाडोत्री जनरेटरसाठी अपेक्षित खर्च ३ दिवस (रु. ९,५००/- x ३ दिवस x ३ जनसेट) | रु. ८५,५००/- |
| ३ | भाडोत्री जनरेटरसेट करीता अपेक्षित इंधन खर्च (३ दिवसाकरीता) | रु. २५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | संस्थानचे टेम्पोकरीता मुंबई येथे जाणे व येणेसाठी अपेक्षित इंधन खर्च (प्रति फेरी रु.५,५२५/- x ४ फे-या = रु. २२,१००/-) + टोलचा खर्च (प्रति फेरी रु.५००/- x ४ फे-या = रु. २,०००/-) | रु. २४,१००/- |
| ५ | भाडोत्री गोल्टे व बांबू साठी लागणारा अपेक्षित खर्च (गोल्टे व बांबू संख्या २८० नग x दर रु. २.५० x ३६ दिवस) | रु. २५,२००/- |
| | एकुण अपेक्षित खर्च रक्कम :- | रु. ३,९७,८००/- |

क) संस्थानमार्फत श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना विनामुल्य पुरविणेकामी निवासस्थान, नाष्टा व चहा यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १) | (अ). उत्सवाचे अगोदर साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.२६-०३-२०१९ ते दि.११-०४-२०१९ अखेर २० रुम्स् (२० रुम्स् x१७ दिवस x भाडे रु.१५०/-प्रतिदिन=रु.५१,०००/-)<br>(ब). उत्सव काळात साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.१२-०४-२०१९ ते दि.१६-०४-२०१९ अखेर १५ रुम्स् (१५ रुम्स् x५ दिवस xभाडे रु.१५०/-प्रतिदिन = रु.११,२५०/-) | रु. ६२,२५०/- |
| २) | (अ). दि.२६-०३-२०१९ ते दि.०६-०४-२०१९ अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या १५० x१२ दिवस x दर रु.५/-= रु.९,०००/-/-)<br>(ब). दि.०७-०४-२०१९ ते दि.१६-०४-२०१९ अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या ८० x १० दिवस x दर रु. ५/- =रु.४,०००/-/-) | रु. १३,०००/- |
| ३) | (अ). दि.२६-०३-२०१९ ते दि.०६-०४-२०१९ अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या १५० x १२ दिवस x ०३ वेळा x दर रु. २/- = रु.१०,८००/-)<br>(ब). दि.०७-०४-२०१९ ते दि.१६-०४-२०१९ अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या ८० x १० दिवस x०३ वेळा x दर रु. २/-= रु.४,८००/-) | रु. १५,६००/- |
| | **एकुण अपेक्षित खर्च रक्कम :-** | **रु. ९०,८५०/-** |

श्री रामनवमी उत्सव-२०१९ करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्तप्रमाणे (अ) रक्कम रुपये ५,६७,२००/- + (ब) रक्कम रुपये ३,९७,८००/- (क) रक्कम रु.९०,८५०/- अशी एकुण रक्कम रु. १०,५५,८५०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

संस्थानचा ०१ मोठा ट्रक ०४ वेळेस मुंबई येथे वेगवेगळया दिवशी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणे व पोहोच करणेकामी पाठवावा लागणार आहे. तसेच संस्थानमार्फत देखावा उभारणीकामी गोल्टे १४ फूटी ४० नग, १६ फूटी ५० नग, १८ फूटी ४० नग, बांबू १५ ते १६ फूटाचे १५० नग पुरवावे लागणार आहे. तसेच कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी फक्त १५ खोल्या व रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरामध्ये विनामुल्य मिळावा अशी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केलेली आहे. तसेच प्रतीवर्षाप्रमाणे २३० कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करावी असे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय :- श्री रामनवमी उत्सव-२०१८ मध्ये ०३ दिवसांकरीता (विद्युत रोषणाई+ देखाव्यासाठी लागणारे सर्व साहित्य+मटेरियल वाहतुक + भाडोत्री जनसेट+ भाडोत्री जनसेटसाठी इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु. ९,३६,२२७/- इतका झालेला आहे. श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्येच ३ दिवसांकरीता विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी दि.२३-०१-२०१९ व दि.२४-०१-२०१९ रोजीचे पत्रान्वये खर्चाचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केलेला आहे. सदर उत्सवामध्ये विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) रक्कम रुपये ५,६७,२००/-+ (ब) रक्कम रुपये ३,९७,८००/-(क) रक्कम रु.९०,८५०/-अशी एकुण रक्कम रु.१०,५५,८५०/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

प्रस्ताव:- (०१) श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये दि. १२-०४-२०१९ ते दि.१४-०४-२०१९ अखेर ३ दिवसाकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घ्यावे किंवा कसे ? किंवा विद्युत रोषणाईसाठी बाहेरील लाईटींग डेकोरेटर्स यांचेकडून ई-निविदा बोलवाव्यात किंवा कसे ?

(०२) श्री रामनवमी उत्सव-२०१९ मध्ये विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) रक्कम रुपये ५,६७,२००/- + (ब) रक्कम रुपये ३,९७,८००/- (क) रक्कम रु.९०,८५०/- अशी एकुण रक्कम रु. १०,५५,८५०/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. यावर निर्णय होणेस विनंती.

(०३) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून श्री रामनवमी उत्सव-२०१९ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घ्यावयाचे असल्यास त्यासाठी त्यांनी त्यांचे पत्रात मागणी केलेप्रमाणे ३ दिवसाकरीता ०३ नग भाडोत्री जनसेटकरीता व ७ नग भाडोत्री ट्रक्स करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागवावे किंवा कसे ? यावर निर्णय होणेस विनंती.

(०४) श्री रामनवमी उत्सव-२०१९ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, "श्री रामनवमी उत्सव २०१९" मध्ये दि.१२.०४.२०१९ ते दि.१४.०४.२०१९ अखेर श्री साई मंदिर, मंदिर परिसरात विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१०,५५,८५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **सन २०१९-२० करीता व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामी आऊट सोर्सिंग पध्दतीने दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० अखेर करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटीसाठी बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- ०१) २१चा (१) (ग) साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी / सुविधा पुरविणे. ०२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

प्रस्तावीक:-श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबासंस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत व्दारावती भक्तनिवास विभागातील ३१६ खोल्यामधून साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छतेची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

सन २०१८-१९ या वर्षाकरीता या विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी एम.पी.एन्टरप्रायजेस असोसिएटस् लि,पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-व्दारावतीभक्तनिवास/६४०४/२०१८ दि.२८/०२/२०१८ रोजी दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर कालावधीसाठी खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात आला होता.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य संख्या | दरमहा सर्व करांसह रक्कम रु. | वर्षाला सर्व करांसह रुपये |
|---|---|---|---|---|
| ७६ | ०८ | ४३ | ८,७७,४४२/- | १,०५,२९,३०६/- |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे एम.पी.एन्टरप्रायजेस असोसिएट्स लि,पुणे यांनी कार्यादेशानुसार सदर कामाचा करारनामा करुन दिलेला आहे.

मात्र एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि.पुणे यांनी कार्यादेशातील व करारनाम्यातील अटी शर्तीनुसार काम समाधानकारक न केल्याने त्यांना देण्यात आलेला कार्यादेश मा.व्यवस्थापन समिती दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२४ निर्णय क्र.६३६ नुसार आऊटसोर्स कामाचा ठेका रद्द करुन, त्यांची संस्थानकडे जमा असलेली ५% सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन घेण्यात आली व त्यांचा काळ्या यादीत समावेश करण्यात आला, विभागातील हाऊसकिपींग कामाकरीता तातडीने विहीत पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदार निश्चित होईपावेतो संस्थानच्या इतर विभागात कार्यरत ठेकेदाराकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिंग/स्वच्छता कामे करुन घ्यावे असे ठरले.
त्यानुसार दरपत्रके मागवून खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली.

| अ.नं | कंपनीचे नाव | दरमहा GSTवगळून रक्कम रु. | वार्षिक GST वगळून रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे | ११,५३,२२७ | १३,६०,८०८ |
| ०२ | स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस मुंबई | १०,६५,००० | १२,५६,७०० |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस मुंबई यांचे दर निम्नतम आहेत. परंतुसदरचेदरहेएकवर्षकालावधीसाठीदिलेलेअसल्यानेतीनमहिनेकालावधीसाठीकामकरणेसत्यांनीअसमर्थतादर्शविल्यानेबी.व्ही.जी.इंडिया लि,पुणेयांनाया विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामाचा दि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१९ अखेर कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आला.

सन २०१९-२० या वर्षाकरीता नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस कालावधी लागणार असल्याने तसेच बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना देण्यात आलेला कार्यादेशाची मुदत दि.३१/१२/२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने, मा.व्यवस्थापन समिति दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८३ अन्वये बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रमभक्तनिवास/४८४५/२०१८ दि.०१/०१/२०१९ नुसार उपरोक्त कार्यादेशातील अटी शर्तीस अधिन राहून नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपावेतो आहे त्याच मंजूर दरात दि.०१/०१/२०१९ पासून मुदतवाढ कार्यादेश देण्यात आला.

या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन घेणेकामी नव्याने सन २०१९-२०या वर्षामधील दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रत ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०३/०१/२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्रशासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०१/०१/२०१९ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास त्याचे निरसन करणेकामी दि.०८/०१/२०१९ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगसाठी उपस्थितीत एकाही निविदाधारकास निविदेसंदर्भात अडचण/शंका नव्हती सदर ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.१८/०१/२०१९ अखेर होती.

सदर ई-निविदा प्रक्रियेमध्ये मुदतीत आठनिविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या.ऑनलाईन प्राप्ततांत्रिक बीड(Technical Bid)दि.२२/०१/२०१९ रोजीचे खरेदी समिति सभे समोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| 1 | BVG India LTD,Pune | 100 | पात्र |
| 2 | SMS IntigratedSservicesPVT LTD, Mumbai | 90 | पात्र |
| 3 | Updater Services PVT LTD, Chennai | 95 | पात्र |
| 4 | RajnishConsultancy PVT LTD, Mumbai | 80 | पात्र |
| 5 | Golden Hospitality Services, PVT LTD, Mumbai | 70 | पात्र |
| 6 | Spick-n-Span Services, Mumbai | 90 | पात्र |
| 7 | RajdeepEnterprices,GandhinagarGujarat | 75 | पात्र |
| 8 | Sons House, Thane | 45 | अपात्र |

मागणी:-उपरोक्त पात्र सातनिविदाधारकांचे दि.२९/०१/२०१९ रोजीचे खरेदी समिति सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आलेअसून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | GST वगळून वार्षिक दररु. | 18 % GST | GST वगळून वार्षिक दर रु. | स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Spick-n-Span Services, Mumbai** | **१,१९,९६,७६०.००** | **२१,५९,४१२.००** | **१,४१,५६,१७२.००** | L1 |
| 2 | BVG India LTD,Pune | १,३८,१२,०००.०० | २४,८६,१६०.०० | १,६२,९८,१६०.०० | L2 |
| 3 | RajdeepEnterprices,GandhinagarGujarat | १,४७,८३,०४०.०० | २६,६०,९४६.४८ | १,७४,४३,९८६.४८ | L3 |
| 4 | Updater Services PVT LTD, Chennai | १,५८,११,२९६.०० | २८,४६,०३३.२८ | १,८६,५७,३२९.२८ | L4 |
| 5 | SMS IntigratedSservicesPVT LTD, Mumbai | १,६३,२९,८०४.०० | २९,३९,३६४.७२ | १,९२,६९,१६८.७२ | L5 |
| 6 | RajnishConsultancy PVT LTD, Mumbai | १,६६,८०,०००.०० | ३०,०२,४००.०० | १,९६,८२,४००.०० | L6 |
| 7 | Golden Hospitality Services, PVT LTD, Mumbai | १,९३,९५,७८०.०० | २२,२८,४००.०० | २,१६,२४,१८०.०० | L7 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं.१, स्पिक-एन-स्पॅन, सर्व्हिसेस, मुंबई हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत आहे.सदर निविदाधारक यांना मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चावाटाघाटीसाठी बोलवून व त्यानुसार कार्यादेश पारीत करणेत येईल.

विभागांचा अभिप्राय/स्पष्ट मत:- सन२०१९-२० (दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्षाकरीता) या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडून फक्त मुळ दर मागविणेत आले होते तसेच GST चे दर स्वतंत्र मागविणेत आलेले आहेत. त्यानुसारपात्र सातनिविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid) खरेदी समिती दि.२९/०१/२०१९ रोजीचे सभेत उघडून, त्यामध्येअ.नं.१स्पिक-एन-स्पॅन, सर्व्हिसेस, मुंबई यांचे निम्नतम दर खालील कोष्टकात नमुद प्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

| अ .नं | निविदाधारकाचे नाव | GST वगळुन दरमहा रक्कम रु. | 18 % GST | **GST सह दरमहा रक्कम रु.** | GST वगळुन वार्षिक रक्कम रु. | 18 % GST | **GST सह वार्षिक रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्पिक-एन-स्पॅन, सर्व्हिसेस, मुंबई | ९,९९,७३०/- | १,७९,९५१/- | **११,७९,६८१/-** | १,१९,९६,७६०/- | २१,५९,४१२/- | **१,४१,५६,१७२/-** |

निम्नतम दरधारक स्पिक-एन-स्पॅन, सर्व्हिसेस, मुंबई यांना मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेसव हाऊसकिपींग कामाचा सन२०१९-२० मधील दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्षाकरीता कार्यादेश देणेस तसेच GST नुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.८६** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक स्पिक-एन-स्पॅन, सर्व्हिसेस, मुंबई हे आजचे सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित होते, व्यवस्थापन समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० करीता व्दारावती भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग / स्वच्छता कामी आऊट सोर्सिंग पध्दतीने दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० अखेर करुन घेणेकामी निम्नतम निविदाधारक स्पिक-एन-स्पॅन, सर्व्हिसेस, मुंबई यांचे GST सह वार्षिक रक्कम रु.१,४१,५६,१७२/- निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**ई-निविदेमध्ये कालावधी दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० नमुद केलेला आहे. तथापी निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असल्याने स्पिक-एन-स्पॅन, सर्व्हिसेस, मुंबई यांना दि.१.२.२०१९ ते २९.०२.२०२० या कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- व्दारावती भक्तनिवास)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१४** **सन २०१९-२० करीता साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० अखेर करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटीसाठी बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम२००४मधीलतरतुद:-०१)२१चा (१) (ग) साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी /सुविधा पुरविणे.०२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

प्रस्तावीक:- श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत साई धर्मशाळा विभागात एकुण ४ इमारती आहेत. एका इमारतीत ३२ हॉल याप्रमाणे एकुण १२८ हॉल निवासासाठी कार्यरत आहे. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकराणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींगइ.मेन्टनन्स/स्वच्छतेची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

सन २०१८-१९ या वर्षाकरीता या विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ. मेन्टनन्स/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी एम.पी.एन्टरप्रायजेस असोसिएटस् लि,पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-साई धर्मशाळा /६४०६/२०१८ दि.२८/०२/२०१८ रोजी दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर कालावधीसाठी खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात आला होता.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | विभाग | उपकरणे | दरमहा सर्व करांसह रक्कम रु. | वर्षाला सर्व करांसह रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| २३१ | ४२ | ६६ | विद्युत | २१ | २४,९८,२५७/- | २,९९,७९,०८८/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पाणी पुरवठा (प्लंबींग) बांधकाम (सुतारी/गवंडी) | १०९ ११६ | | |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे एम.पी.एन्टरप्रायजेस असोसिएटस् लि,पुणे यांनी कार्यादेशानुसार सदर कामाचा करारनामा करुन दिलेला आहे.

मात्र एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि.पुणे यांनी कार्यादेशातील व करारनाम्यातील अटी शर्तीनुसार काम समाधानकारक न केल्याने त्यांना देण्यात आलेला कार्यादेश मा.व्यवस्थापन समिती दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२४ निर्णय क्र.६३६ नुसार आऊटसोर्स कामा ठेका रद्द करुन, त्यांची संस्थानकडे जमा असलेली ५% सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन घेण्यात आली व त्यांचा काळ्या यादीत समावेश करण्यात आला, विभागातील हाऊसकिपींग कामाकरीता तातडीने विहीत पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदार निश्चित होईपावेतो संस्थानच्या इतर विभागात कार्यरत ठेकेदाराकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकींग,विद्युत,प्लंबींग इ.मेन्टनेन्स/स्वच्छता इ. कामे करुन घ्यावे असे ठरले.

त्यानुसार दरपत्रके मागवून खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली.

| अ.नं | कंपनीचे नाव | दरमहा GSTवगळून रक्कम रु. | GST सह रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे | ३४,७१,१७०/- | ४०,९५,९८०.६० |
| ०२ | स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस मुंबई | ३७,१५,०००/- | ४३,८३,७००/- |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबीग इ.मेन्टनेन्स/स्वच्छता कामाचा दि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१८ अखेर कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आला.

सन २०१९-२० या वर्षाकरीता नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस कालावधी लागणार असल्याने तसेच बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना देण्यात आलेला कार्यादेशाची मुदत दि.३१/१२/२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने, मा.व्यवस्थापन समिती दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८३ अन्वये बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/४८४५/२०१८ दि.०१/०१/२०१९ नुसार उपरोक्त कार्यादेशातील अटी शर्तीस अधिन राहून नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपावेतो आहे त्याच मंजूर दरात दि.०१/०१/२०१९ पासून मुदतवाढ कार्यादेश देण्यात आला.

या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन घेणेकामी नव्याने सन २०१९-२० या वर्षामधील दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रत ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०३/०१/२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्रशासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०१/०१/२०१९ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास त्याचे निरसन करणेकामी दि.०८/०१/२०१९ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगसाठी उपस्थित एकाही निविदाधारकास निविदेसंदर्भात अडचण/शंका नव्हती सदर ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.१८/०१/२०१९ अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत सात निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड(Technical Bid) दि.२२/०१/२०१९ रोजीचे खरेदी समिती सभे समोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| 1 | BVG INDIA LTD,PUNE | 100 | **पात्र** |
| 2 | GOLDEN HOSPITALITY SERVICES PVT., Ltd, MUMBAI | 65 | **पात्र** |
| 3 | RAJANISH CONSULTANCY PVT LTD,. THANE (w) | 55 | अपात्र |
| 4 | SMS INTEGRATED SERVICES, MUMBAI | 95 | **पात्र** |
| 5 | SPICK-N-SPAN SERVICES, MUMBAI | 80 | **पात्र** |
| 6 | UPDATER SERVICES, CHENNAI | 95 | **पात्र** |
| 7 | VANTAGE DETECTIVE AND SAFETY PVT,.LTD,. NOIDA | 35 | अपात्र |

मागणी:-उपरोक्त पात्र पाचही निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial Bid) दि.२९/०१/२०१९ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर उघडण्यात आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | GST वगळून वार्षिक दर | १८ % GST | GST सह वार्षिक दर | स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **BVG INDIA LTD,PUNE** | **३,३६,१२,०००/-** | **६०,५०,१६०/-** | **३,९६,६२,१६०/-** | L१ |
| 2 | SPICK-N-SPAN SERVICES, MUMBAI | ४,२२,५०,१५२/- | ७६,०५,०२४/- | ४,९८,५५,१७६/- | L४ |
| 3 | UPDATER SERVICES, CHENNAI | ४,१०,३५,७१६/- | ७३,८६,४२८.८८ | ४,८४,२२,१४४.८८ | L3 |
| 4 | SMS INTEGRATED SERVICES, MUMBAI | ४,०९,०८,७८०/- | ७३,६३,५८०.४० | ४,८२,७२,३६०.४० | L2 |
| 5 | GOLDEN HOSPITALITY SERVICES PVT., Ltd, MUMBAI | ४,८०,२६,०७६/- | ७३,६,०२४८/- | ५,५३,८६,३२४/- | L5 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं. १ मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे हे निम्नतम दरधारक (L-1) ठरत आहे.

सदर निविदाधारक यांना मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटीसाठी बोलवून व त्यानुसार कार्यादेश पारीत करणेत येईल.

विभागांचाअभिप्राय/स्पष्ट मत:- सन २०१९-२० (दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्षाकरीता) या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडून फक्त मुळ दर मागविणेत आलेले आहेत. तसेच GST चे दर स्वतंत्र मागविणेत आलेले आहेत. त्यानुसार पात्र पाच निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid) खरेदी समिती दि.२९/०१/२०१९ रोजी सभेत उघडून, त्यामध्ये अ.नं. १ मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे यांचे निम्नतम वार्षिक दर खालील कोष्ठकात नमुद प्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं | तपशील | GST वगळुन दरमहा रक्कम रुपये | १८ % GST दरमहा रक्कम | **GST सह दरमहा रक्कम रुपये** | GST वगळुन वार्षिक रक्कम रुपये | १८ % GST वार्षिक रक्कम | **GST सह वार्षिक रक्कम रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे | २८,०१,०००/- | ५,०४,१८०/- | ३३,०५१,८०/- | ३,३६,१२०००/- | ६०,५०,१६०/- | **३,९६,६२,१६०/-** |

निम्नतम दरधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांना मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेस व हाऊसकिपींग कामाचा सन २०१९-२० मधील दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्षा करीता कार्यादेश देणेस तसेच GST नुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.८७** **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे हे आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. व्यवस्थापन समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० करीता साई धर्मशाळा विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० अखेर करुन घेणेकामी निम्नतम निविदाधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांचे GST सह वार्षिक रक्कम रु.३,९६,६२,१६०/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**ई-निविदेमध्ये कालावधी दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० नमुद केलेला आहे. तथापी निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असल्याने मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांना दि.१.२.२०१९ ते २९.०२.२०२० या कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- साई धर्मशाळा)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१५** **सन २०१९-२० करीता साई आश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० अखेर करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा वाटाघाटीसाठी बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम२००४मधीलतरतुद:-०१)२१चा (१) (ग) साईभक्तांना मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी / सुविधा पुरविणे. ०२) (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्या करीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे.

प्रस्तावीक:- श्रींचे दर्शनासाठी राज्यभरातून, देशभरातून, देश-विदेशातून येणा-या साईभक्तांचे निवासाचे सोयीसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ खोल्यामधून साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. विभागातील निवासी साईभक्तांना अधिकाधिक चांगली सेवा सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकराणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबींगइ.मेन्टनन्स/स्वच्छतेची कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जातात.

सन २०१८-१९ या वर्षाकरीता या विभागातील यांत्रिकीरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबींग इ.मेन्टनन्स/स्वच्छता कामे आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी एम.पी.एन्टरप्रायजेस असोसिएटस् लि,पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/६४०५/२०१८ दि.२८/०२/२०१८ रोजी दि.०१/०३/२०१८ ते दि.२८/०२/२०१९ अखेर कालावधीसाठी खालीलप्रमाणे कार्यादेश देण्यात आला होता.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | विभाग | उपकरणे | दरमहा सर्व करांसह रक्कम रु. | वर्षाला सर्व करांसह रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३६ | ७८ | १६१ | विद्युत<br>पाणी पुरवठा (प्लंबींग)<br>बांधकाम (सुतारी/गवंडी) | २५<br>१३८<br>१५४ | ६०,६२,३५७/- | ७,२७,४८,२८४/- |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे एम.पी.एन्टरप्रायजेस असोसिएटस् लि,पुणे यांनी कार्यादेशानुसार सदर कामाचा करारनामा करुन दिलेला आहे.

मात्र एम.पी.एन्टरप्रायजेस ॲण्ड असो.लि.पुणे यांनी कार्यादेशातील व करारनाम्यातील अटी शर्तीनुसार काम समाधानकारक न केल्याने त्यांना देण्यात आलेला कार्यादेश मा.व्यवस्थापन समिती दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.२४ निर्णय क्र.६३६ नुसार आऊटसोर्स कामा ठेका रद्द करुन, त्यांची संस्थानकडे जमा असलेली ५% सुरक्षा अनामत रक्कम जप्त करुन घेण्यात आली व त्यांचा काळया यादीत समावेश करण्यात आला, विभागातील हाऊसकिपींग कामाकरीता तातडीने विहीत पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या योग्य त्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन नविन ठेकेदार निश्चित होईपावेतो संस्थानच्या इतर विभागात कार्यरत ठेकेदाराकडून दरपत्रके मागवून निम्नतम दरधारकाकडून विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकींग,विद्युत,प्लंबींग इ.मेंन्टनेन्स/स्वच्छता इ. कामे करुन घ्यावे असे ठरले.

त्यानुसार दरपत्रके मागवून खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झाली.

| अ.नं | कंपनीचे नाव | दरमहा GSTवगळून रक्कम रु. | वार्षिक GST वगळून रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१ | बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे | ८०,९३,०६८ | ९,७१,१६,८१६ |
| ०२ | स्पिक एन स्पॅन सर्व्हिसेस मुंबई | ९३,८९,२०० | ११,२६,७०,४०० |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांचे दर निम्नतम असल्याने त्यांना या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग विद्युत, प्लंबीग इ.मेन्टनेन्स/स्वच्छता कामाचा दि.१५/१०/२०१८ ते दि.३१/१२/२०१९ अखेर कालावधीसाठी कार्यादेश देण्यात आला.

सन २०१९-२० या वर्षाकरीता नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस कालावधी लागणार असल्याने तसेच बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना देण्यात आलेला कार्यादेशाची मुदत दि.३१/१२/२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने, मा.व्यवस्थापन समिती दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८३ अन्वये बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/४८४५/२०१८ दि.०१/०१/२०१९ नुसार उपरोक्त कार्यादेशातील अटी शर्तीस अधिन राहून न्व्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपावेतो आहे त्याच मंजूर दरात दि.०१/०१/२०१९ पासून मुदतवाढ कार्यादेश देण्यात आला.

या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन घेणेकामी नव्याने सन २०१९-२०या वर्षामधील दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्ष कालावधीसाठी वर्तमानपत्रत ई-निविदा सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि.०३/०१/२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्रशासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि.०१/०१/२०१९ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांनी निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यासत्याचे निरसन करणेकामी दि.०८/०१/२०१९ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगसाठी उपस्थितीत एकाही निविदाधारकास निविदेसंदर्भात अडचण/शंका नव्हती सदर ई-निविदा ऑनलाईन अपलोड करण्याची अंतीम मुदत दि.१८/०१/२०१९ अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत पाच निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या.ऑनलाईन प्राप्ततांत्रिक बीड(Technical Bid)दि.२२/०१/२०१९ रोजीचे खरेदी समिती सभे समोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडून तपासून घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र/अपात्र निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | मिळालेले गुण | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|
| 1 | BVG INDIA LTD,PUNE | 100 | पात्र |
| 2 | CIS BUREAUS FACILTY SERVICES, MUMBAI | 60 | पात्र |
| 3 | SMS INTEGRATED SERVICES, MUMBAI | 85 | पात्र |
| 4 | SPICK-N-SPAN SERVICES, MUMBAI | 85 | पात्र |
| 5 | UPDATER SERVICES, CHENNAI | 85 | पात्र |

मागणी:- उपरोक्त पात्र पाचही निविदाधारकांचे दि.२९/०१/२०१९ रोजीचे खरेदी समिती सभेसमोर वाणिज्यिक बीड (Financial Bid) उघडण्यात आलेअसून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | GST वगळून वार्षिक दर | १८%GST | GST सह वार्षिक दर | स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| 1 | BVG INDIA LTD,PUNE | ८,३३,५२,०००/- | १,५०,०३,३६०/- | ९,८३,५५,३६०/- | L-1 |
| 2 | SPICK-N-SPAN SERVICES,MUMBAI | १०,०१,८२,६३६/- | १,८०,३२,८८०/- | ११,८२,१५,५१६/- | L-2 |
| 3 | UPDATER SERVICES, CHENNAI | १०,०७,५८,३३६/- | १,८१,३६,५००.४८ | ११,८८,९४,८३६.४८ | L-3 |
| 4 | SMS INTEGRATED SERVICES,MUM | १०,१७,०२,४००/- | १,८३,०६,४३२/- | १२,००,०८,८३२/- | L-4 |
| 5 | CIS BUREAUS FACILTY SERVICES,MUMBAI | ११९,०८,७४,२२८/- | -- | ११९,०८,७४,२२८/- | L-5 |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं.०१ बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणेहे निम्नतम दरधारक (L-1) ठरत आहे. सदर ठेकेदार यांना मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चावाटाघाटीसाठी बोलवून व त्यानुसार कार्यादेश पारीत करणेत येईल.

विभागांचा अभिप्राय/स्पष्ट मत:- सन २०१९-२० (दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्षाकरीता) या विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीचे कामे कामाचे स्वरुप निश्चित करुन ठोक पध्दतीने करुन घेणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडून फक्त मुळ दर मागविणेत आले होते तसेच GSTचे दर स्वतंत्र मागविणेत आलेले आहेत. त्यानुसार पात्र पाच निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial bid) खरेदी समिती दि.२९/०१/२०१९ रोजीचे सभेत उघडून, त्यामध्ये अ.नं.०१ बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांचे निम्नतम दर खालील कोष्टकात नमुद प्रमाणे प्राप्त झालेले आहेत.

| अ.नं | निविदाधारकांचे नांव | GST वगळून दरमहा रककम रु. | १८%GST | **GST सह दरमहा रककम रुपये** | GST वगळून वार्षिक रक्कम रु. | १८%GST | **GST सह वार्षिक रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे | ६९,४६,०००/- | १२,५०,२८०/- | **८१,९६,२८०/-** | ८,३३,५२,०००/- | १,५०,०३,३६०/- | **९,८३,५५,३६०/-** |

निम्नतम दरधारक बी.व्ही.जी.इंडिया लि,पुणे यांना मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेसव हाऊसकिपींग कामाचा सन२०१९-२० मधील दि.०१/०३/२०१९ ते दि.२९/०२/२०२० अखेर एक वर्षाकरीता कार्यादेश देणेस तसेच GST नुसार येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.८८ प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे हे आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. व्यवस्थापन समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सन २०१९-२० करीता साई आश्रम भक्तनिवास विभागातील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता दुरुस्ती व देखभालीची कामे आऊट सोर्सिंग पध्दतीने दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० अखेर करुन घेणेकामी निम्नतम निविदाधारक मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांचे GST सह वार्षिक रक्कम ९,८३,५५,३६०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

ई-निविदेमध्ये कालावधी दि.१.३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० नमुद केलेला आहे. तथापी निविदा प्रक्रिया पुर्ण झालेली असल्याने मे.बी.व्ही.जी.इंडिया लि. पुणे यांना दि.१.२.२०१९ ते २९.०२.२०२० या कालावधीसाठी कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०१८ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८४,१०,०८२/- ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे डिसेंबर२०१८ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १३,३४७ व १,००२ आयपीडी रुग्णांपैकी २,८७६ ओपीडी व ५८२ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.७८,६१,६३२/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्यासंबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण ३४१ रुग्णाना रक्कम रु.५,४८,४५०/- इतकी मोफत/ सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११७ | ११,५३,९३२/- | - | ११,५३,९३२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १८१ | २२,८३,४७८/- | ९,८६,६४५/- | १२,९६,८३३/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ११ | ३१,०५१/- | १०,५२४/- | २०,५२७/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ४८२ | ४८,८५,३५७/- | २५,१२,१२६/- | २३,७३,२३१/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २७८ | १,०८,२४,५७९/- | ९१,१७,५००/- | १७,०७,०७९/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी | २,३८९ | १३,१०,०३०/- | - | १३,१०,०३०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रुग्णांना दिलेली सवलत | | | | |
| | एकुण | ३,४५८ | २,०४,८८,४२७/- | १,२६,२६,७९५/- | ७८,६१,६३२/- |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४१ | ५३,०००/- | - | ५३,०००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १६ | १६,२००/- | - | १६,२००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | २८ | ३,७००/- | - | ३,७००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १२० | ३,०२,७००/- | - | ३,०२,७००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ५ | ७,४००/- | - | ७,४००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ५ | ६,०००/- | - | ६,०००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १२६ | १,५९,४५०/- | - | १,५९,४५०/- |
| | **एकुण** | ३४१ | ५,४८,४५०/- | - | ५,४८,४५०/- |
| | **एकुण अ+ब** | **३,७९९** | **२,१०,३६,८७७/-** | **१,२६,२६,७९५/-** | **८४,१०,०८२/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर२०१८ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८४,१०,०८२/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये डिसेंबर-२०१८ महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.८४,१०,०८२/-मात्रची नोंद घेऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.१७** **डॉ. हर्षल अजाबराव पाटील, आर. एम.ओ. श्री साईबाबा हॉस्पिटल व डॉ. रेवणनाथ रामदास एनगे, आर.एम.ओ. श्री साईनाथ रुग्णालय यांचे उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक/ अध्ययन / असाधारण रजा मिळणेबाबतचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद-कलम २ खंड (झ) "विनियम" याचा अर्थ या अधिनियमान्वये समितीने केलेले विनियम असा आहे, कलम १५ पोटकलम (२) समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी हे विनियमाद्वारे ठरविण्यात येतील अशा सेवेच्या अटींवर व शर्तीवर नेमण्यात येतील.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) सेवा रजा विनियम, २०१३-

१६. रजेचा, रजा वेतनाचा इत्यादी हक्कः- सदर विनियमात उपबंधित केले असेल त्याव्यतिरीक्त नियम ५ आणि रजेच्या काळातील वेतनाच्या विनियमात नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या रजेच्या संबंधात संस्थानाच्या प्रत्येक कर्मचा-याला संबंधीत प्रवर्गातील शासकीय कर्मचा-याला वेळोवेळी लागू असलेले नियम आणि विनियम लागू होतील.

मा व्यवस्थापन समिती निर्णय क्र.

०१. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१/११/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९३२.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच त्यांचेकडून आवश्यक ते कागदपत्र करून घ्यावेत, असे ठरले.

प्रस्तावना-

१) डॉ हर्षल अजाबराव पाटील यांचा शैक्षणिक / अध्ययन / असाधारण रजा मिळणेबाबतचा दि. २३/०७/२०१८ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"मी डॉ हर्षल अजाबराव पाटील सन २०१२ पासुन आरएमओ या पदावर श्री साईबाबा हॉस्पिटल येथे कार्यरत असुन नेमणुकीपासुन आजपर्यंत माझी सेवा ६ वर्षेपुर्ण झालेली आहे. माझे मुळचे शिक्षण वैद्यकीय क्षेत्रात एमबीबीएस झालेले आहे. आता मला वैद्यकीय क्षेत्रात डीएमआरई (रेडीओलॉजी) हे उच्च शिक्षण घ्यावयाचे आहे. सदर उच्च शिक्षणाचा फायदा माझ्या वैद्यकीय सेवेत तसेच संस्थान रूग्णालयातील रूग्णांसाठी होणार आहे. माझी डीएमआरई (रेडीओलॉजी) या उच्च शिक्षणासाठी मुंबई पोर्ट ट्रस्ट शासकीय रूग्णालय, वडाळा, मुंबई येथे मेरीटनुसार निवड झालेली असुन सदर शिक्षणाचा कालावधी दि. ०१/०८/२०१८ ते दि.

३१/०७/२०२० असा एकुण दोन वर्ष आहे. सोबत सदर अध्ययनाचे नियुक्तीपत्र व मिरीट लिस्ट जोडली आहे. मी सदर रजेसाठी आवश्यक असणारे संस्थान नियमानुसार बंधपत्र देणेस तयार आहे. तरी मला उपरोक्त कालावधीतील शैक्षणिक / अध्ययन/ असाधारण रजा मिळणेस विनंती".

२) डॉ रेवणनाथ रामदास एनगे यांचा एफसीपीएस- सर्जरी या उच्च शिक्षणासाठी असाधारण रजा मिळणेबाबतचा दि. ३१/०७/२०१८ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"मी डॉ रेवणनाथ रामदास एनगे माझे शिक्षण एमबीबीएस असून माझी नेमणूक आरएमओ या पदावर झाली होती माझे मुळचे शिक्षण हे एमबीबीएस झालेले आहे. वैद्यकीय क्षेत्रात मला सर्जरी हे उच्च शिक्षण घ्यावयाचे आहे, सदर उच्च शिक्षणाचा फायदा माझ्या वैद्यकीय सेवेत तसेच संस्थान रूग्णालयातील रूग्णांसाठी होणार आहे. माझी एफसीपीएस या उच्च शिक्षणासाठी राजीव गांधी मेडीकल कॉलेज, कळवा ठाणे येथे निवड झालेली आहे. माझी नेमणूक आरएमओ म्हणून रू. २७,०००/- एकत्रित वेतनावर झाली असून, नेमणूक जागेवर एप्रिल २०११ रोजी हजर झालो आहे. तदनंतर माझी बदली श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये दि. ०२/०५/२०१२ पासून झाली आहे. तदनंतर मला ११/०६/२०१२ पासून सुधारित वेतन रू.१५६००/३९१०० मध्ये मुळ वेतन १५,६०० व ग्रेड वेतन ५४०० व अनुज्ञेय भत्ते असा वेतनश्रेणी आदेश देण्यात आला आहे. नेमणुकीपासुन आजपर्यंत माझी सेवा ७ वर्ष ३ महिने पुर्ण झालेली आहे. सदरचे उच्च शिक्षणानंतर मी ३ वर्ष सेवा करीन, ३ वर्ष सेवा न दिल्यास मी माझे तीन महिन्याचे वेतन संस्थानमध्ये जमा करेन तसे बंधपत्र संस्थानला लिहून देईल. माझ्या सेवेचा कालावधी ७ वर्ष ३ महिने पूर्ण झालेला असून मला वरील शिक्षणासाठी असाधारण रजा मिळावी, ही नम्र विनंती. तरी महोदया साहेबांनी मला माझ्या उच्च शिक्षणासाठी विषय क्र ८४ दि. २१/११/२०१० विश्वस्त व्यवस्थापन सभा निर्णय क्र ९३२ नुसार दि. ०१/१०/२०१८ ते दि. ३०/०९/२०२१ अशी ०३ वर्ष कालावधीसाठी रजा मंजूर करावी ही नम्र विनंती ".

उपरोक्त विनंती अर्जास अनुसरून डॉ हर्षल अजाबराव पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी व डॉ रेवणनाथ रामदास एनगे, आरएमओ, श्री साईनाथ रूग्णालय यांना दि. १७/१२/२०१८ रोजीचे पत्रान्वये रजा मंजुरीबाबत खातरजमा न करता तुम्ही गैरहजर आहात सदरचे कृत्य गैरशिस्त वर्तनात मोडते. सध्या रूग्णालयात आरएमओंची आवश्यकता असुन तुमच्या कामाची अंतर्गत व्यवस्था आपसात करणे शक्य नाही. तुमची उच्च शिक्षणासाठी / अध्ययन रजा नामंजुर करणेत येत आहे. तुम्ही कामावर त्वरीत हजर व्हावे व रूजू अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा अन्यथा गैरशिस्त वर्तणुकीबाबतची कार्यवाही करणेत येईल असे कळविलेले आहे सदरचे पत्र संबंधीत वैद्यकीय अधिका-यांना प्राप्त झालेची पोहोच कार्यालयात प्राप्त झालेली आहे मात्र उपरोक्त वैद्यकीय अधिकारी अद्यापपावेतो कामावर हजर झालेले नाही. दि. १७/१२/२०१८ रोजीचे पत्राची प्रत उपरोक्त वैद्यकीय अधिका-यांनी उच्च शिक्षणासाठी ॲडमिशन घेतलेल्या मा डीन यांना पाठविलेली आहे.

तदनंतर, मा डीन, राजीवगांधी वैद्यकीय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय, कळवा, ठाणे यांनी दि. २१/१२/२०१८ रोजीचे पत्रान्वये, डॉ रेवननाथ एनगे यांचा उच्च शिक्षणासाठी घेतलेला प्रवेश (टर्मिनेट) संपुष्टात आणलेबाबत इकडील कार्यालयास कळविले आहे.

तदनंतर, डॉ रेवननाथ रामदास एनगे, आर एम ओ श्री साईनाथ रूग्णालय यांचा शैक्षणिक रजा मंजुर करणेबाबतच्या अर्जावर फेरविचार करणेबाबतचा दि. ०१/०१/२०१९ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

I Dr Revannath Ramdas Yenge have been working in Sansthans Saibaba and Sainath hospital presently as per appointment order ref no.1 for 7 years and six month as of now. I have secured a seat in FCPS surgery at RGMC Kalwa, Thane through NEET PGCET 18 and had applied for study leave on 31/07/2018 which was not sanctioned as per ref no 3 because of which presently I have been terminated from my college.

Respected mam, as per ref no 4 I am eligible for study leave and Sansthan has previously granted study leave for many medical officers n nursing staff. I hereby request you to please do reconsider my application for study leave as per G.R. Maharashtra Civil Services (leave) Rules 1981 Chapter 7(80-93). I have been working in sansthan since my internship and also want to continue my services towards Sansthan after my post graduation which will beneficial towards my services to patients and Sansthan. Mam, it's a humble request, to please do reconsider my application for study leave as per Sansthan rules/ government resolution. Maharashtra Civil Services (leave) rules 1981 chapter7(80-93).

तसेच, सन्मा. नामदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सा ो, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे दि. २९/१२/२०१८ रोजीचे डॉ रेवननाथ रामदास एनगे यांचे शैक्षणिक रजा मंजुरीबाबत शिफारस पत्र प्राप्त झालेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१/११/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९३२ नुसार वैद्यकिय अधिकारी, स्टाफ नर्स, पॅरामेडिकल स्टाफ व इतर कर्मचारी यांना अध्ययन / असाधारण रजेवर सोडतांना खालीलप्रमाणे नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

१. पहिले कर्मचारी परत आलेनंतरच एका वेळी दोन परिचारीका, एक वैद्यकिय अधिकारी, एक पॅरामेडिकल कर्मचारी

व इतर पैकी एक असे कर्मचारी असाधारण रजेवर सोडणस सेवाजेष्ठतेनुसार परवानगी देणे.

२. उच्च शिक्षण झालेनंतर किमान ०३ वर्षे संस्थान सेवा करावी लागेल. तसे रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन घेणे.

३. रजेच्या कालावधीत त्यांना कोणतेही वेतन, भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

४. रजा कालावधीत त्याना आवश्यक असणारा ०५ वर्षाचा सेवा कालावधी नसल्यास त्यांची सेवा जेष्ठता कोणत्याहीप्रकारे सुरक्षित राहणार नाही.

५. रजा कालावधी संपुष्टात आल्यानंतर रजेचा नियमीत करणे अथवा भत्ते, वेतन वगैरेसाठी साईबाबा संस्थानचे मा. व्यवस्थापन मंडळ, मा. न्यायालय अथवा फोरम समोर त्यांना दाद मागता येणार नाही.

६. उच्च शिक्षणाचा कालावधी संपताच त्यांनी कामावर त्वरीत हजर होऊन ०३ वर्षाची सेवा करणास नसलेस ०३ महिन्यांचे वेतन संस्थानमध्ये जमा करावे लागेल.

विभागाचा अभिप्राय-

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २१/११/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ९३२ नुसार १०० रू स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र घेऊन १) डॉ हर्षल अजाबराव पाटील, आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना डी.एम.आर.ई. या उच्च शिक्षणासाठी दि. ०१/०८/२०१८ ते दि. ३१/०७/२०२० या ०२ वर्षाचे कालावधीसाठी विनावेतन अध्ययन रजा मंजुर करणेबाबत तसेच, २) डॉ रेवणनाथ रामदास एनगे, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईनाथ रूग्णालय यांना दि. ०१/१०/२०१८ ते ३०/०९/२०२१ अशी ०३ वर्ष विनावेतन अध्ययन रजा विशेष बाब म्हणून मंजुर करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.९० **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ हर्षल अजाबराव पाटील, आरएमओ, श्री साईबाबा हॉस्पिटल यांना डी.एम.आर.ई. या उच्च शिक्षणासाठी दि. ०१/०८/२०१८ ते दि. ३१/०७/२०२० या ०२ वर्षाचे कालावधीसाठी विनावेतन अध्ययन रजा तसेच डॉ. रेवणनाथ रामदास एनगे, निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री साईनाथ रूग्णालय यांना दि. ०१/१०/२०१८ ते ३०/०९/२०२१ अशी ०३ वर्ष विनावेतन अध्ययन रजा पुढील अटीवर मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली.**

१. **उच्च शिक्षण झालेनंतर किमान ०३ वर्षे संस्थान सेवा करावी लागेल. तसे रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.**

२. **रजेच्या कालावधीत त्यांना कोणतेही वेतन, भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.**

३. **रजा कालावधीत त्याना आवश्यक असणारा ०५ वर्षाचा सेवा कालावधी नसल्यास त्यांची सेवा जेष्ठता कोणत्याही प्रकारे सुरक्षित राहणार नाही.**

४. **रजा कालावधी संपुष्टात आल्यानंतर रजेचा नियमीत करणे अथवा भत्ते, वेतन वगैरेसाठी साईबाबा संस्थानचे मा. व्यवस्थापन मंडळ, मा. न्यायालय अथवा फोरम समोर त्यांना दाद मागता येणार नाही.**

५. **उच्च शिक्षणाचा कालावधी संपताच त्यांनी कामावर त्वरीत हजर होऊन ०३ वर्षाची सेवा करणास नसलेस ०३ महिन्यांचे वेतन संस्थानमध्ये जमा करावे लागेल.**

६. **उच्च शिक्षणाचे आधारे संस्थान सेवेत पदोन्नती अथवा वरिष्ठ पद मागता येणार नाही.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१८ **मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेसाठी स्थापत्य, विद्युत आणि वातानुकूलन कामे करणेसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन मा.व्यवस्थापन समितीकडे शिफारस होणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | **मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेसाठी स्थापत्य, विद्युत आणि वातानुकूलन कामे करणे.** |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील नि.क्र.५६९. |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ३५,७८,०७४/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | मंदिर परिसरातील साई सत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये साईभक्तांकरीता ७ ते ८ व ९ ते १० या वेळेत नित्याचे अभिषेक पुजा करण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच सदरहू हॉलमध्ये श्रींचे आरतीकरीता येणारे सशुल्क पासधारक साईभक्तांकरीता प्रतिक्षालय म्हणून सदर हॉलचा वापर करण्यात येतो. श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना ध्यान साधना करणेकरीता सदरचे ठिकाणी बंदिस्त हॉल करुन ध्यान मंदिर बनविणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.५६९ अन्वये, ध्यानमंदिराचे बांधकाम करणेकामी आर.सी.सी कॉक्रीट, वीट बांधकाम, प्लास्टर, फ्लोरींग, अल्युमिनियम दरवाजे व खिडक्या बसविणे, फॉल्स सिलींग,वॉल पॅनेलींग, ईलेक्ट्रीकल वर्क्स, वातानुकूलन यंत्रणा इ. कामे करणेस विहीत पध्दतीने एकत्रित स्वरुपात एकच ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.३५.७८ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. त्यानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रु.३४,३२,६२४/- या रकमेवर २० % कमी करुन रु.२७,४६,०९९/- मात्र इतक्या किंमतीची ई-निविदा वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन दि.०२/०१/२०१९ अखेर पर्यंत B2 पध्दतीने (आयटेम रेट) व्दितीय मागणीनुसार ई निविदा मागविणेत आल्या होत्या. |
| ५) | निविदा तपशील | दि.२०/१२/२०१८ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.०२/०१/२०१९ अखेर पर्यंत विहीत मुदतीत ०२ ठेकदार यांनी ई-निवीदा सादर केलेल्या आहेत. |
| अ) | निविदा कालावधी | दि.२०/१२/२०१८ ते दि.०२/०१/२०१९ अखेर. |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.०५/०१/२०१९ सकाळी ११.०० वाजता. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०२ ठेकेदार. |
| ड) | तांत्रिक निविदेत पात्र ठेकेदार संख्या | ०२ ठेकेदार. |
| इ) | सर्व निविदा धारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय. |
| ई) | सर्व निविदा धारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय? | होय. |
| उ) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.३४,३२,६२४/- (एसएसआर दराप्रमाणे अंदाजपत्रकानुसार)<br>रु.२७,४६,०९९/- (२० % कमी केलेली रक्कम) |
| ६) | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकारांचा तपशिलः | |

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदा रक्कम | अंदाजपत्रकीय रक्कम (रु.३४,३२,६२४/- वर) टक्केवारी कमी / अधिक |
|---|---|---|---|
| १. | भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई | रु.४४,१३,६६७.८९ | २८.५८ % अधिक. |
| २. | आर.एल.भुताडा, कोपरगाव. | रु.६१,६२,९२७.४० | ७९.५३९८% अधिक. |

| | | |
|---|---|---|
| ७) | निम्नतम निविदा धारकाचा तपशिल | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई |
| ब) | निविदा रक्कम | रु.४४,१३,६६७.८९ |
| क) | अंदाजपत्रकीय रक्कम (रु.३४,३२,६२४/- वर) टक्केवारी | २८.५८ % अधिक. |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

तरी वरील नमूद तपशिलानुसार मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेसाठी स्थापत्य, विद्युत आणि वातानुकूलन कामे करणेसाठी पात्र निविंदापैकी निम्नतम दराचे ठेकेदार

भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांची रक्कम रु.४४,१३,६६७.८९ मात्रची निम्नतम निविदा स्विकारणेबाबत त्यांचेशी चर्चा-वाटाघाटी होऊन ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.९१ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेसाठी स्थापत्य, विद्युत आणि वातानुकूलन कामे करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया वाटाघाटी पुर्ण होईपर्यंत तुर्त स्थगीत ठेवण्यात यावी. व सदरचे काम देणगीदार साईभक्तांकडून करुन घेणे शक्य असल्यास तसे तपासावे, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

आयत्या वेळेचा

विषय नं.१९, निर्णय क्र.९२ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०३.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७८ अन्वये संस्थानच्या हयात असलेल्या सर्व माजी विश्वस्तांना (त्रिसदस्य समिती व स्थानिक विश्वस्तांसह) त्यांचेसह, त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन/आरती करीता ओळखपत्र देणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे शताब्दी वर्षाचे कालावधीतील मुख्य कार्यकारी अधिकारी व शताब्दी महोत्सवासाठी निर्माण करण्यात आलेल्या शताब्दी कक्षासाठी संस्थान आस्थापनेवर अस्थायी स्वरुपात महाराष्ट्र शासनाकडील प्रतिनियुक्तीवर आलेले उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधिक्षक, मुख्यलेखाधिकारी यांचेसह त्यांचे कुटूंबातील ४ व्यक्तींसाठी दर्शन/आरती करीता ओळखपत्र देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/ जनसंपर्क विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२०, निर्णय क्र.९३ मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे संस्थानचे विरोधात खालील प्रमाणे पी.आय.एल व रिट पिटीशन दाखल झालेल्या आहेत.

| अ. क्र. | कोर्ट केस नंबर | मा.न्यायाल याचे नाव | वादी प्रतीवादी यांचे नांव | कोर्ट केस दाखल तारीख | तक्रारीचे स्वरुप | काम पहाणारे संस्थानचे वकील | सुनावणी ची पुढील तारीख | स्टेज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | १२ | १० | ११ |
| १ | पी.आय.एल. नं. ८६/२०१६ | औरंगाबाद खंडपीठ | श्री.संजय भा. काळे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर | ०७/०९/२०१७ | श्री साईभक्तांचे देणगीतून स्वयंसेवी संस्थांना ५०० ॲम्ब्युलन्स देणेबाबत तसेच दिनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ यांना रु.१ कोटी देणगी देणेबाबत | ॲड. नितीन भवर, औरंगाबाद | २९.०१.२०१९ | सुनावणी |
| २ | पी.आय.एल. नं.१३३/२०१६ | औरंगाबाद खंडपीठ | श्री.विक्रांत रुपेंद्र काळेव इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर | ०७.१२.२०१८ | निळवंडे धरणाचे पाणी लाभक्षेत्राचे बाहेर न देणेबाबत. | ॲड. नितीन भवर, औरंगाबाद | २९.०१.२०१९ | सुनावणी |
| ३ | पी.आय.एल. नं. १०४/२०१८ | औरंगाबाद खंडपीठ | श्री.संजय भास्कर काळे व श्री संदिप कुलकर्णी विरुध्द साईबाबा संस्थान व इतर | १४.०८.२०१८ | कुभमेळयाच्या कालावधीमध्ये सुरक्षा साहित्य, वाहनतळावरील मुरुम, मोबाईल टॉयलेट खरेदीमधील अनियमितता याबाबत. | --- | ०४.०२.२०१९ | DUE ORDERS |
| ४ | पी.आय.एल. नं. १५२/२०१८ | औरंगाबाद खंडपीठ | श्री.संदिप विजय कुलकर्णी विरुध्द साईबाबा संस्थान | १४.१२.२०१८ | निळवंडे धरणातील पाणी पाईपलाईन व्दारे आणणेकामी शासन निर्णयानुसार ५०० कोटी रुपये, उसनवारी पध्दतीने शासनास देणेचे विरोधात. | ॲड. नितीन भवर, औरंगाबाद | २९.०१.२०१९ | सुनावणी |
| ५ | रिट पिटीशन नं.२५६८/२०१८ | औरंगाबाद खंडपीठ | गुंजाळवाडी ग्रामपंचायत व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर | १०.०५.२०१८ | साईबाबा संस्थान, शिर्डी नगरपंचायत व कोपरगाव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजनेबाबत. | --- | ०४.०२.२०१९ | DUE ORDERS |

उपरोक्त याचिकांमध्ये संस्थानचे वकील ॲड नितिन भवर हे काम पाहत आहेत. उपरोक्त याचिकां संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये संस्थानची बाजु प्रभावीपणे मांडण्यासाठी सिनिअर कौन्सील ॲड आर.एन.धोर्डे यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी सिनिअर कौन्सील ॲड आर.एन.धोर्डे यांना आदा करावयाची फी व इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२१, निर्णय क्र.९४ तिरुपती तिरुमल्ला देवस्थान, तिरुपती यांनी महाराष्ट्र शासनाकडे मुंबई येथे गेस्ट हाऊस बांधण्याकरीता जागेची मागणी केलेली असून त्याबदल्यात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करीता गेस्ट हाऊस बांधणेकामी तिरुपती तिरुमल्ला देवस्थान, तिरुपती येथे जागेची मागणी करता येईल अशी माहिती मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेत दिली. त्यावर चर्चा होऊन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करीता गेस्ट हाऊस बांधणेकामी तिरुपती तिरुमल्ला देवस्थान, तिरुपती येथे जागेची मागणी बाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे पाठविण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२२, निर्णय क्र.९५ आजचे सभेत श्री.रविंद्र पांडूरंग गोंदकर, रा.शिर्डी यांनी शिर्डी नगरपंचायतीने प्रारुप विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र.३२ मध्ये दर्शविलेले कॅम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण रद्द करणेबाबत लेखी अर्ज दिलेला आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४८२ अन्वये शिर्डी नगरपंचायतीने प्रारुप विकास आराखडयातील कॅम्पिंग ग्राऊंड साठी दर्शविलेले आरक्षण क्र.५६ वगळण्याबाबत निर्णय झालेला आहे. त्याच प्रमाणे शिर्डी नगरपंचायतीने प्रारुप विकास आराखडयामध्ये आरक्षण क्र.३२ मध्ये कॅम्पिंग ग्राऊंड दर्शविलेले असून सदरचे कॅम्पिंग ग्राऊंडच्या जागेची संस्थानला आवश्यकता नाही, त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

वरील निर्णय क्र.३९ ते ९५ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सायं.०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.